RNI No.: MAHBIL/2016/68485
www.acrossstates.com
पोस्टाचा परवाना क्र. MNW/335/2018-20

श्रष्टाचार निर्मूलन, मानवी हक्क शब्द वापरण्यास संस्थांना रोखता येणार नाही : हायकोर्ट

पान 2 पाहा

# मराठी अक्रॉस मुंबई

संपादक- संजय मंगेश भैरे

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या दृष्टीकोनामुळे समाजात अस्पृश्यता व भेदभावाच्या विरोधात सुधारणा - राज्यपाल

पान 3 पाहा

वर्षः १० अंक : २ ■ मुंबई, मंगळवार १० ते १६ डिसेंबर '२४
मूल्य - ५.०० रुपये पाने - ८




# पुन्हा एकदा सीआरझेडचे नियम धाब्यावर बसवले

## देवाच्या नावाने चांगभलं!

## म्हाडाने पाहणी न करताच केला फंड मंजूर

■ **मुंबई**

चारकोप येथे म्हाडाची पश्चिम उपनगरातील मोठी निवासी वसाहत आहे. येथील सेक्टर आठ व नऊ हा परिसर खारफुटी संरक्षित क्षेत्रात येत असल्याने केंद्रीय पर्यावरण खात्याने येथे सी आर झेड जाहीर केला आहे; परंतु येथील स्थानिक रहिवाशी सचिन गायकवाड याने मात्र सी आर झेड चे नियम धाब्यावर बसवत श्री विठ्ठल रुक्मिणीचे मंदिर बांधले आहे.

सेक्टर नऊ मध्ये राहणाऱ्या स्थानिक रहिवाशी सुजाता समीर साळवी यांनी उपनगर जिल्हाधिकारी व बोरिवली तहसील कार्यालय पालिकेत या मंदिराच्या बेकायदेशीर बांधकामाविरुद्ध तक्रार केली आहे. तहसील कार्यालयात चारकोप पोलीस ठाण्यात मंदिर बांधकाम करणारे करणारे सचिन गायकवाड यांच्या विरोधात एफ आर आय ही दाखल झाला असून तहसीलदार विशाल सुभाष गायकवाड यांनी यावर कायदेशीर कारवाईचे आदेशही दिले होते, परंतु जिल्हा नियोजन समिती जिल्हाधिकारी कार्यालय मु.झो. सु.मंडळ, म्हाडा बांद्रा (पूर्व )यांनी या कामाला नागरी दलितेतर वस्ती सुधारणा अंतर्गत दहा लाखाचा निधी मंजूर केला आहे .

मिळालेल्या वृत्तानुसार चारकोप पोलीस ठाणे हद्दीतील मौजे, चारकोप ,तालुका .बोरिवली, सर्वे क्रमांक 41/अ , सेक्टर 9, चारकोप, कांदिवली (पश्चिम).या शासकीय जागेवर वनपरिक्षेत्र अधिकारी, मुंबई कांदळवन संधारण घटक, पश्चिम विभाग यांनी तक्रारदार सुजाता साळवी यांच्या तक्रारीवरून संयुक्त स्थळ पाहणी केली असता, या जागेवर कांदळवणाच्यालगत श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिर आढळून आले. सदर मंदिराची अंदाजे लांबी 30' बाय 20' फुटीचा सिमेंटचा कोबा करून त्यावर मूर्ती बसविण्यात आली असून त्यावर बांबू व ताडपत्रीचे शेड टाकण्यात आले आहे. तसेच सदर ठिकाणी एक बोर्ड लावण्यात आला असून त्यावर स्थापना सन 2001. श्री विठ्ठल रुक्मिणी देवस्थान, राष्ट्रीय समाज कल्याण मंदिर समिती, चारकोप ,सामाजिक, सांस्कृतिक व शैक्षणिक असे लिहिले आहे. सदर मंदिर सचिन गायकवाड याने बांधले असून, कांदळवन शेजारील विजेता सोसायटी, सेक्टर - 1 मधील हा रहिवासी आहे. कांदळवनाच्या हासा बाबत माननीय उच्च न्यायालयात रिट पिटीशन क्र.3246/2004 रूपांतरीत जनहित याचिका क्र. 87/2006, दिनांक 6 /10/ 2005 आणि दिनांक 17 /9/ 2018 मध्ये माननीय न्यायालयाने कांदळवनापासून 50 मीटर आत कोणतेही विकास काम करू नये असे आदेशित केले असताना वरील मंदिराचे बांधकाम हे अनधिकृत आहे. त्यामुळे तहसीलदार विशाल सुभाष गायकवाड यांनी कांदळवनाच्या संदर्भात असलेल्या तरतुदींचे उल्लंघन झाल्याचे सांगत सचिन गायकवाड यांच्याविरुद्ध पर्यावरण संरक्षण अधिनियम 1986 कलम -15 (1)( 2) अन्वये कायदेशीर कारवाईचे आदेश दिले होते .परंतु त्यावर काही कारवाई करण्यात आली नाही.



त्यानंतर तक्रारदार सुजाता समीर साळवी यांनी धर्मदाय सह आयुक्त कार्यालयात माहितीच्या अधिकारानुसार श्री विठ्ठल रुक्मिणी सामाजिक प्रतिष्ठान हा न्यास नोंदणीकृत असल्याचे विचारले असता, धर्मदाय सह आयुक्त मुंबई कार्यालय येथील जन माहिती अधिकारी व.स.तावरे यांनी हा न्यास नोंदणीकृत नसल्याचे सांगितले.

असे असूनही मुंबई उपनगर जिल्हा जिल्हाधिकारी कार्यालय , जिल्हा नियोजित समिती. सन 2024 - 2025 या आर्थिक वर्षाकरिता नागरी दलिते तर वस्त्यांमध्ये सुधारणा या योजनेतून ,कार्यकारी अभियंता (पश्चिम) मुं. झो.सु. मंडळ, म्हाडा, बांद्रा (पूर्व) मुंबई उपनगर. यांनी विठ्ठल रुक्मिणी मंदिर सेक्टर - 9 ,चारकोप, कांदिवली (पश्चिम) येथील बेकायदेशीर मंदिराला सौंदर्यीकरण करण्यासाठी दहा लाख रुपये मंजूर केले आहेत.

मात्र वरील कामाला प्रशासकीय मान्यता मिळण्यासाठी ज्या अटी व शर्ती पालन करणे बंधनकारक आहेत याचे उल्लंघन झाल्याचे दिसते. जसे की कामांची निविदा निश्चित करण्यापूर्वी कामाची जागा ही शासकीय अथवा स्थानिक स्वराज्य संस्था यांच्या मालकीची असल्याची खात्री करूनच कामास सुरुवात करावी. संबंधित जागा मालकाकडून ना हरकत प्रमाणपत्र प्राप्त झाल्यानंतरच कामास सुरुवात करण्यात यावी. संबंधित प्राधिकरणे नियामके यांची प्रस्तावित धोरणानुसार परवानगी ना हरकत प्रमाणपत्र आवश्यक असल्यास त्या सर्व परवानग्या / ना हरकत प्रमाणपत्रे काम सुरू होण्यापूर्वी घेण्याची संपूर्ण जबाबदारी ही या कार्यान्वयीत यंत्रणेची राहील. तसेच सदर कामांची उपयुक्तता ही सार्वजनिक स्वरूपाची असावी. कामाचा वापर/ उपयोग हा खाजगी ,वैयक्तिक खाजगी कार्यालयीन स्वरूपाच्या वापरीसाठी नसावा .तसेच प्रस्तावित कामामुळे सार्वजनिक, लोकोपयोगी कायमस्वरूपी मालमत्ता निर्माण झाली पाहिजे. वरील सर्व निकष या कामासाठी मिळालेल्या निधीसाठी लागू होतात का ?

तसेच तक्रारदाराने सांगितलेल्या माहितीच्या आधारे श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिर हे पूर्ण बेकायदेशीर असल्याचे दिसते. तरीही याची शहानिशा न करता या बेकायदेशीर मंदिर बांधकामासाठी जिल्हा नियोजन समिती जिल्हाधिकारी कार्यालय मुंबई उपनगर जिल्हा यांनी वरील सर्व अटी व शर्ती चे पालन होऊन हा शासकीय मान्यता निधी दिल्याचे दिसून येत नाही. तरीही यावर महाराष्ट्र शासन नियोजित विभाग यांनी या प्रकरणाची सखोल कारवाई करत हा निधी मंजूर करावा.

## 'एक देश एक निवडणूक'साठी मोर्चेबांधणी; मोदी सरकार महत्त्वाचा निर्णय घेण्याच्या तयारीत

**नवी दिल्ली**

पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या नेतृत्त्वाखालील केंद्र सरकार हिवाळी अधिवेशनात 'एक देश एक निवडणूक' विधेयक मांडण्याच्या तयारीत आहे. लोकसभा आणि सगळ्या विधानसभा निवडणुका एकाचवेळी घेण्याच्या हेतूनं केंद्र सरकार हिवाळा अधिवेशनात विधेयक मांडण्याच्या विचारात आहे. विधेयक विस्तृत चर्चेसाठी संयुक्त संसदीय समितीकडे पाठवलं जाऊ शकतं. एक देश, एक निवडणूक या विषयावर माजी राष्ट्रपती रामनाथ कोविंद यांच्या समितीनं दिलेला अहवाल कॅबिनेटनं आधीच मंजुरी दिलेली आहे.

विधेयकावर सहमती व्हावी आणि याबद्दल सखोल चर्चा व्हावी यासाठी सरकार आग्रही आहे. संयुक्त संसदीय समिती सगळ्या राजकीय पक्षांच्या प्रतिनिधींशी चर्चा करणार आहे. त्यासोबतच सगळ्या राज्यांच्या विधानसभा अध्यक्षांनादेखील बोलावलं जाऊ शकतं. देशभरातील बुद्धिजीवी आणि सर्वसामान्यांची मतंदेखील विचारात घेतली जाऊ शकतात. एक देश एक निवडणूक यासंदर्भात एकमत होईल, अशी अपेक्षा सरकारला आहे. माजी राष्ट्रपती रामनाथ कोविंद यांच्या अध्यक्षतेखालील समितीनं ६२ राजकीय पक्षांशी संपर्क साधला होता. यातील ३२ पक्षांनी एक देश एक निवडणुकीचं समर्थन केलं. १५ पक्षांनी याला विरोध केला, १५ पक्षांनी कोणतीच भूमिका घेतली नाही. एक देश एक निवडणूक हा मोदी सरकारच्या अजेंड्यावरील प्रमुख विषय आहे. २०२४ मध्ये झालेल्या लोकसभा निवडणुकीच्या जाहीरनाम्यात भाजपनं याचा उल्लेख केला होता. कोविंद समितीच्या शिफारशी लागू करण्याचं आश्वासन भाजपकडून देण्यात आलं होतं. पंतप्रधान नरेंद्र मोदींनी १५ ऑगस्टला लाल किल्ल्यावरुन भाषण करतानाही एक देश एक निवडणूक यासाठी सगळ्यांनी पुढाकार घ्यावा, असं आवाहन केलं होतं. एक देश, एक निवडणूक यासाठी सरकारला आधी संसदेत विधेयक आणावं लागलं. यासाठी संविधानात सुधारणा गरजेची असल्यानं संसदेतील दोन तृतीयांश खासदारांचा पाठिंबा गरजेचा असेल. लोकसभेत विधेयक मंजूर करुन घेण्यासाठी ३६२ खासदारांचा पाठिंबा आवश्यक ठरेल. तर राज्यसभेत १६३ खासदारांचं समर्थन गरजेचं ठरेल. संसदेच्या मंजुरीनंतर विधेयकाला किमान १५ राज्यांच्या विधानसभांचं अनुमोदन लागेल. याचा अर्थ १५ राज्यांच्या विधानसभेत विधेयक मंजूर व्हावं लागेल. त्यानंतर त्यावर राष्ट्रपती स्वाक्षरी करतील. मग त्याचं रुपांतर कायद्यात होईल.

# भ्रष्टाचार निर्मूलन, मानवी हक्क शब्द वापरण्यास संस्थांना रोखता येणार नाही : हायकोर्ट

## धर्मादाय आयुक्तांचे परिपत्रक रद्द

मुंबई

भ्रष्टाचार निर्मूलन, मानवी हक्क यांसारखे शब्द वापरण्यापासून स्वयंसेवी संस्थांना रोखता येणार नाही, असे स्पष्ट करताना उच्च न्यायालयाने राज्य सरकारला चांगलेच धारेवर धरले. न्यायमूर्ती महेश सोनक आणि न्यायमूर्ती जितेंद्र जैन यांच्या खंडपीठाने हे स्पष्ट करताना धर्मादाय आयुक्तांनी काढलेले स्वयंसेवी संस्थांच्या नावात भ्रष्टाचार निर्मूलन, भ्रष्टाचार निर्मूलन महासंघ, भ्रष्टाचारविरोधी आंदोलन, भ्रष्टाचारमुक्त भारत, अथवा मानवी हक्क या शब्दांचा वापर करण्यास मनाई करणारे परिपत्रक रद्द केले.

धर्मादाय आयुक्तांनी ४ जुलै २०१८ रोजी परिपत्रक काढून ज्या संस्थांच्या नावामध्ये भ्रष्टाचार निर्मूलन महासंघ, भ्रष्टाचारविरोधी आंदोलन, भ्रष्टाचारमुक्त भारत, तसेच मानवी हक्क आदींचा समावेश आहे,



त्या संस्थांच्या विश्वस्तांना नोटिसा बजावण्याचे तसेच संस्थांच्या नावातून ते शब्द वगळण्याचे निर्देश दिले होते. त्याविरोधात पुण्यातील मानवी हक्क संरक्षण जागृती या संस्थेचे विकास कुचेकर व अभिषेक हरिदास यांनी उच्च न्यायालयात धाव घेऊन धर्मादाय आयुक्तांच्या परिपत्रकाला आव्हान दिले होते. या याचिकेवर न्यायमूर्ती महेश सोनक आणि न्यायमूर्ती जितेंद्र जैन यांच्या खंडपीठासमोर सुनावणी झाल्यानंतर खंडपीठाने राखून ठेवलेला निर्णय जाहीर करताना धर्मादाय आयुक्तांचे परिपत्रक रद्द केले.

**याचिकाकर्त्यांचा दावा**

नागरिकांना राज्यघटनेने संघटना स्थापनेचे स्वातंत्र्य दिले आहे. ज्यावेळी मानवाधिकाराचे उल्लंघन होते, त्यावेळी संस्थांच्या माध्यमातून न्यायाची मागणी करण्याचेही स्वातंत्र्य असताना धर्मादाय आयुक्तांनी जारी केलेले परिपत्रक राज्यघटनेतील समानता आणि संघटना स्थापन करण्यास दिलेल्याअधिकारावर गदा आणणारे आहे, असा दावा याचिकाकर्त्यांच्या वतीने करण्यात आला होता.

**सरकारचा दावा**

मानवाधिकार संरक्षण तसेच भ्रष्टाचार निर्मूलनाचे काम करण्यासाठी राज्य सरकारच्या सर्व यंत्रणा कार्यरत आहेत. असे असताना या स्वयंसेवी संस्थांच्या नावात मानवाधिकार, भ्रष्टाचार निर्मूलन यांसारखे शब्द वापरून हे अधिकार आपल्याला आहेत असे चित्र समाजात उभे केले जाते. ते रोखण्यासाठी परिपत्रक जारी केले, असा दावा सरकारने केला.

# महाविकास आघाडीत फूट; समाजवादी पार्टी बाहेर

मुंबई

विधानसभा निवडणुकीमध्ये महायुतीला घवघवीत यश संपादन झाले. गुरुवारी आझाद मैदानावर मुख्यमंत्री आणि दोन उपमुख्यमंत्र्यांनी शपथ घेतली. शनिवारी विधानमंडळाचे विशेष अधिवेशन घेत सर्व आमदारांना शपथ दिली जाणार असली तरी त्यावर महाविकास आघाडीने बहिष्कार घातला होता. तशा सूचना देखील कालच्या बैठकीत घेण्यात आल्या होत्या.

असे असले तरी महाविकास आघाडीतील घटक पक्ष असणाऱ्या समाजवादी पार्टीच्या अबू आझमी आणि रईस शेख यांनी मात्र विधानसभेत उपस्थित राहून शपथ घेतली.शिवाय त्यांनी महाविकास आघाडीतून बाहेर पडण्याचे संकेत दिले आहेत. याचं खापर त्यांनी उद्धव बाळासाहेब ठाकरे या पक्षावर फोडलं आहे.

राज्यामध्ये येणाऱ्या काळात विविध महानगरपालिका तसेच नगरपालिका मध्ये होणाऱ्या निवडणुकीमध्ये हिंदुत्वाचा मुद्दा पुढे घेऊन जाण्याचा आदेशच उद्धव ठाकरे यांनी आपल्या माजी नगरसेवक यांना दिल्यास मुळे आम्ही नाराज असल्याचे अबू आजमी यांनी माध्यमांशी बोलताना आपला संताप बोलून दाखवला. महाविकास आघाडीच्या घटक पक्षाकडून हिंदुत्वाचा मुद्दा पुढे रेटला जात आहे. त्यातच ६ डिसेंबर रोजी झालेल्या बाबरी मशिद पाडणाऱ्यांचे अभिनंदन केले जात आहे. अशा हिंदुत्ववादी विचारधारेच्या पक्षांबरोबर काम करणे आमच्यासाठी अडचणीचे होऊ शकते. असं कारण देत अबू आझमी यांनी महाविकास आघाडीला सोडण्याचे संकेत दिले आहेत. विशेष म्हणजे महाविकास आघाडीच्या आमदारांनी शपथ न घेण्याचा निर्णय घेतल्यानंतरही अबू आझमी यांनी आपल्या विधानसभा सदस्यत्वाची शपथ घेतली.

**विरोधीपक्षामध्ये ताळमेळ नाही**

याबरोबरच महाविकास आघाडीमध्ये असलेल्या घटक पक्षांमध्ये एकंदर ताळमेळ दिसून येत नाही. विधान मंडळातील फ्लोर मॅनेजमेंट विरोधकांना जमत नसल्याचे चित्र देखील आज पहावयास मिळाले. काल झालेल्या निर्णयानंतर देखील शिवसेना उद्धव ठाकरे गटाचे आमदार विधान भवनात आले होते. याउलट काँग्रेस तसेच राष्ट्रवादी शरद पवार गटाचे आमदार मात्र सभागृहात बसलेच नाहीत.

# ख्रिसमसच्या दिवशी एमपीएससीचा पेपर

मुंबई, दि. ८ प्रतिनिधी

महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या वतीने २५ डिसेंबर रोजी समाज कल्याणचा सहायक आयुक्त व तत्सम, गट- अ व सहायक संचालक, संशोधन अधिकारी, प्रकल्प अधिकारी, गट- अ पदासाठी सरळ सेवेअंतर्गत भरती प्रक्रियेसाठी परीक्षा घेण्यात येणार आहे. २५ डिसेंबर रोजी ख्रिसमस सणानिमित्त सार्वजनिक सुट्टी असतानाही परीक्षा घेण्यात येत असल्याने विद्यार्थी वर्गातून नाराजीचा सूर उमटत आहे. दोन्ही संवर्गासाठी घेण्यात येणारी ही परीक्षा दुपारी अडीच ते साडेतीन या वेळेत मुंबई, पुणे, छत्रपती संभाजीनगर, अमरावती व नागपूर या केंद्रांवर घेण्यात येणार आहे. तर २७ डिसेंबर रोजी सकाळी ९ ते १० या वेळेत निवासी वैद्यकीय अधिकारी गट ब पदासाठी मुंबईत परीक्षा घेण्यात येणार आहे. त्यामध्ये २५ डिसेंबर रोजी ख्रिसमसच्या सुट्टीच्या दिवशी समाजकल्याण व तत्सम गट-अ संवर्गातील सहायक आयुक्त, सहायक संचालक, संशोधन अधिकारी, प्रकल्प अधिकारी, गट-अ या संवर्गातील पदांसाठी परीक्षा घेण्यात येणार असल्याचे वेळापत्रक प्रसिद्ध करण्यात आले आहे.

# आणि जागा चुकलेल्या कसब्याच्या आमदारांना अजितदादा घेऊन आले

मुंबई

महाराष्ट्र विधानसभेचे आज विशेष अधिवेशन सुरू झाले. यामध्ये एक गंमतशीर किस्सा घडला आणि सभागृहांमध्ये एकच हास्य सुरू झाले. भाजपचे कसब्याचे आमदार चुकून विरोधी पक्षाच्या गटामध्ये जाऊन बसले होते. मात्र सुरुवातीलाच उपमुख्यमंत्री अजित पवार यांची शपथविधी झाल्यानंतर विरोधी पक्षाचा भाकाजवळून जाताना दादांनी हाताला धरून रासने यांना सत्ताधारी पक्षाच्या गोटात घेऊन आले. कसबा पेठ विधानसभा मतदारसंघातून भारतीय जनता पार्टीचे नवनिर्वाचित आमदार हेमंत रासने यांनी काँग्रेसचे उमेदवार रवींद्र धंगेकर यांचा प्रचंड मतांनी पराभव करत कसब्याचा पारंपारिक मतदार संघ भाजपकडे पुन्हा ओढून आणला आहे.२०२३ साली झालेल्या मध्यावधी निवडणुकांमध्ये हेमंत रासने यांचा पराभव झाला होता. त्याचीच भरपाई करत रासने यांनी यावेळेस विजयश्री ओढून आणला.हेमंत रासने हे पुणे महानगरपालिकेच्या स्थायी समितीचे अध्यक्ष देखील राहिले आहेत. त्यांच्या कार्यामुळे त्यांच्या नेतृत्वाची ओळख झाली असून, त्यांना भाजपमध्ये एक महत्त्वाची भूमिका दिली गेली आहे.

विधानसभेचे विशेष अधिवेशन होते. शपथविधी दरम्यान हेमंत रासने यांनी विधानसभा सभागृहात प्रवेश केला. सर्वसाधारणपणे, सत्ताधारी नवीन सदस्यांना सत्ताधारी बाकांवर बसावे लागते, मात्र रासने यांना विरोधी पक्षाच्या बाकावर जाऊन बसण्याची चूक झाली. यावेळी अजित पवार हे सभागृहात उपस्थित होते. त्यांनी हेमंत रासने यांना हाताला धरून सत्ताधारी बाकावर घेऊन आले. हे सर्व दृश्य पाहून सभागृहात हास्यकल्लोळ उडाला. या घटनेने जणू काही सभागृहातील वातावरण अधिक हलके केले. यावेळी हेमंत रासने यांनीही त्या क्षणी हलकेपणाने हसत बसण्याची वेळ आली आणि अजित पवार यांच्या सहकार्याबद्दल त्यांचे आभार मानले.

# बेलासिस रोड येथील मासळी विक्रेत्यांना न्याय मिळणार

मुंबई

अखेर ताडदेव बेलासीस रोड येथील मासळी विक्री करणाऱ्या कोळी महिलांना एकविरा आई पावली आहे. या मासळी विक्रेत्यांना मुंबई महापालिकेने हुसकावून लावण्याची तयारी केली होती. मात्र मच्छीमारांनीच या विरोधात आंदोलनाचा इशारा दिल्यामुळे पालिकेने दोन पावले मागे घेत, सोमवारी पुरावे सादर करण्यासाठी वेळ दिला आहे. त्यामुळे गेल्या ५४ वर्षापेक्षा जास्त काळापासून मासळी विक्रीचा व्यवसाय करणाऱ्या कोळी महिलांना न्याय मिळणार आहे. ताडदेव येथील बेलासिस पूल येथे १९७० पासून परंपरागतरित्या ३६ मासळी विक्री दुकाने (ओटा) कार्यरत आहेत. या मासळी दुकानांमध्ये भूमिपुत्र मासळी विक्रेत्या कोळी महिला आपला उदरनिर्वाह करीत आल्या आहेत. या सर्व कोळी महिलांची महापालिकेकडे असलेल्या दप्तरात परवानाधारक म्हणून नोंद आहे. परंतु दुर्दैवाने महापालिकेतील निष्क्रिय अधिकाऱ्यांमुळे कोळी महिलांवर उपासमारीची वेळ आली आहे. पाच दशकांपासून व्यवसाय करणाऱ्या ३६ मासे विक्रेत्या कोळी महिलांपैकी फक्त ५ महिलांना परवाने देण्यात आले. अन्य ३१ महिलांच्या परवान्याचे नूतनीकरण पालिका डी विभागातील अधिकाऱ्यांनी जाणीवपूर्वक टाळले आहे. त्यात ब्रिटिशकालीन बेलाईस पुलाचे नव्याने बांधकाम करण्यात येणार असल्यामुळे पुलालगत असलेल्या अन्य दुकानदारांना पालिकेकडून नोटीस देऊन त्यांचे पुनर्वसन करण्यात येणार असल्याचे सांगितले. परंतु येथील मासळी विक्री महिलांना पालिकेकडून पुनर्वसन संदर्भात लेखी स्वरुपात काहीच दिले नाही.

पालिका प्रशासनातील काही अधिकाऱ्यांच्या मनमानी कारभाराला वाचा फोडण्यासाठी सर्व मच्छीमार संघटना एकत्रित आल्या. अखिल महाराष्ट्र मच्छिमार कृती समितीचे अध्यक्ष देवेंद्र तांडेल यांच्या नेतृत्वाखाली मासळी विक्री करणाऱ्या कोळी महिलांसह मच्छीमारांनी १० डिसेंबरला पालिकेच्या ग्रँटरोड डी विभागावर आक्रोश मोर्चा काढण्याचा इशारा दिल्यानंतर, पालिका प्रशासनाने तातडीने या महिलांकडे असलेले पुरावे तपासण्याचा निर्णय घेतला आहे. सोमवारी ९ डिसेंबरला सकाळी साडेनऊ वाजता डी विभाग सभागृह, दुसरा मजला येथे सुनावणीसाठी बोलवले आहे.

कोळी विक्रेत्या महिलांकडे योग्य कागदपत्र व अनुज्ञापत्र असल्यास त्यांना मुंबई महापालिकेच्या नियमानुसार पर्यायी जागा उपलब्ध करून देण्यात येणार असल्याचे पालिकेच्या एका वरिष्ठ अधिकाऱ्याने सांगितले. त्यामुळे परवानाधारक महिला विक्रेत्यांना न्याय मिळणार आहे.

# श्रीकर परदेशी आता मुख्यमंत्र्यांचे सचिव

मुंबई

कार्यक्षम सनदी अधिकारी अशी ओळख असणारे श्रीकर परदेशी यांची मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे सचिव म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. भारतीय प्रशासकीय सेवेतील २००१च्या तुकडीचे परदेशी हे शिंदे सरकारच्या काळात उपमुख्यमंत्री फडणवीसांचे उपसचिव म्हणून कार्यरत होते.

देवेंद्र फडणवीस यांनी गुरूवारी मुख्यमंत्री पदाची सूत्रे स्वीकारली. त्यानंतर, शुक्रवारी श्रीकर परदेशी यांची मुख्यमंत्र्यांचे सचिव म्हणून बदली करण्यात आली. १२ जुलै २०२२ पासून उपमुख्यमंत्री कार्यालयात उपसचिव म्हणून ते कार्यरत होते.महाराष्ट्र केडरच्या परदेशी यांनी राज्यातील विविध जिल्ह्यांचे जिल्हाधिकारी आणि महापालिका आयुक्त म्हणून काम केले आहे. तर, त्यांच्या कार्यक्षमतेची दखल घेत २०१५ साली पंतप्रधान कार्यालयात उपसचिव म्हणून त्यांना प्रतिनियुक्ती देण्यात आली होती. हा कालावधी संपल्यानंतर ते जून २०२१ मध्ये राज्यात परतले. त्यानंतर एक वर्ष ते प्रशिक्षणासाठी परदेशात होते. दरम्यान, एकनाथ शिंदे आणि देवेंद्र फडणवीस यांचे सरकार ३० जून २०२२ ला स्थापन झाल्यानंतर काही दिवसांमध्येच श्रीकर परदेशी यांना सिकॉमच्या व्यवस्थापकीय संचालक पदावरुन उपमुख्यमंत्र्याचे उपसचिव म्हणून नियुक्त करण्यात आली होती.

# विधिमंडळाचे हिवाळी अधिवेशन होणार पेपरलेस

मुंबई

विधिमंडळाच्या तीन दिवसांच्या विशेष अधिवेशनानंतर आता १६ डिसेंबरपासून नागपूरमध्ये विधिमंडळाचे हिवाळी अधिवेशन सुरू होणार आहे. या अधिवेशनाचे वैशिष्ट्य म्हणजे यंदाचे अधिवेशन पेपरलेस होणार आहे. म्हणजे दोन्ही सभागृहांतील प्रत्येक सदस्याच्या आसनासमोर डिजिटल स्क्रीन बसवण्यात आले आहेत. कामकाजाच्या क्रमापासून प्रश्नोत्तरे, लक्षवेधी सूचना आता कागदावर नव्हे तर लॅपटॉपच्या स्क्रीनवर दिसतील.

सध्या सुरू असलेल्या विधिमंडळाच्या विशेष अधिवेशनाच्या शेवटच्या दिवशी म्हणजे ९ डिसेंबर रोजी नागपूरमधील हिवाळी अधिवेशनाची तारीख अधिकृतपणे जाहीर होईल. विधिमंडळातील सूत्रांच्या माहितीनुसार १६ ते २१ डिसेंबर या काळात अधिवेशन होण्याची शक्यता आहे. त्या दृष्टीने नागपूरच्या विधान भवनात अधिवेशनाची जोरदार तयारी सुरू झाली आहे. यंदा सदस्यांसाठी नवी आकर्षक आसन व्यवस्था करण्यात आली आहे. नवीन आसन व्यवस्था व नव्याने टेबल तयार करण्यात आली आहे. अधिवेशनाची सर्व तयारी अंतिम टप्प्यात आली आहे. विधान परिषद आणि विधानसभा सभागृहातील प्रत्येक आमदाराच्या टेबलावर डिजिलट स्क्रीनची व्यवस्था करण्यात आली आहे. यंदा अधिवेशनाचे कामकाज डिजिटल पद्धतीने होणार आहे. सदस्याच्या समोरील टच स्क्रीनवरच सर्व सुविधा देण्यात आल्या आहेत. नव्या संसद भवनाच्या सेंट्रल व्हिस्टा आणि केरळमधील विधिमंडळाच्या सभागृहात हेच तंत्रज्ञान वापरण्यात आले आहे.

# महाविकास आघाडी रडीचा डाव खेळत आहे उपमुख्यमंत्री अजित पवार यांचा हल्लाबोल

मुंबई, दि. ८ प्रतिनिधी

महायुतीला इतके मोठे बहुमत मिळाले आहे की आता ईव्हीएमचा विषय काढून महाविकास आघाडी रडीचा डाव खेळत आहे असा थेट हल्लाबोल राष्ट्रवादी काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी शनिवारी विधानभवनाच्या पायऱ्यांवर पत्रकारांशी बोलताना केला. आम्ही महाविकास आघाडीमध्ये काम केले आहे.त्यामुळे ईव्हीएम मशीनला दोष देण्यात काहीच अर्थ नाही. लोकसभेला ईव्हीएमने ३१ जागा महाविकास आघाडीला दिल्या त्यावेळी ईव्हीएम मशीन खूप चांगली होती.मात्र विधानसभेत महायुतीच्या बाजुने जनतेने कौल दिला तर ईव्हीएमला दोष द्यायला मविआने सुरुवात केली आहे. लोकशाहीत प्रत्येकाला वक्तव्य करण्याचा अधिकार आहे. परंतु महाविकास आघाडीच्या आमदारांना शपथ घेण्याचा उद्याचा दिवस आहे. त्यांना उद्या संध्याकाळपर्यंत शपथ घ्यावीच लागेल.तरच त्यांना सोमवारी कामकाजात भाग घेता येणार आहे. याबाबतची माहिती सर्वांना आहे.परंतु पहिल्याच दिवशी आम्ही संख्येने कमी असलो तरी आम्ही काही वेगळ करतोय. त्यांचे अस्तित्व दाखवण्याचा केविलवाणा प्रकार सुरू आहे असा खोचक टोलाही पवार यांनी लगावला. सुरुवातीला महाविकास आघाडीचे आमदार शपथविधीसाठी सभागृहात बसले होते. मात्र काही वेळाने ते सर्व बाहेर निघून गेले.इतकी वर्षे मी त्यांच्यासोबत होतो तेव्हा मी चांगला होतो. मी कुणासोबत उपमुख्यमंत्री म्हणून काम केले नाही ते सांगा अशी विचारणा करत मी जर दोषी असतो किंवा भ्रष्टाचारी असतो तर त्यांनी मला उपमुख्यमंत्री केलेच नसते. मात्र सध्या ते राजकीय भूमिकेतून मला अडचणीत आणण्याचा प्रयत्न झाला.परंतु मी योग्य ठिकाणी न्याय मागत होतो आणि तो मला मिळाला आहे असेही पवार यांनी पत्रकारांच्या एका प्रश्नाला उत्तर देताना स्पष्ट केले.

# प्रतीक्षा यादीवरील 406 जणांना म्हाडाचे घर

मुंबई, दि. ८ प्रतिनिधी

महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाच्या (म्हाडा) मुंबई मंडळाच्या सोडतीत अपयशी ठरलेल्या ४०६ जणांना घर घेण्याची दुसरी संधी देण्यात आली आहे. परत आलेल्या घरांसाठी सोमवारपासून प्रतीक्षा यादी कार्यान्वित करण्यात आली आहे.

म्हाडाच्या मुंबई मंडळाची २ हजार ३० घरांची सोडत ८ ऑक्टोबरला काढण्यात आली. सोडतीत काही जणांना एकपेक्षा अधिक घरे लागली. त्यापैकी एक घर निवडून उर्वरित घरे परत करण्यात आली. अशी एकूण ४६६ घरे म्हाडाला परत मिळाली आहेत.

निवडणुकीमुळे या घरांची प्रतीक्षा यादी कार्यान्वित होण्यास विलंब झाला; मात्र आता प्रतीक्षा यादीवरील अर्जदारांना घर घेण्याची संधी मिळाली आहे. त्यांना म्हाडाकडून सूचना पत्र वितरित करण्यात आले आहे. अर्जदारांकडून स्वीकृती पत्र मिळाल्यानंतर त्यांना घरांचा ताबा देण्याची प्रक्रिया सुरू केली जाईल.

सोडतीमध्ये बांधकाम चालू असलेल्या १ हजार ३२७ सदनिका होत्या. त्यापैकी २५० सदनिका म्हाडाला परत करण्यात आल्या आहेत. परत आलेल्या घरांमध्ये या घरांची संख्या सर्वाधिक आहे. २५० पैकी १९ सदनिका अत्यल्प उत्पन्न गटातील, ३७ सदनिका अल्प उत्पन्न गटातील, मध्यम उत्पन्न गटातील १६४ आणि उच्च उत्पन्न गटातील ३० सदनिका आहेत.

विकास नियंत्रण नियमावली ३३ (५), ३३(७) अंतर्गत ३७० घरे सोडतीत होती. यापैकी १२७ घरे विजेत्यांनी स्वीकारलेली नाहीत. यात अल्प उत्पन्न गटातील ६१, मध्यम उत्पत्र गटातील ५६ आणि उच्च उत्पन्न गटातील १० घरांचा समावेश आहे. विविध ठिकाणी विखुरलेली ३३३ घरे सोडतीत होती. यापैकी ८९ घरे परत आली आहेत. यात अत्यल्प उत्पन्न गटातील ३७, अल्प उत्पत्र गटातील १ आणि उच्च उत्पन्न गटातील ५१ घरे आहेत. सर्व उत्पन्न गटातील एकूण ४६६ घरे विक्रीविना शिल्लक राहिली आहेत.

# विमान तिकीट काढून देण्याच्या बहाण्याने व्यापाऱ्याची दीड लाखांची फसवणूक

मुंबई

नेदरलँड या देशात प्रदर्शन पाहण्यासाठी जात असलेल्या कुर्ला येथील एका व्यापाऱ्याला एका भामट्याने तिकीट बुकिंगच्या नावाखाली दीड लाख रुपयांना गंडा घातला. नेदरलँड येथे पोहचल्यानंतर आरोपीच्या ही बाब लक्षात आली. त्यानुसार त्याने मायदेशी परतल्यानंतर याबाबत विनोबा भावे नगर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे. यातील तक्रारदार हरिस सिद्धीकी यांचा कुर्ला परिसरात व्यवसाय असून नोव्हेंबर महिन्यात नेदरलँड येथे एक प्रदर्शन भरवण्यात आले होते. हे प्रदर्शन पाहण्यासाठी त्यांना जायचे होते. मात्र त्यांना विमान तिकीट आणि हॉटेल तिकीट बाबत काहीही माहिती नव्हती. त्यामुळे त्यांनी जस्टडाईल या संकेतस्थळावर जाऊन याबाबत माहिती घेतली. यावेळी त्यांना याठिकाणी एका एजन्सीचा नंबर मिळाला. त्यावर त्यांनी फोन करून तिकीटची खात्री केली. यावेळी त्यांना त्याठिकाणी जाण्याचा आणि येण्याचा दीड लाख रुपये खर्च सांगण्यात आलं होता. सिद्धीकी यांनी आरोपीने सांगितल्याप्रमाणे सर्व पैसे ऑनलाईन पाठवले. त्यानुसार विमानाच्या तिकीट देखील पाठवण्यात आल्या. मात्र यातील केवळ जाण्याचीच तिकीट खरी होती. तर बाकीच्या तिकीट सर्व खोट्या होत्या. नेदरलँड येथे पोहचल्यानंतर पुढे जाण्यासाठी त्यांच्याकडे तिकीट नसल्याने पुन्हा त्यांना माघारी यावे लागले. मुंबईत आल्यानंतर त्यांनी विनोबा भावे नगर पोलीस ठाण्यात याबाबत तक्रार दाखल केली. त्यानुसार पोलिसांनी फसवणुकीचा गुन्हा दाखल करत आरोपीचा शोध सुरू केला आहे.

# रील्स करणाऱ्यांना समाज प्रबोधनाची शिक्षा

मुंबई

समाज माध्यमांवर झटपट प्रसिद्धी मिळवण्यासाठी तरुण-तरुणींकडून जीव धोक्यात घालून रील्स तयार केले जातात. भाईंदर रेल्वे स्थानकात असे कृत्य करणाऱ्या पाच तरुणांवर पश्चिम रेल्वेच्या सुरक्षा दलाने (आरपीएफ) कारवाई केली. दोषी तरुणांना रेल्वेच्या नियमांचे पालन करण्याचे आवाहन करणारे, समाज प्रबोधनाचे व्हिडीओ तयार करण्याची शिक्षा देण्यात आली आहे.

भाईंदर रेल्वे स्थानकात रुळांसह रेल्वे परिसरात रील्स तयार करून समाज माध्यमांवर अपलोड केल्याची माहिती मुंबई सेंट्रलमधील नियंत्रण कक्षाने भाईंदर आरपीएफला दिली. त्याआधारे आरपीएफ अधिकारी रोहतास सिंग आणि त्यांच्या पथकाने रील्सस्टारसह रील्स बनवण्यात मदत करणाऱ्या ध्रुव दुबे, आयान अली, ऋषी कुमार, मोहम्मद तोयब शेख, भरत पुरोहित या पाच जणांना अटक केली. हे तरुण २० ते २४ या वयोगटातील आहेत. विविध उत्पादनांच्या जाहिराती मिळवण्यासाठी रेल्वे स्थानकात रील्स तयार केल्याची कबुली या पाच जणांनी दिली. त्यांच्याविरोधात गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. वसई रोड येथील न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग न्यायालयात दोषी तरुणांनी माफी मागितली आणि पुन्हा चूक न करण्याचे आश्वासन दिले. दरम्यान, पश्चिम रेल्वे आणि आरपीएफने त्यांना रेल्वेरूळ ओलांडू नये आणि अनधिकृत व्हिडीओ तयार करू नये, असे समाज प्रबोधन करणारे व्हिडीओ तयार करण्यास सांगितले. हे व्हिडीओ पश्चिम रेल्वेच्या समाज माध्यमांवर अपलोड केले आहेत.

रेल्वेरुळ हा गाड्यांच्या वाहतुकीसाठी आहे. त्याच्या जवळ रील्स बनवणे, रुळांजवळ जीव धोक्यात घालून सेल्फी काढणे, यांमुळे जीवघेणे अपघात होण्याची शक्यता अधिक असते. रेल्वेरुळांवर रील्स आणि व्हिडीओ बनवणाऱ्यांवर फौजदारी गुन्ह्याची कारवाई करण्यात येईल, असे पश्चिम रेल्वेच्या आरपीएफकडून सांगण्यात आले.

# पोलीस पथकावर हल्ला करणाऱ्या चौघांविरुद्ध गुन्हा दाखल

मुंबई

पोलीस पथकावर हल्ला करुन सरकारी कामात अडथळा आणल्याचा प्रकार दादर परिसरात उघडकीस आला आहे. याप्रकरणी एका महिलेसह चौघांविरुद्ध दादर पोलिसांनी भारतीय न्याय सहितेच्या विविध कलमांतर्गत गुन्हा नोंदवून तपास सुरु केला आहे.

अरविंद भाऊ पावसकर, प्रविण भाऊ पावसकर, पुष्कराज भाऊ पावसकर आणि सोनाली प्रविण पावसकर अशी या चौघांची नावे असल्याचे

पोलिसांनी सांगितले. गुरुवारी दुपारी त्यांचा विरोधकासोबत क्षुल्लक कारणावरुन वाद झाला होता. ही माहिती मुख्य नियंत्रण कक्षाला प्राप्त होताच दादर पोलिसांचे एक पथक तिथे रवाना झाले होते. यावेळी पोलिसांनी दोन्ही गटातील वाद मिटविण्याचा प्रयत्न केला होता. तरीही त्यांच्यात शाब्दिक बाचाबाची सुरुच होती. त्यामुळे पोलिसांनी त्यांना चौकशीसाठी पोलीस ठाण्यात नेण्याचा प्रयत्न केला.

यावेळी पावसकर कुटुंबातील चारही आरोपींनी सहाय्यक फौजदार साळुंखे, पोलीस शिपाई आश्विनी देशमुख यांना धक्काबुक्की करुन खाली पाडले आणि नंतर हाताने बेदम मारहाण केली होती. ही माहिती मिळताच दादर पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली होती. यावेळी पोलिसांनी या चारही आरोपींना चौकशीसाठी ताब्यात घेतले होते. याप्रकरणी अश्विनी देशमुख यांच्या तक्रारीवरुन पोलिसांनी पावसकर कुटुंबियांविरुद्ध तक्रार केली होती. या तक्रारीनंतर त्यांच्याविरुद्ध पोलिसांनी गुन्हा दाखल केला.

# वैद्यकीय शिक्षण संचालकांच्या आश्वासनानंतर 'नर्सिंग'च्या विद्यार्थ्यांचे आंदोलन मागे

मुंबई

जे.जे. रुग्णालयामधील परिचर्या शिक्षण संस्थेच्या प्राचार्यपदी परिचर्या संवर्गातील प्राचार्यांची नियुक्ती करण्याचे तोंडी आश्वासन वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालयाचे संचालक डॉ. अजय चंदनवाले यांनी दिले आहे. त्यामुळे त्यांच्या विनंतीला मान देऊन मंगळवारपर्यंत आंदोलन स्थगित करण्यात येत असल्याचे परिचर्या शिक्षण संस्थेतील विद्यार्थ्यांकडून सांगण्यात आले आहे.

जे.जे. रुग्णालयामधील परिचर्या शिक्षण संस्थेच्या प्राचार्यपदी वैद्यकीय महाविद्यालयातील प्राध्यापकांची नियुक्ती वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालयाकडून करण्यात आली आहे. भारतीय परिचर्या परिषदेच्या मानांकनानुसार ही नियुक्ती गैर असल्याने परिचर्या शिक्षण पूर्ण करणाऱ्या विद्यार्थ्यांना नोंदणीसाठी अडचणी येऊ शकतात. त्यामुळे परिचर्या संवर्गातील व्यक्तीचीच नियुक्ती करावी यासाठी जे.जे. रुग्णालयातील परिचर्या शिक्षण संस्थेतील जवळपास २०० विद्यार्थ्यांनी बुधवारी सायंकाळपासून साखळी आंदोलन पुकारले होते. या आंदोलनाची दखल घेत वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालयाचे संचालक डॉ. अजय चंदनवाले यांनी गुरुवारी विद्यार्थ्यांची भेट घेतली.

यावेळी चंदनवाले यांनी विद्यार्थ्यांशी चर्चा केली. वैद्यकीय शिक्षण विभागाचे आयुक्त हे मुख्यमंत्री शपथविधी सोहळ्यासाठी गेले आहेत. त्यामुळे जे. जे. रुग्णालयातील परिचर्या शिक्षण संस्थेच्या प्राचार्यपदी परिचर्या संवर्गातील प्राचार्यांची नियुक्ती आठवडाभरात करण्यात येईल, असे आश्वासन त्यांनी विद्यार्थ्यांना देत आंदोलन मागे घेण्याची विनंती केली.

संचालकांच्या विनंतीचा मान राखत शुक्रवारी सायंकाळी विद्यार्थ्यांनी आंदोलन तात्पुरत्या स्वरूपात स्थगित करण्याचा निर्णय घेतला आहे. तसेच पुढील आठवड्यात मंगळवारपर्यंत परिचर्या संवर्गातील व्यक्तीची परिचर्या शिक्षण संस्थेच्या प्राचार्यपदी नियुक्ती करण्यासंदर्भात आदेश काढण्यात आले नाही, तर मंगळवारपासून पुन्हा साखळी आंदोलन पुकारण्यात येईल, असा इशाराही विद्यार्थ्यांनी दिला आहे.

# पाणीपट्टी वाढ लांबणार!

## महापालिका निवडणुकांमुळे सरकारची मंजुरी मिळणे अशक्य

मुंबई

विधानसभा निवडणुक झाल्यामुळे गेल्या तीन वर्षांपासून रखडलेली पाणीपट्टी वाढ करण्याचा निर्णय मुंबई महापालिकेने घेतला होता. मात्र तोंडावर असलेली मुंबई महापालिकेच्या निवडणुकीमुळे विद्यमान फडणवीस सरकारची या प्रस्तावाला मंजुरी मिळणे अशक्य आहे. त्यामुळे पाणीपट्टी वाढ पुन्हा लांबणीवर पडण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे.

जल अभियंता खात्याचा आस्थापना खर्च (कर्मचाऱ्यांचा पगार व अन्य भत्ते), प्रशासकीय खर्च, प्रचालन व परिरक्षण खर्च, विद्युत खर्च व शासनाच्या भातसा व अप्पर वैतरणा धरणातून उपसा केलेल्या पाण्याची पाणीपट्टी यांच्या एकत्रिक खर्चाचा आढावा घेऊन, दरवर्षी ८ टक्केपर्यंत पाणीपट्टीमध्ये वाढ करण्यात येते. गेल्या तीन वर्षात पाणीपट्टीत वाढ न केल्यामुळे खर्चामध्ये अजूनच वाढ झाली आहे. त्यामुळे गेल्या तीन वर्षांपासून मुंबई महापालिका पाणीपट्टी वाढ करण्यासाठी राज्य सरकारकडे परवानगी मागत आहे. पण लोकसभा, विधानसभा व मुंबई महानगरपालिकेच्या निवडणुकांमुळे सरकारनेही पाणीपट्टी वाढीस नकार दिला. विधानसभा निवडणुकीनंतर पाणीपट्टी वाढीचा मुंबई महापालिकेने निर्णय घेतला होता. याबाबतचा प्रस्ताव लवकरात नव्या सरकारच्या दरबारी सादर करण्यात येणार आहे. पण येत्या दोन ते तीन महिन्यात मुंबई महापालिकेची सार्वत्रिक निवडणूक होण्याची शक्यता असल्यामुळे या प्रस्तावावर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस स्वाक्षरी करणार नसल्याचे बोलले जात आहे.

त्यामुळे पाणीपट्टी वाढीचा निर्णय मुंबई महानगरपालिका निवडणुकीनंतरच होऊ शकतो. याबाबत जलअभियंता विभागातील एका अभियंत्याने आस्थापना खर्चासह विद्युत खर्चामध्ये मोठी वाढ होत असल्यामुळे पाणीपट्टी वाढ होणे आवश्यक आहे. स्थायी समितीने ८ टक्के पर्यंत पाणीपट्टी करण्यास प्रशासनाला अधिकार दिले आहेत. त्यामुळे प्रशासनाच्या वतीने दरवर्षी १६ जूनला पाणीपट्टीमध्ये सरासरी ५ ते ६ टक्के त्यामुळे खर्च व उत्पन्नाचा मेळ बसवणे शक्य होते. आताही तातडीने पाणीपट्टी वाढ करणे आवश्यक आहे. मात्र सरकारने परवानगी दिल्यास ती करणे शक्य होणार असल्याचेही या अभियंत्याने सांगितले.

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या दृष्टीकोनामुळे समाजात अस्पृश्यता व भेदभावाच्या विरोधात सुधारणा - राज्यपाल

मुंबई

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर अभ्यासक, शिक्षणतज्ञ, कायदेतज्ज्ञ, समाजसुधारक आणि राजकीय दूरदृष्टी असलेले एक उत्तुंग व्यक्तीमत्व होते. त्यांनी राष्ट्रासाठी दिलेले योगदान अतुलनीय आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची दृष्टी सामाजिक, आर्थिक आणि राजकीय परिवर्तनाची होती. त्यांच्या दृष्टिकोनामुळेच भारतीय समाजातील अस्पृश्यता आणि भेदभावाच्या विरोधात महत्वपूर्ण सुधारणा घडल्या असल्याचे राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांनी आज सांगितले.



दादर येथील चैत्यभूमी येथे भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या 68 व्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त अभिवादन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमात राज्यपाल श्री. राधाकृष्णन संबोधीत करीत होते.

कार्यक्रमास व्यासपीठावर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार, आमदार सर्वश्री प्रवीण दरेकर, राजकुमार बडोले, मंगलप्रभात लोढा, दीपक केसरकर, संजय बनसोडे, कालिदास कोळंबकर, अमोल मिटकरी, मुख्य सचिव सुजाता सौनिक, माजी खासदार सर्वश्री नरेंद्र जाधव, राहुल शेवाळे, अमर साबळे, बृहन्मुंबई महानगरपालिकेचे आयुक्त भूषण गगराणी, अतिरिक्त आयुक्त डॉ अश्विनी जोशी, कोकण विभागीय आयुक्त राजेश देशमुख, मुंबई शहर जिल्हाधिकारी संजय यादव, डॉ. बाबासाहेब आंबेडकर महापरिनिर्वाण दिन समन्वय समितीचे सरचिटणीस नागसेन कांबळे, समन्वय समितीचे उपाध्यक्ष महेंद्र साळवे आदी उपस्थित होते. राज्यपाल श्री. राधाकृष्णन म्हणाले, बाबासाहेब जातीयवादापासून मुक्त राष्ट्र पाहू इच्छित होते, जिथे प्रत्येक व्यक्तीला शिक्षण आणि विकासाची समान संधी मिळेल. दारिद्र्य, असमानता यांचे समूळ उच्चाटन करण्याचे सामर्थ्य केवळ शिक्षणात आहे, हे आपण जाणतो. शिक्षणाच्या विचारांना बळ देणाऱ्या डॉ. आंबेडकर यांचे इंदू मिल येथील भव्य स्मारक देशभरातील विद्यार्थी, तरुण आणि नागरिकांसाठी प्रेरणादायी ठरणार आहे. डॉ. आंबेडकरांच्या विचारांना अभिवादन करण्यासाठी महाराष्ट्रातूनच नव्हे, तर भारतातील विविध राज्यांतूनही अनुयायी येतात. त्यांचे अतूट प्रेम, आदर आणि शिस्तबद्ध आचरण खरोखरच प्रेरणादायी आहे.

## कल्याणकारी योजनांच्या माध्यमातून दुर्बलांना सशक्त करण्याचा शासनाचा प्रयत्न - उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे

मुंबई

देशाची समृद्धी ही भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी देशाला दिलेल्या संविधानामध्ये आहे. त्यांच्या विचार, आचारांवर शासनाचा कारभार आहे. त्यांनी दिलेले संविधान हे कायम आहे. बाबासाहेबांनी दिलेल्या विचारांनुसारच लोककल्याणकारी योजनांच्या माध्यमातून दुर्बलांना सशक्त करण्याचा शासनाचा प्रयत्न आहे, असे प्रतिपादन उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केले.



उपमुख्यमंत्री श्री. शिंदे म्हणाले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर नेहमी सांगायचे, सत्ता हे समाज परिवर्तनाचे हत्यार आहे. त्याचा उपयोग आम्ही विविध योजनांच्या माध्यमातून समाज कल्याणासाठी केला आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी आपल्या विद्वत्तेचा उपयोग तळागाळातील लोकांना सशक्त करण्यासाठी केला. त्यांनी केवळ भारतातच नाही, तर जगभरातील मानवी हक्कांच्या प्रतिष्ठेला वैचारिक संघटनात्मक बळ मिळवून दिले आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे विचार पुढच्या पिढीपर्यंत पोहोचविणे आवश्यक आहे. हे विचार कुठेही कमी पडणार नसून प्रत्येक जिल्ह्यात, तालुक्यात संविधान मंदिर बांधण्याचा निर्णयही घेण्यात आला आहे.

## डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांना आदर्श मानून शासनाचा कारभार - उपमुख्यमंत्री अजित पवार



मुंबई

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे विचार आणि भारतीय संविधानाला आदर्श मानून शासनाचा कारभार असणार आहे. राज्यातल्या दुर्बल, वंचित, उपेक्षित बांधवांच्या जीवनात आनंद निर्माण झाला पाहिजे, याची काळजी शासनाने कायम घेतली आहे. भविष्यातही वंचित, दुर्बल घटकांच्या कल्याणाचा विचार शासन करणार असून त्यामुळे त्यांच्या जीवनात निश्चितच आनंद निर्माण होईल, असा विश्वास उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी व्यक्त केला. उपमुख्यमंत्री श्री. पवार म्हणाले, मानवतेच्या कल्याणाचा मार्ग भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी जगाला दाखविला आहे. बाबासाहेबांच्या विचारात देशाला बंधुता, एकता व समतेमध्ये बांधून ठेवण्याची ताकद आहे. अशा या महामानवाच्या विचारांना अभिवादन करण्यासाठी त्यांच्या महापरिनिर्वाण दिनी देशभरातून लाखो अनुयायी येत असतात. येथे आलेला हा अथांग जनसागर त्याचेच प्रतिक आहे.

कार्यक्रमादरम्यान मान्यवरांच्या हस्ते माजी खासदार नरेंद्र जाधव यांच्या 'भारतीय प्रजासत्ताक साकारणारा महामानव' या पुस्तकाचे प्रकाशन करण्यात आले. त्यावेळी त्यांनी आपले मनोगत व्यक्त केले.

सर्वप्रथम भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त राज्यपाल सी.पी. राधाकृष्णन, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार तसेच इतर मान्यवरांनी पुष्पचक्र अर्पण करून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन केले. त्यानंतर बृहन्मुंबई महानगरपालिकेच्यावतीने आयोजित छायाचित्र प्रदर्शनास मान्यवरांनी यावेळी भेट दिली. यावेळी चैत्यभूमीवर हेलिकॉप्टर मधून पुष्पवृष्टी करण्यात आली.

## गोरेगावमधील स्फोटानंतर गाळ्यांचे केले सर्व्हे
### पोलीस ॲक्शन मोडवर

मुंबई

मोतीलाल नगर १ च्या हरिभाऊ रुपवते मार्गावर असलेल्या एका घराच्या समोरील गाडीमध्ये २० दिवसांपूर्वी भयंकर स्फोट झाला होता. या स्फोटानंतर पोलिस प्रशासन ॲक्शन मोडवर आले असून दुर्घटनेनंतर मोतीलाल नगर १, २, ३, सिध्दार्थ नगर, उन्नत नगरमधील घर व गाळयांचे सर्व्हे सुरु करण्यात आल्याचे प्रभारी वरिष्ठ पोलीस निरीक्षक ऋषिकेश पवळ यांनी सांगितले. या स्फोटात दोन कामगारांचा मृत्यू झाला होता. या स्फोटाने बाजूला असलेली दुचाकी अक्षरशः राख झाली. या परिसरात आतापर्यंत ४ वेळा छोटे स्फोट झाले आहेत. याबाबत स्थानिक, दक्ष नागरिक म्हाडा, पालिका, पोलिस प्रशासनाकडे तक्रारी करीत आहेत. परंतु याकडे आर्थिक जाणीवपूर्वक दुर्लक्ष केले जात आहे. नागरिकांच्या जीवानाशी खेळ सुरु आहे. मोतीलाल नगर अनेक घरांचे व्यावसायिकाकरणा बरोबरच औद्योगिककरण झाले आहे. अनेक घरांमध्ये बेकायदेशीरपणे कॅटरर्स, गोडाऊन, एसी यासारख्या ज्वलनशील वस्तूचे काम सुरु आहे. याकडे कुठलेही अनधिकृतपणे ज्वलशील वस्तू घरांमध्ये ठेवून बक्कळ पैसा कमवित आहे. परंतु आज छोटे छोटे स्फोट होत आहेत. या सर्व गोष्टींवर आळा न घातल्यास मोठा धोका संभवू शकतो. मोतीलाल नगर खाक होईल, अशी स्थिती निर्माण झाली आहे. त्यामुळे भाडयाच्या लोभापोटी गुंतवणूकदार स्थानिक नागरिकांना मृत्यूच्या दाढेत उभे करत आहेत. अशा गुंतवणूकदार व मालकांवर आता गुन्हे दाखल करण्याची वेळ आली आहे.

याबाबत गोरेगाव पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. संबंधित प्रशासन गांभीर्याने घेत नसल्यामुळे मोतीलाल नगर स्फोटाच्या उंबरठ्यावर येवून बसला आहे. दरम्यान, मुंबई मडळाच्या सहमुख्य अधिकारी वंदना सूर्यवंशी यांनी कळंबे यांना आपल्या विभागाकडून पोलिस, पालिका व संबंधित विभागांना पत्र देण्याचे निर्देशही दिले.

## गोदी कामगारांची वेतनकरार अंमलबजावणीसाठी निदर्शने

मुंबई

भारतातील बंदर व गोदी कामगारांना १ जानेवारी २०२२ पासून लागू होणारा वेतन करार २७ सप्टेंबर २०२४ रोजी मुंबई येथे संपन्न झाला. कायद्यानुसार झालेल्या या वेतन कराराची अद्याप अंमलबजावणी झाली नाही. त्यामुळे या कराराची अंमलबजावणी करावी म्हणून भारतातील प्रमुख बंदारांमध्ये कामगारांची आज तीव्र निदर्शने झाली. या निदर्शनामध्ये प्रमुख कामगार नेत्यांनी गोदी कामगारांना आंदोलनाविषयी मार्गदर्शन केले. मुंबई बंदरात आंबेडकर भवन येथे आज झालेल्या निदर्शनामध्ये मुंबई पोर्ट ट्रस्ट डॉक अँड जनरल एम्प्लॉईज युनियनचे पदाधिकारी सुधाकर अपराज, प्रदीप नलावडे, विद्याधर राणे, दत्ता खेसे, मनीष पाटील, शीला भगत, विष्णू पोळ, रमेश कुऱ्हाडे, मिर निसार युनूस, आप्पा भोसले, संतोष कदम, व इतर पदाधिकारी, ट्रान्सपोर्ट अँड डॉक वर्कर्स युनियनचे पदाधिकारी कैरसी पारेख, बबन मेटे, बापू घाडीगावकर व इतर पदाधिकारी, मुंबई पोर्ट प्राधिकरण स्थानीय लोकाधिकार समितीचे अध्यक्ष, मिलिंद घनकुटकर, मुंबई पोर्ट ट्रस्ट वर्कर्स युनियनचे विजय कांबळे, फ्लोटीला वर्कर्स असोसिएशन व मुंबई पोर्ट ट्रस्ट एससी एसटी वेल्फेअर असोसिएशनचे पदाधिकारी, या सर्वांच्या उपस्थितीत गोदी कामगारांनी प्रचंड निदर्शने केली.



## कंटेंट रायटरच्या बँक खात्यावर डल्ला

मुंबई

सायबर गुन्ह्यात कारवाईची भीती दाखवून ठगाने कंटेंट रायटर महिलेच्या बँक खात्यावर डल्ला मारल्याची घटना घडली आहे. या प्रकरणी वर्सोवा पोलिसांनी अज्ञात व्यक्ती विरोधात गुन्हा नोंद केला आहे. तक्रारदार या कंटेंट रायटर आहेत. गेल्या आठवड्यात त्याना एका नंबरवरून फोन आला. फोन करणाऱ्याने तो सायबर विभागातून बोलत असल्याचे सांगितले. काही वेळाने तो फोन एकाकडे गेला. डार्क वेब मध्ये आधारकार्ड, मोबाईल आणि ईमेल आयडी गेला असून त्याचा कोणी तरी गैर वापर करत असल्याचे तिला सांगितले. अर्ध्या तासात मीरारोड पोलीस ठाण्यात या असे तिला सांगितले. तेव्हा महिलेने पोलीस ठाण्यात येणार नकार दिला. नकार दिल्यावर ठगाने तिला डिजिटल व्हेरिफिकेशन करायचे असल्याचे सांगितले. ठगाने तिला स्काईप या अप्सवर आयडी पाठवला. त्या आयडीवर गेल्यावर एक जण पोलिसांच्या गणवेशात होता. त्याने महिलेला तिचे नाव आणि पत्ता विचारला. तसेच घरात कोणकोण राहते त्याची माहिती घेऊन फोन दुसऱ्या ठगाकडे ट्रान्सफर केला. त्या ठगाने तपशील तपासतो असे सांगत तुमच्या विरोधात मनी लौंड्रीन्गचा गुन्हा दाखल असून अटक वॉरंट व्हाट्सअप वर पाठवत असल्याचे तिला सांगितले. रात्री महिला पोलीस येऊन अटक करतील, अटक केल्यावर तुमचे करिअर खराब होईल अशी भीती दाखवली.

## पत्रकार संरक्षण कायद्याची लवकरच नोटिफिकेशन काढणार : मुख्यमंत्री

मुंबई

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मुख्यमंत्रीपदाची शपथ घेतल्यानंतर पहिल्याच पत्रकार परिषदेत पत्रकार संरक्षण कायद्याची "लवकरच नोटिफिकेशन काढून कायदयाची अंमलबजावणी करण्यात येईल" असे आश्वासन दिले आहे.



२०१७ मध्ये देवेंद्र फडणवीस पहिल्यांदा मुख्यमंत्री असताना महाराष्ट्रात पत्रकार संरक्षण कायदा झाला होता. मात्र त्याचे नोटिफिकेशन निघाले नव्हते. त्यामुळे कायदा झाला असला तरी त्याची अंमलबजावणी झालेला नाही. आज गुरुवारी देवेंद्र फडणवीस यांच्या शपथविधी नंतरच्या पहिल्याच पत्रकार परिषदेत मराठी पत्रकार परिषदेचे मुंबई विभागीय सचिव व मुंबई अधिस्वीकृती समितीचे अध्यक्ष दीपक कैतके यांनी देवेंद्र फडणवीस यांना यासंदर्भात प्रश्न विचारला असता त्यांनी "लवकरच नोटिफिकेशन काढून कायदयाची अंमलबजावणी करण्यात येईल" असे आश्वासन दिले.

एस.एम देशमुख यांच्या नेतृत्वाखाली मराठी पत्रकार परिषदेने सतत बारा वर्षे लढा दिल्यानंतर राज्यात २०१७ मध्ये पत्रकार संरक्षण कायदा झाला होता. त्यावर राष्ट्रपतींची स्वाक्षरी झाली आणि कायदा गॅझेटमध्ये आला. मात्र त्याचे राज्य सरकारने नोटिफिकेशन न काढल्याने कायदा अंमलात आलेला नाही. त्यामुळे मागील काळात पुन्हा एकदा पत्रकारांवरील हल्ले वाढले आहेत. ही बाब मराठी पत्रकार परिषदेचे मुंबई विभागीय सचिव दीपक कैतके यांनी आज मुख्यमंत्र्यांच्या निदर्शनास आणून दिली.

पत्रकार पेन्शन वाढीच्या संदर्भातही लवकरच निर्णय घेण्यात येईल असे आश्वासन मुख्यमंत्र्यांनी दिले. दरम्यान देवेंद्र फडणवीस यांची मुख्यमंत्रीपदी निवड झाल्याबद्दल परिषदेचे मुख्य विश्वस्त एस. एम. देशमुख यांनी त्यांचे अभिनंदन केले आहे. देवेंद्र फडणवीस यांच्या काळात पत्रकारांचे सर्व प्रश्न मार्गी लागतील अशी अपेक्षा एस.एम. देशमुख यांनी व्यक्त केली आहे.

## 73 वर्षीय वृद्धाची 3.81 कोटींची फसवणूक

मुंबई

मुंबईच्या क्राइम ब्रँच सायबर सेलने ७३ वर्षीय व्यक्तीची ३.८१ कोटी रुपयांची फसवणूक केल्याप्रकरणी तिघांना अटक केली आहे. आरोपींनी त्या व्यक्तीला शेअर बाजारात गुंतवणूक करून मोठा नफा मिळवून देण्याचे आमिष दाखवले होते. सतीश सूर्यनाथ यादव (२७), विकास रामशंकर मौर्य (२७) आणि सचिन कृष्णानंद चौरसिया (२३) अशी संशयितांची नावे आहेत. तक्रार आल्यानंतर बँकेसह सायबर हेल्पलाइनने फसवणूक केलेली १५ लाखांची रक्कम गोठवली. सेंट्रल सायबर सेलच्या प्रभारी निरीक्षक मौसमी पाटील यांनी खुलासा केला की, सतीश यादवने 'शिल्ड असोसिएट' नावाची बनावट कंपनी तयार केली होती. ज्यामध्ये फसवणुकीची रक्कम जमा करण्यात आली. यादवने त्याचा भागीदार विकास याच्या मदतीने कंपनीसाठी बँक खाते उघडले, जे नंतर कमिशनसाठी सायबर घोटाळेबाजांना भाड्याने देण्यात आले. तिसरा आरोपी सचिन याने फसवणुकीचे खाते उघडण्यासाठी वापरलेले सिमकार्ड दिले होते. एका अधिकाऱ्याने दिलेल्या माहितीनुसार, सायबर गुन्हेगारांनी वृद्ध व्यक्तीला शेअर बाजारात गुंतवणुकीतून मोठा नफा मिळवून देण्याचे आमिष दाखवले होते. फसवणुकीला बळी पडून, त्या व्यक्तीने ३.८१ कोटी रुपये त्यांच्या खात्यात हस्तांतरित केले, जेव्हा नफा थांबला तेव्हा त्या व्यक्तीने त्याची मूळ रक्कम काढण्याचा प्रयत्न केला, परंतु तो अयशस्वी झाला.

## झोपु कायद्याचा फेरआढावा घ्या
### सर्वोच्च न्यायालयाचे राज्य सरकारला ठोस तोडगा काढण्याचे निर्देश

मुंबई

झोपडपट्टी पुनर्वसनाच्या प्रकल्पांत बिल्डरांचा मनमानीपणा, ट्रान्झिट भाडे न देण्याची वृत्ती यामुळेच रहिवाशांना न्यायालयाची पायरी चढण्याची वेळ येते. हे चक्र सुरू होते आणि झोपड्यांचा पुनर्विकास रखडतो. त्यावर ठोस तोडगा काढण्याची गरज आहे, असे मत व्यक्त करताना उच्च न्यायालयाने राज्य सरकार काय करते. ते गप्प का? असे सवाल न्यायमूर्ती गिरीश कुलकर्णी आणि न्यायमूर्ती अद्वैत सेठना यांच्या खंडपीठाने उपस्थित करताना एसआरए प्रकल्पांतील रहिवाशांचे प्रश्न गांभीयनि विचारात घ्या, असे निर्देश राज्य सरकारला दिले.

मुंबई शहर आणि उपनगरात रडलेल्या झोपडपट्टी पुनर्वसन प्रकल्पांच्या पार्श्वभूमीवर सर्वोच्च न्यायालयाने या प्रकल्पांतील मुख्य समस्यांचा उलगडा करण्यासाठी महाराष्ट्र झोपडपट्टी क्षेत्र (सुधारणा, मंजुरी आणि पुनर्विकास) कायद्याचा (झोपु) फेरआढावा घेण्याचे आदेश उच्च न्यायालयाला दिले होते. त्या नुसार स्थापन केलेल्या न्यायमूर्ती गिरीश कुलकर्णी आणि न्यायमूर्ती अद्वैत सेठना यांच्या खंडपीठा समोर गुरूवारी सुनावणी झाली.

यावेळी राज्य सरकारच्यावतीने ॲडव्होकेट जनरल डॉ. बीरेंद्र सराफ यांनी खंडपीठाने मागील सुनावणीदरम्यान उपस्थित केलेल्या पार्श्वभूमीवर एसआरए प्रकल्पांतील रहिवाशांचे प्रश्न, त्यांच्या सूचना आदी माहिती एकत्र केली जात आहे. विशिष्ट तक्त्याद्वारे संबंधित माहिती न्यायालयासमोर सादर करू, अशी हमी न्यायालयाला यावेळी दिली.

त्याची खंडपीठाने दखल घेतली आणि रहिवाशांच्या समस्या सोडवण्यासाठी प्राधान्य द्या, प्रलंबित एसआरए प्रकल्पांच्या तपशिलामध्ये रहिवाशांच्या समस्या आणि सूचनांना विशिष्ट स्थान द्या आणि तो सविस्तर तपशील सादर करा, असे निर्देश खंडपीठाने सरकारला दिले आणि सुनावणी १४ फेब्रुवारीपर्यंत तहकूब केली. मुंबई आणि उपनगरातील मोकळी जागा आता संपुष्टात येत आहे. हाताच्यार बोटांवर मोजता येतील अशी काही मोजकी मैदाने शिल्लक आहेत. मोकळया जागेवर उभ्या राहिलेल्या झोपडपट्ट्यांचा विकास खुंटला आहे. या परिस्थितीतून मार्ग काढायचा असेल तर राज्य सरकारला वेळीच पावले उचलण्याची गरज आहे. मुबईच्या पुढील ५० वर्षाचे व्हिजन डोळयांसमोर ठेवण्याची गरज आहे, असे न्यायालयाचे म्हणणे आहे.

दरम्यान, एसआरए प्रकल्प हाती घेतल्यानंतर काही काळाने भाडे वेळेवर न देता ते थकविण्याची बिल्डरांची प्रवृत्ती वाढत आहे. त्यात रहिवाशी होरपोळून जातो. या पार्श्वभूमीवर रहिवाशांचे नुकसान टाळण्यासाठी एसआरए प्राधिकरणाने बिल्डरांना दोन वर्षांचे ट्रान्झिट भाडे जमा करण्याचे बंधन घातले आहे. मात्र एसआरएच्या या प्रस्तावाला बिल्डरांनी विरोध करीत याचिका दाखल केल्या आहेत. त्या याचिकांवरही फेब्रुवारीमध्येच सुनावणी घेण्याचे खंडपीठाने निश्चित केले आहे.

## जेजेतील नर्सिंग कॉलेजच्या प्राचार्य नियुक्तीविरोधात विद्यार्थ्यांचे आंदोलन

मुंबई

जे. जे. रुग्णालयाच्या अंतर्गत असलेल्या इन्स्टिट्यूट ऑफ नर्सिंग एज्युकेशन कॉलेज या पदव्युत्तर नर्सिंग क्षेत्रात शिक्षण देणाऱ्या संस्थेच्या रुग्णालय प्राचार्यपदी नुकतीच वैद्यकीय शिक्षण विभागाने रुग्णालयातील वरिष्ठ डॉक्टरांची नेमणूक केली आहे. या नेमणुकीला कॉलेजच्या विद्यार्थ्यांनी विरोध केला असून नर्सिंग संवर्गातील प्राध्यापकाची प्राचार्यपदी नियुक्ती करावी, या मागणीसाठी आंदोलन सुरू केले आहे. इन्स्टिट्यूट ऑफ नर्सिंग एज्युकेशन हे कॉलेज ६५ वर्षांपेक्षा जुने असून त्या ठिकाणी आतापर्यंत नर्सिंग संवर्गातील व्यक्तीच प्राचार्यपदावर काम करत आली आहे. नवी दिल्ली येथील भारतीय परिचर्या परिषद, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठांच्या मांकनानुसार परिचर्या महाविद्यालयात प्राचार्य पदाकरिता नर्सिंग संवर्गातील प्राध्यापकाची प्राचार्यपदी नियुक्ती करावी, या मागणीसाठी आंदोलनात सहभागी झालेले विद्यार्थी नर्सिंग संवर्गातील व्यक्तीला प्राचार्यपदी नेमावे, अशी मागणी केली आहे. या मागणीसाठी २०० पेक्षा जास्त विद्यार्थी आंदोलनात सहभागी झाले होते. दरम्यान, प्राचार्यपदी कोणती व्यवत्ती योग्य आहे, नर्सिंग कॉन्सिलचे काय नियम आहे, याचा अभ्यास केला जाईल, त्यानंतर या प्रकरणी योग्य तो निर्णय घेतला जाईल, असे आयुक्त, राजीव निवतकर यांनी सांगितले.

## सहा कोटींच्या फसवणूक प्रकरणी
### महाविद्यालयाच्या प्राचार्यांसह चौघांविरोधात गुन्हा

मुंबई

अंधेरी येथील एका तांत्रिक महाविद्यायाचे प्राचार्य, माजी नाचार्य आणि इतर दोन जणांविरुद्ध ६ कोटी रुपयांच्या फसवणूकप्रकरणी बुधवारी आर्थिक गुन्हे शाखेने गुन्हा दाखल केला. मुंबई युनिव्हर्सिटी ॲण्ड कॉलेज टीचर्स असोसिएशनचे (मुक्ता) सरचिटणीस सुभाष आठवले यांच्या तक्रारीवरून आर्थिक गुन्हे शाखा या प्रकरणी तपास करत आहे.

आरोपींनी खोट्या माहितीच्या आधारे महाविद्यालयाचे शुल्क वाढवण्यास मान्यता मिळवली आणि नंतर विद्यार्थ्यांकडून ते वसूल केले, असा आरोप तक्रारीत करण्यात आला आहे.

आठवले यांनी माहिती अधिकारांतर्गत माहिती काढून याबाबत पुरावे गोळा करून पोलिसांकडे तक्रार केली आहे. तक्रारीनुसार, आरोपींनी त्यांच्या सहकाऱ्यांच्या मदतीने २०१६-१७ ते २०२१-२२ या शैक्षणिक वर्षांमध्ये महाविद्यालयातील गैरशिक्षक कर्मचाऱ्यांच्या नावाने बनावट व्यक्तींच्या नोंदी केल्या. प्रयोगशाळा सहाय्यक, प्रशासकीय अधिकारी इत्यादी नोकरीवर असल्याचे दाखवण्यात आले. या प्रकरणी सहा वर्षांपासून दरवर्षी एक कोटी सहा लाख रुपयांचा वेतन खर्च दाखवला. यासाठी त्यांनी बनावट नियुक्ती पत्रे, हजेरी नोंद, पगाराच्या पावत्या, भविष्य निर्वाह निधीच्या नोंदी, बॅलन्स शीट्स इत्यादी तयार केल्या.

## ईडीकडून 12 कोटींच्या मालमत्तेवर टाच

मुंबई

रक्तचंदनाच्या तस्करीप्रकरणातील आरोपी बादशाह माजिद मलिक, चंद्रकांत भन्साली व धर्मेश राव यांच्याशी संबंधित १२ कोटी ४४ लाख रुपयांच्या मालमत्तेवर सक्तवसुली संचालनालयाने (ईडी) टाच आणली. महसूल गुप्तवार्ता संचालनालयाने (डीआरआय) ७८०० मेट्रिक टन रक्तचंदन नवी मुंबईतून २०१५ मध्ये जप्त केले होते. त्या प्रकरणात ईडीही तपास करीत आहे. बादशाह माजिद मलिक, विजय सुब्बण्णा पुजारी आणि इतरांविरुद्ध रक्तचंदन तस्करीप्रकरणी डीआरआयने सीमाशुल्क कायद्याअंतर्गत गुन्हा दाखल केला होता. आरोपी कपड्यांचा डिंक, रेडिएटर्स व रंग मिश्रणाच्या नावाखाली रक्तचंदनाची तस्करी करीत होते. त्यासाठी सेझ क्षेत्रातील कंपन्यांच्या नावाने बनावट कागदपत्रे तयार करण्यात आली होती. याप्रकरणी ईडीनेही तपासाला सुरुवात केली. आरोपी मलिक २००८ ते २०१० आणि २०१४ ते २०१५ या कालावधीत रक्तचंदनाच्या तस्करीत सक्रिय होता. आरोपीने त्या काळात तस्करीतून ९४ कोटी रुपयांची मालमत्ता कमवली होती. आरोपीने ही रक्कम चलनात आणण्यासाठी मेसर्स एम्पायर इंडिया मल्टी ट्रेड प्रायव्हेट लिमिटेड नावाची कंपनी स्थापन केली.

## गुजरातधार्जिण्या नव्या भाजपा सरकारने महाराष्ट्राच्या स्वाभिमानाला धक्का लावू नये: नाना पटोले

मुंबई

निवडणूक आयोगाच्या मदतीने मतमोजणीत घोटाळे करुन महाराष्ट्रात जनतेच्या मतांची चोरी करणारे सरकार राज्यात स्थापन झाले आहे. चोरीचे बहुमत असतानाही नव्या सरकारची स्थापनाच वादाने झाली असून या तीन पक्षातील अंतर्गत वादामुळे महाराष्ट्राची प्रतिमा देशात मलीन झाली आहे. महाराष्ट्राच्या माथी पुन्हा गुजरातधार्जिणे सरकार बसले असले तरी छत्रपती शिवाजी महाराज, शाहू महाराज, फुले, आंबेडकर यांच्या महाराष्ट्राच्या स्वाभिमानाला धक्का लावू नये, असे महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष नाना पटोले यांनी म्हटले आहे.

नव्या सरकारच्या स्थापनेसंदर्भात बोलताना काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले म्हणाले की, महायुतीकडे बहुमत असतानाही सरकार स्थापन्यासाठी कसरत करावी लागली. एकनाथ शिंदे व अजित पवार यांना या सरकारमध्ये फारसे महत्व दिले जाईल असे वाटत नाही. दिल्लीत वाऱ्या करुन मंत्रीपदांची भिक मागण्याची वेळ या दोघांवर आली. मोदी शाह यांच्या मेहरबानीवर शिंदे, अजित पवार सरकारमध्ये असतील. एकनाथ शिंदे यांची तर भाजपाला आता काहीच गरज नाही त्यामुळे बहुमत मिळाल्यापासूनच शिंदे व अजित पवारांना भाजपा व मोदी शाह यांनी जागा दाखवून दिली आहे. भाजपाने पुन्हा एकदा दोन प्रादेशिक पक्षांना संपवले आहे.



भाजपाचे सरकार स्थापन झाले असून निवडणूक त्यांनी दिलेली आश्वासने पूर्ण करावी लागतील. शेतकरी कर्जमाफी, कृषी पंपाची विज बिल माफ, लाडक्या बहिणींना दरमहा २१०० रुपये, २.५ रिक्त सरकारी पदांची भरती याची तातडीने अंमलबजावणी करावी. काँग्रेस पक्षाची विधानसभेतील संख्या कमी झाली आहे परंतु हिम्मत व ताकद कायम असून जनतेच्या प्रश्नांवर सरकारला जाब विचारल्याशिवाय स्वस्थ बसणार नाही असेही नाना पटोले म्हणाले.

मराठी अक्रॉस मुंबई

# संपादकीय

## अभूतपूर्व सोहळा

आज आझाद मैदानावर आझादीनंतर महाराष्ट्र सरकार स्थापन करण्याचे सर्वात मोठे शक्तिप्रदर्शन अत्यंत नेत्रदीपक ठरले. अगदी ठरल्याप्रमाणे पंतप्रधान नरेंद्र मोदी आले. दुपारी गृहमंत्री अमित शहा यांनी ज्या काही थोड्या बहुत कुरबुरी होत्या, त्याचे शमन केले. महायुतीचे तमाम केंद्रीय मंत्री, देशातील अनेक दिग्गज नेते आणि 16 राज्याचे मुख्यमंत्री यांनी नेत्रदीपक समारंभासाठी उपस्थित होते. साधारणपणे अर्धा ते पाऊण तासाचा हा सोहळा या सरकारची कारकीर्द अर्धी होईपर्यंत स्मरणात राहील. लाडक्या बहिणीच्या भगव्या साड्या आणि अधिसिद्धांची पुणेरी पगडी, याची देही अशी डोळा ज्यांना पाहण्याचे भाग्य लाभले. ते भाराहून गेले, तर त्यात नवल नाही. निवडणुकीत विजय मिळवणे महत्त्वाचे असते. निवडणूक म्हणजे एक युद्धच आहे. मग युद्धात आणि प्रेमात सगळे काही क्षम्य असतेच. विरोधकांनाही आता पाच वर्ष या सरकारला झेलणे भाग आहे. मुख्यमंत्री पदावर आरुढ झाल्यावर काळजीवाहू मुख्यमंत्री आणि काळजी करणारे मुख्यमंत्री या दोघांच्याही पदात फक्त 'उप पदाचा' फरक झालेला आहे. तिकडचा उप इकडे आला आहे. बाकी तीनही त्रिमूर्ती मूर्तीमंत उत्साहाने पदावर आरुढ झालेले आहेत. महाराष्ट्राच्या गादीवर विराजमान होणे. म्हणजे देशाच्या आर्थिक नाड्या ज्या राज्याच्या हातात आहेत. त्या राज्याचे थोरपण समजून घेण्यासाठी कोण्या पंडिताची गरज नाही. ते स्वयंसिद्ध आहे. पाच ते दहा राज्यांच्या अर्थसंकल्पापेक्षा मुंबई महानगरपालिकेचा अर्थसंकल्प मोठा असतो. एकटी मुंबई जेवढा कर देशाला प्रदान करते. तेवढा कर पाच ते दहा राज्यही देत नाहीत, ही वस्तुस्थिती आहे. महाराष्ट्र आज जे करतो. त्याची नक्कल संपूर्ण देशात होत असते. साधे मनरेगाचे उदाहरण घ्या. महाराष्ट्राने रोजगार हमी योजना सुरू केली. मनरेगा ही त्याची नक्कल आहे. म्हणजेच देशाला दिशा देण्याचे कार्य करण्यात सर्वात आघाडीवर फक्त महाराष्ट्र आहे. सेनापती बापट नेहमी म्हणायचे, 'महाराष्ट्रा विना राष्ट्रगाडा न चाले' ही ओळ किती समर्पक आहे. त्याची प्रचिती लगेच येते. आताही राष्ट्राचा गाडा चालवणारा महाराष्ट्र आणि त्याचाच गाडा चालविणारे धुरकरी आता अस्सल नागपुरी देवेंद्र फडणवीस झालेले आहेत. आता 2024 च्या नंतरचे पुढचे वर्ष महाराष्ट्राचे आणि विशेष म्हणजे झिरो माइल वरच्या नागपुरात मुख्यालय असलेल्या राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे आहे. यावर्षी संघाला 100 वर्षे पूर्ण होत आहेत. या संघाच्या शंभरीला महाराष्ट्राने दिलेली ही आदरांजलीच म्हणावी लागेल. आज भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा महापरिनिर्वाण दिन आहे. दीक्षा सोहळाही नागपुरातच झाला होता. अशा दीक्षाभूमी आणि संघ भूमीचे प्रतिनिधी म्हणून देवेंद्रजी या राज्याचा शकट अत्यंत कुशलतेने चालवतील, यात आमच्या मनात शंका नाही. जवळजवळ संपूर्ण देशाचे नेतृत्व, कर्तृत्व आज मुंबईत आझाद मैदानामध्ये अवतरीत झाले होते सव्वा घटिकेचा हा अभूतपूर्व शुभ सोहळा आनंददायी ठरला, नेत्रदीपक ठरला. तो महाराष्ट्राच्या म्हणजे महाराष्ट्राच्या जनतेसाठीही भाग्यवान ठरो. हीच महाराष्ट्रातील प्रत्येक मराठी माणसाची मनीषा आहे. महाराष्ट्राच्या सध्याच्या तिन्ही भाग्यविधात्यांना व त्यांच्या भावी सहकाऱ्यांना कोटी कोटी शुभेच्छा आणि आज डॉ. बाबासाहेब आंबेडकर आज महापरिनिर्वाण दिन आहे. या महापरिनिर्वाण दिनानिमित्त भारतरत्न असलेल्या या महामानवाला कोटी कोटी वंदना !

## गडकरी यांची व्यथा

भारताचे केंद्रीय रस्ते वाहतूक मंत्री नितीनजी गडकरी हे महाराष्ट्राचे विरोधी पक्ष नेते असताना त्यांना अपघात झाला होता. त्यामुळे त्यांच्या पायाला जबर दुखापत झाली होती. यामुळेच त्यांच्याकडे जे खाते आहे. त्या रस्ते वाहतूक खात्याचे मंत्री असताना अपघात होऊ नये, म्हणून काय काय केले पाहिजे. याबाबतीत ते अत्यंत दक्ष असतात. कालच आपल्या लोकसभेत वाढत्या रस्ते अपघाताबाबत त्यांनी चिंता व्यक्त केली. त्यासोबतच याबाबतची व्यथा मांडली म्हणून ही चर्चा अत्यंत महत्वाची आहे. आपल्या देशात कुठेही गेले, तरी रस्त्यावर वाहन चालवणाऱ्या बहुतेक वाहन चालकांना नियम न पाळण्यात मोठी बहादुरी वाटते. दुचाकी वर हेल्मेट न घालता गाडी चालवणे. त्यासोबतच सिग्नलचा दिवा लाल असताना न थांबता आपली गाडी आहे. त्यापेक्षा दुप्पट वेगाने दामटणे. त्यासोबतच मोठमोठ्या राजमार्गावर (म्हणजे हायवेवर) वेग-मर्यादेपेक्षा जास्त वेगाने आपले वाहन सुसाट बेभानपणे चालवणे. या आणि अशा बऱ्याच काही गोष्टी सर्रास आणि सर्वसामान्यपणे 70 ते 80 टक्के लोक करीत असतात. नियमाने चालल्यावर काय होते. याचा आम्हाला अनुभव नागपूर शहरात आला होता. लाल दिवा असताना आम्ही एकटेच लाल दिव्याचा सन्मान राखण्यासाठी दुचाकीवर उभे राहिलेले वाहन चालक होतो. आमच्या मागून भराभर उजवी आणि डावीकडून वाहने येत होती आणि तेवढ्याच वेगाने जात होती. एका ऑटो वाल्याने अगदी आमच्या जवळून जाताना, आमच्या पायाच्या बोटावरून वाहन पुढे नेले आणि आम्ही जोरात ओरडल्यावर त्याने मागे पाहिले आणि तो ऑटो रिक्षावाला सरळ आम्हाला म्हणाला, क्या पगले जैसा खडा है? त्यानंतर समृद्धी महामार्गाचा असाच अनुभव आमच्या एका अत्यंत जवळच्या मित्राने सांगितला. त्या महामार्गाची प्रशंसा करताना तो म्हणाला, काय मस्त रस्ता आहे, मी चार तासात औरंगाबाद म्हणजेच आताच्या संभाजीनगर वरून नागपूरला पोहोचलो. आम्ही त्याला न राहवून विचारले, गाडीचा वेग किती होता? तेव्हा तो म्हणाला आमची गाडी 150 ते 160 च्या खाली कधी आलीच नाही. आम्ही त्याला सहजच म्हटले की, त्या मार्गावर ठिकठिकाणी जास्तीत जास्त 120 किमी. प्रतीतास पेक्षा वेगाने वाहन चालवू नये असे नियम आहेत. मग तुम्ही हा मूर्खपणा का केला. तेव्हा तो अगदी बेफिकीरपणे म्हणाला. साहेब गाडी फॉरेनची त्यात रस्ता रिकामा, मग माझी गाडी बैलगाडी सारखी चालवू की काय? ही दोन प्रातिनिधिक उदाहरणे म्हणून दिलेली आहेत. नितीनजी म्हणतात त्याप्रमाणे रस्त्यावर चालताना कोणीही कायद्याचे पालन करीत नाही. लोकांना कायद्याचा अजिबात धाक वाटत नाही. वाहने चालवताना कायदा मोडला तर दंडाच्या रकमेतही वाढ केली आहे. पण निदान महाराष्ट्रातील दंडाची रक्कम तरी दहा टक्केही वसूल होत नाही असे दिसते. कायद्याची अंमलबजावणी करण्यासाठी लोकशिक्षण अत्यावश्यक आहे, असे गडकरी म्हणतात. पण लोकशिक्षण कोणाला द्यावे, हा एक मोठाच प्रश्न आहे. कारण आता आपल्या देशातील दोन चाकी आणि चार चाकी वाहनांची संख्या इतकी वाढलेली आहे की, या वाहन चालकांना शिकवणे आणि नियमांचे पालन करण्यासाठी धीर टिकवणे. या गोष्टी जवळजवळ अशक्यप्राय आहेत. रस्ते अपघातात कोणालाही मरण येऊ नये. म्हणून आता आपल्या महाराष्ट्र सरकारने दुचाकीच्या मागे बसलेल्या लोकांनाही हेल्मेट घालणे बंधनकारक केलेले आहे. पण दुचाकी वर तीन किंवा साडेतीन लोक बसले असतील. तर त्यासाठी किमान चार हेल्मेट लागतील. हे चार हेल्मेट ठेवण्यासाठी मोठा थैला किंवा पोतेही लागेल. समजा ती व्यवस्थाही सरकारने केली. तरी त्यात थैलीतून ही हेल्मेटस काढून डोक्यात घालून वापरायला कुणाला वेळ आहे. नितीन गडकरींचा अपघात झाल्याने आपण अपघाताबाबत संवेदनशील असतो, असे ते म्हणाले. मात्र आतापर्यंत पूर्ण प्रयत्न करूनही एक वर्षांमध्ये 1.68 लाख लोक मृत्यूमुखी पडलेले आहेत. लोकप्रतिनिधी, माध्यमे आणि समाज यांच्या सहकार्याने हे प्रमाण कमी होऊ शकते. असा आशावाद नितीनजींनी व्यक्त केलेला आहे. पण यातील मेख अशी आहे की, आमच्या नागरिकांना नियम वगैरे पाळणे म्हणजे स्वतःची प्रतिष्ठा कमी झाल्याचा विषय वाटतो. देशातील कुठल्याही वर्तमानपत्रात अपघाताची बातमी नाही. असा दिवस शोधूनही सापडत नाही. अशी ही आपल्या देशातील रस्ते वाहतुकीची कथा आहे आणि देशाच्या रस्ते वाहतूक मंत्र्यांनी हतबल झाल्यासारखी मांडलेली व्यथा आहे. इति श्री नितीन गडकरी कथित अपघात पुराण संपूर्णम् !

# न्यूमोनियाच्या आव्हानाविरुद्ध आरोग्याची नवी लढाई

मायक्रोबायोलॉजिस्ट लुई पाश्चर आणि जॉर्ज स्टर्नबर्ग यांनी शतकभरापूर्वी पहिल्यांदा ओळखलेला स्ट्रेप्टोकोकस न्यूमोनिया बॅक्टेरिया मानवजातीचा सर्वात मोठा शत्रू बनला आहे. दरवर्षी, न्यूमोनिया जगभरातील मृत्यूच्या प्रमुख कारणांपैकी एक आहे, विशेषत: कमी आणि मध्यम उत्पन्न असलेल्या देशांमध्ये जिथे आरोग्यसेवा मर्यादित आहे. भारतातील मृतांचा आकडा धक्कादायक असून दरवर्षी पाच वर्षांखालील 1,27,000 हून अधिक मुले न्यूमोनियाने दगावतात. या वयोगटातील मृत्यूंपैकी हे प्रमाण 14 टक्के आहे. 12 नोव्हेंबर रोजी साजरा केला जाणारा जागतिक न्यूमोनिया दिन या मृत्यूंची आणि प्रतिबंधात्मक उपाययोजनांच्या तातडीच्या गरजेची आठवण करून देतो.

न्यूमोनियाचा भार भारतातील सर्वात असुरक्षित नागरिकांवर पडतो: मुले, वृद्ध, कुपोषित आणि तीव्र आजारांनी ग्रस्त असलेले. गर्दीच्या शहरांमधील हवेची खराब गुणवत्ता आणि स्वयंपाकासाठी घन इंधनाचा वापर यामुळे हा बोजा वाढतो. मात्र, त्याचा भार केवळ रुग्णांवरच नाही तर त्यांच्या कुटुंबीयांवरही पडतो. वृद्ध रूग्णाच्या उपचारासाठी सरासरी 25.6 अमेरिकन डॉलर्स खर्च येतो आणि याशिवाय त्यांची उत्पादकताही या काळात कमी होते.

जोखीम लक्षात घेता कृती करण्याची अपरिहार्यता स्पष्ट आहे. देशभरात न्यूमोकोकल लसीकरणाच्या विस्तारामुळे लाखो प्रकरणे रोखता येतील आणि पाच वर्षांत आरोग्यसेवा खर्चामध्ये 1 अब्ज अमेरिकन डॉलर्सपेक्षा जास्त बचत होईल. यामुळे प्रतिबंधक गुंतवणुकीचे वैद्यकीय आणि आर्थिक फायदे दोन्ही अधोरेखित होतात.

**न्यूमोनियाचे ओझे**

न्यूमोनिया हे चिंतेचे प्रमुख कारण आहे, विशेषत: पाच वर्षांखालील मुलांसाठी. 2015 मध्ये मध्य प्रदेश आणि उत्तर प्रदेश सारख्या राज्यांमध्ये दर 1000 मुलांमागे 500 पेक्षा जास्त प्रकरणे नोंदविली गेली, ज्यावरून असे दिसून येते की काही क्षेत्रांमध्ये हा भार तीव्र असू शकतो. 65 किंवा त्यापेक्षा जास्त वयाच्या प्रौढांमध्ये, न्यूमोनियाबद्दल माहिती मर्यादित आहे. स्ट्रेप्टोकोकस न्यूमोनिया समुदाय-अधिग्रहित न्यूमोनिया (सीएपी) चे प्रमुख कारण म्हणून ओळखले गेले आहे, जे जागतिक बॅक्टेरियाच्या न्यूमोनियाच्या सुमारे दोन तृतीयांश प्रकरणांसाठी जबाबदार आहे. याला कारणीभूत असलेल्या इतर रोगजनकांमध्ये क्लेबसिला न्यूमोनिया, स्टॅफिलोकोकस ऑरियस, हेमोफिलस इन्फ्लूएन्झा प्रकार बी (एचआयबी) आणि श्वसन सिंसिटियल व्हायरस (आरएसव्ही) यांचा समावेश आहे, जो विशेषतः पाच वर्षाखालील मुलांना लक्ष्य करतो. या संसर्गाचे प्रमाण सामाजिक-आर्थिक आणि पर्यावरणीय घटकांच्या भरभराटीमुळे चालते जे एखाद्याच्या संसर्गाची संवेदनशीलता वाढवू शकतात आणि पुरेशी आणि वेळेवर काळजी घेण्यास मर्यादित करू शकतात.

सामाजिक-आर्थिक परिस्थिती भारतातील न्यूमोनियाच्या ओझ्याला खोलवर आकार देते. दारिद्र्यामुळे आरोग्यसेवा, पौष्टिक अन्न आणि योग्य निवारा मिळणे मर्यादित होते - हे सर्व संसर्ग रोखणाऱ्या चांगल्या रोगप्रतिकारक शक्तीसाठी आवश्यक आहे. कमी सामाजिक-आर्थिक स्थिती असलेल्या बहुतेक घरांमध्ये गर्दी आणि अस्वच्छता आहे. अशा कुटुंबातील लोक अनेकदा खराब हवेशीर घरांमध्ये राहतात, जिथे श्वसन संक्रमण पसरण्याची शक्यता जास्त असते.

अनेक गरीब कुटुंबे अजूनही स्वयंपाक आणि उष्णतेसाठी लाकूड किंवा शेण यासारख्या घन इंधनावर अवलंबून असल्याने हा धोका वाढला आहे, ज्यामुळे बालपणातील श्वसन संसर्गाचे प्रमाण दुप्पट



होते आणि जागतिक स्तरावर पाच वर्षांखालील मुलांमध्ये न्यूमोनियाच्या मृत्यूचे प्रमाण 44 टक्के आहे. शैक्षणिक पातळी, विशेषत: आई किंवा प्राथमिक काळजीवाहक, आरोग्य जागरूकता आणि आरोग्यसेवा शोधण्याच्या वर्तणुकीवर परिणाम करते. कमी शिक्षित काळजीवाहकास लवकर लक्षणे दिसू शकत नाहीत किंवा लसींच्या उपलब्धतेबद्दल माहित नसते, ज्यामुळे आरोग्य सुविधांमध्ये अहवाल देण्यास लागणारा वेळ उशीर होतो, ज्यामुळे मृत्यूदर वाढतो. ग्रामीण भागात जेथे आरोग्य सेवा मर्यादित आहेत आणि आरोग्य शिक्षण प्रकल्पांमध्ये प्रवेश करणे कठीण आहे तेथे हे अधिक पाहिले जाऊ शकते.

कमी सामाजिक-आर्थिक स्थिती असलेल्या बहुतेक घरांमध्ये गर्दी आणि अस्वच्छता आढळून येते.

आरोग्याच्या पायाभूत सुविधांमधील गंभीर त्रुटींमुळे भारतातील न्यूमोनियाचा सामना करण्याची समस्या आणखी वाढली आहे. लॉजिस्टिक समस्या आणि अज्ञानामुळे लसींचे कव्हरेज तुटपुंजे आहे. ग्रामीण आणि देशातील इतर वंचित भागात न्यूमोनियाच्या उपचारांसाठी आवश्यक असलेल्या कुशल आरोग्य कर्मचारी आणि ऑक्सिजन थेरपी युनिटसह प्रमुख वैद्यकीय उपभोग्य वस्तूंची कमतरता आहे. अँटीमाइक्रोबियल रेझिस्टन्स (एएमआर) ही समस्या आणखीनच बिकट बनवते, कारण प्रतिरोधक रोगजंतूमुळे रुग्णालयात जास्त काळ वास्तव्य होऊ शकते आणि परिणामी महागड्या ब्रॉड-स्पेक्ट्रम अँटीबायोटिक्सचा वापर होऊ शकतो, ज्यामुळे मृत्यूदर आणि आरोग्यसेवेचा खर्च वाढतो. न्यूमोनियाला या सततच्या धोक्याविरूद्ध लवचिकता निर्माण करण्यासाठी आरोग्य प्रवेश, सार्वजनिक शिक्षण, पोषण कार्यक्रम, स्वच्छ स्वयंपाक तंत्रज्ञान आणि एएमआर नियंत्रण प्रयत्नांमध्ये लक्ष्यित गुंतवणुकीची आवश्यकता असेल.

**प्रौढांची लसीकरणामध्ये भूमिका**

भारतात बहुसंख्य लोकांसाठी लसीकरण हे लहान मुलांच्या लसीकरणासारखाच आहे. तथापि, वृद्ध लोकसंख्येमध्ये, न्यूमोनियामुळे होणारा मृत्यू इतका सामान्य आहे की त्याला बऱ्याचदा "मृत्यूचा कॅप्टन" म्हटले जाते आणि हे सिद्ध झाले आहे की न्यूमोकोकल लसीकरण न्यूमोनियाच्या प्रकरणांच्या मोठ्या उपसंचातील तीव्रतेला प्रतिबंधित करते किंवा कमी करते. तथापि, इंडो-पॅसिफिकमधील लसीकरणासंदर्भात 2010 ते 2020 दरम्यान संशोधन लेखांचे सर्वेक्षण केलेल्या पुनरावलोकनात असे आढळले आहे की भारतातील प्रौढ न्यूमोकोकल लसीकरण दर या प्रदेशात सर्वात कमी आहे.

हे न्यूमोकोकल लसींसाठी विशिष्ट नाही आणि भारतातील प्रौढ लसीकरण दर अत्यंत कमी असलेल्या व्यापक प्रवृत्तीचे प्रतिबिंब आहे. 2020 मध्ये प्रकाशित झालेल्या साहित्य सर्वेक्षणात असे आढळले आहे की भारतात प्रौढ लसीकरणाचे कव्हरेज "नगण्य" आहे, ज्यात मुख्य अडथळा म्हणजे राष्ट्रीय प्रौढ लसीकरण मार्गदर्शक तत्त्वांचा अभाव.

इंडो-पॅसिफिक मधील लसीकरणासंदर्भात २०१० ते २०२० या कालावधीत संशोधन लेखांचे सर्वेक्षण केलेल्या पुनरावलोकनात असे आढळले आहे की भारतातील प्रौढ न्यूमोकोकल लसीकरण दर या प्रदेशात सर्वात कमी आहे.

इतिहासात प्रथमच लॉन्गिट्यूडिनल एजिंग स्टडी इन इंडिया (एलएएसआय) 2017-18 ने संपूर्ण भारतातील वृद्ध प्रौढांच्या (45 वर्षांवरील) लसीकरण कव्हरेजची आकडेवारी गोळा केली. या सर्वेक्षणात समाविष्ट असलेल्या चार श्रेणींमध्ये म्हणजे इन्फ्लूएन्झा, न्यूमोकोकल, टायफॉइड आणि हिपॅटायटीस बी लस या चार श्रेणींमध्ये 45 वर्षांवरील उत्तरदात्यांचे प्रमाण 1.5 टक्के होते. आकृती 1 दर्शविते की, न्यूमोकोकल लसीकरणात वृद्ध पुरुष आणि स्त्रिया या दोन्ही वयोगटांमध्ये सर्वात कमी कव्हरेज आहे. जागतिक आरोग्य संघटनेच्या (डब्ल्यूएचओ) बुलेटिनमध्ये 2022 मध्ये प्रकाशित झालेल्या विश्लेषणात असे दिसून आले आहे की पुरुष, शहरी रहिवासी, श्रीमंत कुटुंब, अधिक वर्षांचे शालेय शिक्षण, विद्यमान वैद्यकीय परिस्थिती आणि गतिहीन वर्तन हे सर्व लस घेण्याचे महत्त्वपूर्ण भविष्यवर्तक होते. वृद्ध लोकांमध्ये न्यूमोनियासारख्या लस-प्रतिबंधित परिस्थितीचा उच्च सामाजिक आणि आर्थिक खर्च लक्षात घेता, अशा कमी लसीकरण कव्हरेजवर त्वरित धोरणात्मक लक्ष देण्याची आवश्यकता आहे.

**देशावर होणारा आर्थिक परिणाम**

न्यूमोनियाचा आरोग्यावर होणारा परिणाम याशिवाय, कुटुंबे आणि आरोग्य व्यवस्था या दोन्हींवर आर्थिक बोजा पडतो. उपचारांचा थेट खर्च मोठा आहे. त्यामध्ये रुग्णालयात दाखल करणे, औषधोपचार, निदान आणि इतर आरोग्य सेवांचा समावेश आहे. 2014 च्या अभ्यासानुसार लोकसंख्याशास्त्रीय वैशिष्ट्यांशी जुळवून घेतल्यानंतर व्हेंटिलेटरशी संबंधित न्यूमोनिया (व्हीएपी) साठी 249,199 रुपये खर्च येत असल्याचा अंदाज आहे. 2024 च्या दुसऱ्या अभ्यासानुसार, समुदाय-अधिग्रहित न्यूमोनिया (सीएपी) ची किंमत सुविधांमध्ये वेगवेगळी होती, खाजगी रुग्णालयांमध्ये सरासरी 210,862 रुपये आणि अंतर्गत उपचारासाठी सरकारी रुग्णालयांमध्ये 5,575 रुपये खर्च येत असून, तसेच खाजगी मध्ये 4,121 रुपये आणि बाह्यरुग्ण उपचारांसाठी सरकारी सुविधांमध्ये 200 रुपये खर्च अपेक्षित आहे.

उत्पादकता कमी होणे, काळजी घेणाऱ्यांवरचा भार आणि आर्थिक ताण विशेषत: कमी उत्पन्न असलेल्या कुटुंबांवरील आर्थिक ताण यासारख्या अप्रत्यक्ष खर्चांमुळे आर्थिक फटका आणखी वाढतो. सीएपी रूग्णांना दीर्घकाळ खोकला आणि थकवा जाणवला, रुग्णालयात दाखल झालेले रुग्ण सरासरी 16 दिवस गैरहजर होते आणि रुग्णालयात दाखल नसलेले रुग्ण नऊ दिवस गैरहजर होते. ९७ टक्के रुग्णांना बरे होताना कुटुंबीय, मित्र आणि काळजीवाहकांच्या मदतीची आवश्यकता होती. सार्वजनिक सुविधांमध्ये उपचार घेत असलेल्या मुलांची काळजी घेणाऱ्यांमध्ये 77 टक्के लोकांनी काम गमावल्याची नोंद केली गेली, तर खाजगी रुग्णालयांमध्ये 26 टक्के लोकांनी काम गमावले. न्यूमोनिया झालेल्या मुलांसह ग्रामीण आणि अल्प उत्पन्न असलेल्या कुटुंबांवर प्रचंड आर्थिक ताण पडत असल्याने अनेकांना खर्च भागविण्यासाठी बाह्य आर्थिक मदतीवर अवलंबून राहावे लागते.

2023 मध्ये झालेल्या संशोधनात एकूण आर्थिक बोजा आणि विविध क्षेत्रांतील प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष खर्चात फरक दिसून आला. उदाहरणार्थ, पुण्यात न्यूमोनियाचा आर्थिक बोजा थेट खर्च जास्त असतो, तर चेन्नईत अप्रत्यक्ष खर्च हा प्रमुख घटक आहे. मर्यादित आरोग्य विमा संरक्षणामुळे ही विषमता आणखी वाढली आहे. प्रतिबंधात्मक उपायांमुळे हा ताण लक्षणीयरीत्या कमी होऊ शकतो.

हवेची गुणवत्ता सुधारण्याच्या उद्देशाने धोरणे या रोगाचा आर्थिक बोजा आणखी कमी करू शकतात. सवलतीच्या सेवा, विमा संरक्षण आणि अधिक परवडणारे खाजगी काळजी पर्याय प्रदान करून थेट खर्च कमी केला जाऊ शकतो, तर ताण कमी करण्यासाठी काळजीवाहू समर्थन आणि सामाजिक सुरक्षा जाळ्या मजबूत करून अप्रत्यक्ष खर्च कमी केला जाऊ शकतो.

२०१७ मध्ये सार्वत्रिक लसीकरण कार्यक्रम (यूआयपी) आणि मिशन इंद्रधनुष्य अंतर्गत न्यूमोकोकल कॉन्ज्युगेट लस (पीसीव्ही) च्या अंमलबजावणीद्वारे भारताने न्यूमोनियाचा सामना करण्यात महत्त्वपूर्ण प्रगती केली आहे. 2022 पर्यंत, 83 टक्के बाळांना पीसीव्हीचे लसीकरण केले गेले, ज्यामुळे देशाची बांधिलकी दिसून आली. या प्रयत्नांमुळे पाच वर्षांखालील मुलांचा मृत्यूदर कमी झाला आहे, जो 2014 मध्ये प्रति 1,000 मुलांमागे 45 वरून 2020 मध्ये 32 पर्यंत घसरला आहे

राष्ट्रीय आरोग्य अभियान आणि देशांतर्गत अर्थसंकल्पातील तरतूद, तसेच गावी आणि बिल अँड मेलिंडा गेट्स फाऊंडेशन सारख्या आंतरराष्ट्रीय देणगीदारांकडून मिळणारा निधी यामुळे एकूणच निधी वाढला आहे.

डिसेंबर 2020 मध्ये, सीरम इन्स्टिट्यूट ऑफ इंडियाने न्यूमोसिल हा स्वदेशी विकसित पहिला पीसीव्ही देखील बाजारात आणला, ज्यामुळे या आजाराची परवडणारी क्षमता वाढली. इंडियन ॲकॅडमी ऑफ पेडियाट्रिक्स (आयएपी) आणि इंडियन कौन्सिल ऑफ मेडिकल रिसर्च सारख्या अग्रगण्य संस्थांकडे न्यूमोनियाचे निदान आणि व्यवस्थापन करण्यासाठी ठोस मार्गदर्शक तत्त्वे आहेत, जेणेकरून फ्रंट-लाइन हेल्थकेअर प्रदाते हे सार्वजनिक आरोग्य आव्हान हाताळण्यासाठी सुसज्ज असतील. हे स्वागतार्ह बदल असूनही आव्हाने आधी चर्चा केल्याप्रमाणेच कायम आहेत. ग्रामीण भागात लसीकरणाचे प्रमाण कमी असून न्यूमोनिया प्रतिबंधाबाबत जनजागृती करणे गरजेचे आहे. त्यामुळे या उपक्रमांसाठी निधी मिळणे अत्यंत गरजेचे आहे.

राष्ट्रीय आरोग्य अभियान आणि देशांतर्गत अर्थसंकल्पातील तरतूद, तसेच गावी आणि बिल अँड मेलिंडा गेट्स फाऊंडेशन सारख्या आंतरराष्ट्रीय देणगीदारांकडून मिळणारा निधी यामुळे एकूणच निधी वाढला आहे. इंटिग्रेटेड डिसीज सर्व्हेलन्स प्रोग्रॅम (आयडीएसपी) सारख्या प्रणालींद्वारे सुरू असलेले मॉनिटरिंग हे सुनिश्चित करण्यासाठी महत्त्वपूर्ण आहे की भारत परिस्थितीशी जुळवून घेऊ शकेल आणि पुढे जाऊ शकेल.

भविष्यात निमोनियावर मोठ्या प्रमाणात नियंत्रण मिळवायचे असेल, तर लहान मुले आणि ज्येष्ठ नागरिक या दोघांनाही मोठ्या प्रमाणात लसीकरण करण्याची गरज भासेल. याशिवाय स्वच्छ हवा आणि उत्तम आरोग्य सेवाही महत्त्वाच्या आहेत. भारतातील सर्वात असुरक्षित लोकांमध्ये निमोनियामुळे होणारे मृत्यू कमी करण्यासाठी प्रौढ लसीकरण, सामाजिक संरक्षण योजना आणि परवडणारे उपचार यामध्ये गुंतवणूक करणे ही काळाची गरज आहे. एका वेळी एक पाऊल उचलून आपण हा आजार लक्षणीयरीत्या कमी करू शकतो.


# वयाच्या 21 व्या वर्षी लग्न: कायदेशीर वय वाढल्याने आरोग्यावर चांगला परिणाम होईल का?

भारतातील महिलांच्या लग्नाच्या कायदेशीर वयावरील वादाला एक नवीन वळण मिळाले आहे. महिलांसाठी लग्नाचे वय 18 वरून 21 वर्षांपर्यंत वाढवून लैंगिक कायद्यांमध्ये समानतेची मागणी करणारे विधेयक आता संसदेत अडकले आहे. परंतु हिमाचल सरकारने या मुद्द्यावर स्वतःच्या दृष्टीकोनातून एक विधेयक मंजूर केले आहे. अशा प्रकारची दुरुस्ती प्रस्तावित करणारे हिमाचल प्रदेश सरकार देशातील पहिले राज्य ठरले आहे. हे धाडसी पाऊल आता राष्ट्रपतींच्या मंजुरीच्या प्रतीक्षेत आहे. आता इतर राज्येही अशीच पावले उचलतील का, असा अंदाज बांधला जात आहे. ही चर्चा सध्याच्या राजकीय पार्श्वभूमीवर होत आहे, विशेषतः जेव्हा केंद्र सरकार विरोधी पक्षांच्या नेतृत्वाखालील राज्य सरकारांच्या विरोधात ठामपणे उभे आहे. हिमाचलच्या सक्रिय दृष्टिकोनामुळे इतर राज्ये अशाच प्रकारच्या कायद्यासाठी इच्छुक होतील का, की संघराज्य संरचनेअंतर्गत केंद्र आणि राज्य सरकारांमध्ये समन्वय साधण्याची ही एक उत्तम संधी म्हणून पाहिले जाऊ शकते.

हिमाचल सरकारने या मुद्द्यावर स्वतःच्या दृष्टीकोनातून एक विधेयक मंजूर केले आहे. अशा प्रकारची दुरुस्ती प्रस्तावित करणारे हिमाचल प्रदेश सरकार देशातील पहिले राज्य ठरले आहे. हे धाडसी पाऊल आता राष्ट्रपतींच्या मंजुरीच्या प्रतीक्षेत आहे. आता इतर राज्येही अशीच पावले उचलतील का, असा अंदाज बांधला जात आहे.

या चर्चेच्या केंद्रस्थानी आरोग्याबद्दल तसेच या निर्णयाचा सामाजिक परिणाम याबद्दलचे प्रश्न आहेत. बदल घडवून आणण्यासाठी ही धोरणे कशी काम करतील हा प्रश्न आहे. समर्थक म्हणतात की कायदेशीर वय वाढवल्यास महिलांच्या आरोग्यावर चांगले परिणाम होतील. मातेचे आरोग्य आणि बालमृत्यू कमी करण्यासाठी याचा परिणाम विशेषतः दिसून येईल. हे पाऊल लवकर विवाह करण्याबाबत खोलवर रुजलेल्या सामाजिक आणि सांस्कृतिक समजुतींना संबोधित करू शकेल का, असा प्रश्न टीकाकार विचारतात. नॅशनल फॅमिली हेल्थ सर्व्हे (NFHS-5) च्या 2019-21 च्या अहवालात असे दिसून आले आहे की 20-24 वयोगटातील 23 टक्के महिलांनी 18 वर्षे पूर्ण होण्यापूर्वीच लग्न केले होते. शहरी भागाचा वाटा 14.7 टक्के होता, तर ग्रामीण भागात 27 वाटा होता. लवकर विवाह इतर परिणाम 15-19 वर्षे वयोगटातील पाहिले गेले. शहरी भागातील 3.8 टक्के महिला आणि ग्रामीण भागातील 7.9 टक्के महिला एकतर गर्भवती होत्या किंवा त्यांनी बाळाला जन्म दिला होता. खाली दिलेला आलेख 1 गेल्या तीन दशकांत नॅशनल फॅमिली हेल्थ सर्व्हेने नोंदवलेल्या 20-24 वयोगटातील माहिती दर्शवितो की वयाच्या 18 व्या वर्षापूर्वी लग्न झालेल्या महिलांची संख्या सातत्याने कमी होत आहे. नॅशनल फॅमिली हेल्थ सर्व्हे-5 नुसार, 23 टक्के किंवा चारपैकी एक हा आकडा देखील अस्वीकार्य आणि चिंतेचा विषय आहे.

पण लग्नाचे वय 21 पर्यंत वाढवल्याने त्याचा आरोग्यावर होणारा परिणाम सुनिश्चित होऊ शकतो का की तो कायदा अंमलात आणणे अत्यंत कठीण होणार



आहे.

लवकर लग्न झाल्यामुळे आरोग्यावर होणाऱ्या दुष्परिणामांमधील संबंधांवर बऱ्याच लेखांचा अभ्यास केला गेला आहे. यासंबंधित अनेक माहितीवर विश्लेषण केले आहे. लवकर किंवा किशोरवयीन गर्भधारणा, विशेषतः 18 वर्षांखालील नववधूंसाठी, समस्या होण्याचा मोठा धोका असतो. अशा स्त्रियांना मातामृत्यू दराचा (MMR) धोका वाढतो आणि त्या कमी वजनाच्या किंवा अकाली बाळांना जन्म देतात. यामुळे बालमृत्यूचा धोका वाढतो. नॅशनल फॅमिली हेल्थ सर्व्हे-5 च्या अहवालात असे म्हटले आहे की भारतातील राष्ट्रीय MMR दर 2016-18 दरम्यान प्रति 100,000 जिवंत जन्मांमागे 113 वर आला होता. 1990 मध्ये ही संख्या 100,000 जिवंत जन्मांमागे 556 होती. ही घट असूनही, भारतातील ग्रामीण भागात ही संख्या जास्त आहे, जिथे आरोग्य सुविधा अत्यंत कमी आहेत. लवकर गर्भधारणेची प्रकरणे अशा आकडेवारीत मोठ्या प्रमाणात योगदान देतात. लवकर गर्भधारणेमुळे रक्तक्षय, कुपोषण आणि अपुरी प्रसूतीपूर्व काळजी होऊ शकते.

लवकर किंवा किशोरवयीन गर्भधारणा, विशेषतः 18 वर्षांखालील नववधूंसाठी, समस्या होण्याचा मोठा धोका असतो. अशा स्त्रियांना मातामृत्यू दराचा (MMR) धोका वाढतो आणि त्या कमी वजनाच्या किंवा अकाली बाळांना जन्म देतात.

कायदेशीर वय वाढवण्याच्या वकिलांचा असा युक्तिवाद आहे की पहिल्या बाळाच्या जन्माचे वय वाढवल्याने आरोग्यावर चांगला परिणाम होतो. ज्येष्ठ माता मातृत्वाशी संबंधित आव्हानांचा सामना करण्यासाठी मानसिक आणि शारीरिकदृष्ट्या तयार असतात. अशा परिस्थितीत, ते गर्भधारणेशी संबंधित जोखीम अधिक चांगल्या प्रकारे व्यवस्थापित करू शकतात. पण वयाच्या 35 व्या वर्षानंतर पुन्हा धोका वाढण्याची शक्यता असते. इतकेच नाही तर लग्नाला विलंब झाल्यास स्त्रीला तिचे शिक्षण पूर्ण करण्याची संधी मिळते. अशा परिस्थितीत, आरोग्याशी संबंधित समस्यांविषयी जागरूकता वाढवणे आणि आरोग्य सेवांची अधिक चांगली उपलब्धता साध्य करणे शक्य आहे. केवळ या प्रकरणात आपण चांगले आरोग्य प्राप्त करू शकता.

टीकाकार म्हणतात की हे इतके सोपे नाही. मातेचे आरोग्य हे दर्जेदार आरोग्यसेवा, योग्य पोषण आणि पुनरुत्पादक समस्यांवरील तपशीलवार ज्ञान यावर देखील अवलंबून असते. या चिंतांमध्ये भारत अजूनही मागे आहे, विशेषतः ग्रामीण क्षेत्रात. जोपर्यंत शिक्षण तसेच आरोग्यसेवेच्या पायाभूत सुविधा वाढवल्या जात नाहीत तोपर्यंत विवाहाचे कायदेशीर वय वाढवण्याच्या निर्णयामुळे समाजातील वंचित घटकांना फायदा होणार नाही. वयाच्या 21 व्या वर्षी लग्न करणाऱ्या स्त्रीला पुरेशा आरोग्य सुविधा न मिळाल्यास, वयाच्या 18 व्या वर्षी लग्न करणाऱ्या स्त्रीइतकाच धोका तिला तिच्या आरोग्यासाठी असेल.

तरुण स्त्रियांच्या जीवनावर परिणाम करणारा एक महत्त्वाचा पैलू शिक्षणाशी संबंधित आहे. लवकर लग्न होणे हे मुलींनी शाळा सोडण्याचे सर्वात सामान्य कारण असल्याचे म्हटले जाते. या कायद्याचे समर्थक म्हणतात की उशिरा विवाह केल्याने मुलींना त्यांचे शिक्षण पूर्ण करण्याची संधी मिळेल. ते काही कौशल्ये आत्मसात करू शकतील आणि कदाचित कामगार वर्गाचा भाग बनू शकतील. कामगार वर्गाचा भाग बनल्याने अधिक आर्थिक स्वातंत्र्य मिळेल. विविध अभ्यासातून असे दिसून आले आहे की उच्च शिक्षण घेतलेल्या स्त्रिया गर्भनिरोधक वापरण्याची शक्यता जास्त असते. त्याचप्रमाणे, ते बाळाच्या जन्मापूर्वी त्यांच्या आरोग्याबद्दल आणि कुटुंब नियोजनाबद्दल माहितीपूर्ण निर्णय घेतात.

आणि हे सिद्ध करण्यासाठी डेटा आहे. नॅशनल फॅमिली हेल्थ सर्व्हे-5 च्या नुसार माध्यमिक किंवा उच्च शिक्षण घेतलेल्या महिलांचे लग्न मोठ्या वयात केले जाते. उशीरा लग्न करणाऱ्या महिलांना कमी मुले हवी असतात आणि ते आरोग्य सेवांचा अधिक वापर करून त्यांच्या आरोग्यासाठी लाभ कमावतात. अशा महिला देखील कामाच्या ठिकाणी सामील होण्याची शक्यता जास्त असते. 2019-20 मध्ये 15-59 वर्षे वयोगटातील महिलांमध्ये कामगार शक्ती सहभाग दर (LFPR) 32.3 टक्के होता. हे प्रमाण पुरुषांच्या तुलनेत 81.2 टक्के कमी आहे. विवाहाचे वय वाढवल्याने अनेक सकारात्मक परिणाम होऊ शकतात आणि LFPR देखील वाढू शकतो. आंतरराष्ट्रीय कामगार संघटनेचा (ILO) असा युक्तिवाद आहे की कामाच्या ठिकाणी महिलांच्या प्रवेशाशी संबंधित इतर काही मुद्दे देखील महत्त्वाची भूमिका बजावतात. सामाजिक नियम, आर्थिक परिस्थिती आणि शिक्षण देखील यात महत्त्वाची भूमिका बजावतात.

या कायद्याचे अनेक अनपेक्षित परिणाम होऊ शकतात असे टीकाकारांचे म्हणणे आहे. तरीही कुटुंबे कायद्याचे उल्लंघन करून 21 वर्षांखालील मुलींचे लग्न आयोजित करतील. हे विशेषतः ग्रामीण भागात खरे आहे, जिथे लवकर लग्न करण्याचा दबाव असतो. अशा परिस्थितीत, हा नवीन कायदा 18 ते 21 वर्षे वयोगटातील प्रौढांमधील सहमतीच्या संबंधांना देखील गुन्हा ठरवेल, समाजासाठी एक नवीन समस्या निर्माण करेल आणि कमी वयात लग्न करण्याच्या कारणांकडे दुर्लक्ष करेल. या कायद्याच्या नावाखाली काही कुटुंबे वेगवेगळ्या जाती किंवा पंथांमधील विवाह रोखण्यासाठीही काम करतील. अशा परिस्थितीत महिलांसाठी उपलब्ध असलेले पर्याय आणखी कमी केले जातील.

कोणत्याही कायदेशीर सुधारणांसाठी त्या कायदेशीर सुधारणांची अंमलबजावणी ही अग्निपरीक्षा असते. अनेक दशकांपूर्वी बालविवाहावर बंदी घालण्यात आली होती. परंतु ग्रामीण आणि आर्थिकदृष्ट्या मागासलेल्या भागात तो अजूनही प्रचलित आहे. नॅशनल फॅमिली हेल्थ सर्व्हे-5 च्या अहवालानुसार, 18 वर्षांखालील चारपैकी एका महिलेचे लग्न हे बेकायदेशीर असले तरीही केले जाते. मोठ्या नमुना सर्वेक्षणातील या माहितीपैकी, 2021 मध्ये बालविवाहाची 1050 प्रकरणे आढळली. ही संख्या खूप कमी आहे कारण यापेक्षा जास्त बालविवाहाचे प्रमाण आहे.

## तेव्हा कॉमनमॅन (सीएम) होतो, आता मी डेडिकेटेड टू कॉमनमॅन (डीसीएम) - शिंदे

**मुंबई**

आज झालेल्या शपथविधीनंतर मंत्रालयात पहिली मंत्रिमंडळ बैठक संपन्‍ झाल्यावर उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी हिंदूहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांच्या पूर्णाकृती पुतळ्याला भेट देऊन माल्यार्पण करून त्यांचे अभिवादन केले. त्यानंतर त्यांनी बाळासाहेब भवनात आयोजित पत्रकार परिषदेत बोलताना सांगितले की, ऐतिहासिक शपथविधी आज पार पडला. राज्यात बाळासाहेबांच्या विचाराचं सरकार स्थापन झाले आहे. अडीच वर्षात राज्याला विकासाकडे घेऊन जाणारे सरकार आपले ठरले. महाराष्ट्राचे नेतृत्व करण्याची संधी मिळणे हे माझे भाग्य समजतो. पंतप्रधान नरेंद्र मोदींना मी धन्यवाद देतो. अडीच वर्षात केंद्राचंही राज्याला मोठे पाठबळ मिळाले. लाडक्या बहिणींचे विशेष अभिनंदन करतो. त्यासोबतच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांचे मनापासून अभिनंदन करतो. अजितदादांचे देखील मोठे योगदान मिळाले. अडीच वर्ष



दोन्ही नेत्यांची साथ मिळाली. राज्यात वेगवान सरकारची कारकीर्द यशस्वी ठरली. सरकारने केलेल्या कामामुळे जनतेचं बहुमत मिळालं.

मुख्यमंत्री असताना मी कार्यकर्ता म्हणून काम केलं. यापुढे देखील मी कार्यकर्ता म्हणून काम करणार. जेव्हा मी CM होतो तेव्हा मी Common Man समजत होते. पण आता मी DCM आहे. आता माझी जबाबदारी मुख्यमंत्र्यांसोबत काम करण्याची आहे. म्हणजेच Dedicated to Common Man. यापुढे आम्ही एक टीम म्हणून काम करणार. मी मुख्यमंत्री असताना अजित पवार आणि देवेंद्र फडणवीस यांनी जशी मदत केली तशीच मदत मी आता त्यांना करणार. त्यांना माझे पूर्ण सहकार्य आणि पूर्ण पाठिंबा असणार आहे, असे एकनाथ शिंदे म्हणाले.

## बावनकुळे यांच्यासह सहा सदस्यांची विधान परिषदेची आमदारकी रद्द

**मुंबई**

भाजपचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांच्यासह एकूण सहा विधानपरिषद सदस्यांची आमदारकी रद्द करण्यात आली. संबंधित सहाही विधान परिषद सदस्य हे आता विधानसभेच्या निवडणुकीत निवडून आल्याने महाराष्ट्र विधिमंडळ सचिवालयाने हा निर्णय घेतला आहे.

चंद्रशेखर बावनकुळे यांच्यासह नागपूरचे प्रवीण दटके, आमश्या पाडवी, राजेश विटेकर, रमेश कराड आणि गोपीचंद पडळकर हे विधान परिषदेचे सदस्य होते. हे सर्व 2024 च्या विधानसभेच्या निवडणुकीत निवडून आले आहेत. ते आता विधानसभेत दाखल होणार आहेत.

भाजपचे चंद्रशेखर बावनकुळे कामठी विधानसभेतून निवडणूक जिंकले. तर भाजपचे गोपीचंद पडळकरांनी जत विधानसभा मतदारसंघातून बाजी मारली. भाजपचे प्रवीण दटके यांनी नागपूर मध्य विधानसभेतून तर भाजपचे रमेश कराड यांनी लातूर ग्रामीण विधानसभा मतदारसंघातून निवडणूक जिंकली. शिंदे गटाचे आमश्या पाडवी अक्कलकुवा तर राष्ट्रवादी अजित पवार गटाचे राजेश विटेकर यांनी पाथरी विधानसभा मतदारसंघातून विजय मिळविला आहे.

# देवेंद्रपर्वाला सुरुवात

## एकनाथ शिंदे आणि अजित पवारांनी घेतली उपमुख्यमंत्रीपदाची शपथ

**मुंबई**

आझाद मैदानावरच्या शपथविधीनंतर देवेंद्र फडणवीस यांच्या नवीन पर्वाला सुरुवात झाली आहे. पुन्हा एकदा चॅलेंज देऊन देवेंद्र फडणवीस निर्विवादपणे मुख्यमंत्री झालेले आहेत. महायुतीला दणदणीत बहुमत मिळाल्यावर मुख्यमंत्रीपदासाठी एकनाथ शिंदे पुन्हा प्रयत्नशील होते. २०२२पासून दिल्लीतील भाजप नेतृत्वाशी वाढलेली जवळीक शिंदेंसाठी आशादायक होती. गेला आठवडाभर शिंदे यांनी त्यादृष्टीने पुरेपूर प्रयत्न केले. मात्र, भाजपचे १३२ आमदार निवडून आल्यानंतर भाजपा श्रेष्ठींनाही फडणवीस यांच्या निवडीशिवाय पर्याय उरला नाही. दिल्लीत झालेल्या महायुतीच्या प्रमुख नेत्यांच्या बैठकीत भाजपच्या नेतृत्वाने शिंदे यांना स्पष्टपणे तसे कळवले होते. त्यावर बुधवारी शिक्कामोर्तब करण्यात आले. दरम्यान, आज शपथविधीचा दिवस. राज्याला आज नवं सरकार मिळणार आहे. तर एकनाथ शिंदेही आता उपमुख्यमंत्रीपदाची शपथ घेण्यास राजी झाले. देवेंद्र फडणवीस यांनी तिसऱ्यांदा मुख्यमंत्रीपदाची शपथ घेतली असून अजित पवारांनी सहाव्यांदा आणि एकनाथ शिंदेंनी पहिल्यांदा उपमुख्यमंत्रीपदाची शपथ घेतली आहे. राज्यात आता देवेंद्रपर्वाला सुरुवात झाली आहे.आझाद मैदानावर महायुती सरकारचा 'महा'शपथविधी सोहळा पार पडला. देवेंद्र फडणवीस यांनी तिसऱ्यांदा मुख्यमंत्रिपदाची शपथ घेतली. दरम्यान नव्या सरकारमध्ये देखील जुनाच पॅटर्न कायम ठेवण्यात आला आहे. नव्या सरकारमध्ये एक मुख्यमंत्री आणि दोन उपमुख्यमंत्री असणार आहेत. देवेंद्र फडणवीस



यांनी मुख्यमंत्रिपदाची शपथ घेतली. मात्र एकनाथ शिंदे हे उपमुख्यमंत्रिपदाची शपथ घेणार का याबाबत मोठा सस्पेन्स निर्माण झाला होता. शपथविधी सोहळ्याला अवघे काही तास शिल्लक असेपर्यंत हा सस्पेन्स कायम होता. मात्र भाजप नेते आणि शिवसेना आमदारांच्या मणधरणीला यश आलं. अखेर एकनाथ शिंदे यांनी नव्या सरकारमध्ये उपमुख्यमंत्रिपदाची शपथ घेतली आहे.

2022 मध्ये एकनाथ शिंदे यांनी शिवसेनेतून उठाव केला. एकनाथ शिंदे यांच्या उठावानंतर महाविकास आघाडी सरकार अल्पमतात आल्यानं उद्धव ठाकरे यांना मुख्यमंत्रिपदाचा राजीनामा द्यावा लागला होता. त्यानंतर एकनाथ शिंदे हे भाजपच्या पाठिंब्यावर मुख्यमंत्री बनले. तर पक्षादेश स्विकारत देवेंद्र फडणवीस यांनी उपमुख्यमंत्रिपदाची शपथ घेतली होती. मात्र आता 2024 ला राज्यात महायुतीला प्रचंड बहुमत मिळालं. भाजप हा सर्वात मोठा पक्ष ठरला. त्यानंतर आता नव्या सरकारमध्ये देवेंद्र फडणवीस यांनी मुख्यमंत्रिपदाची शपथ घेतली आहे. तर एकनाथ शिंदे यांनी उपमुख्यमंत्रिपदाची शपथ घेतली आहे. सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार एकनाथ शिंदे हे गृहमंत्रिपदासाठी आग्रही होते, तर दुसरीकडे भाजप देखील गृहमंत्रिपदासाठी इच्छूक आहे.



मात्र आता एकनाथ शिंदे यांच्या मणधरणीला यश आलं असून एकनाथ शिंदे यांनी उपमुख्यमंत्रिपदाची शपथ घेतली आहे.

### मुख्यमंत्री फडणवीसांची पहिली स्वाक्षरी वैद्यकीय मदतीच्या फाईलवर

**पुण्याच्या रुग्णाला पाच लाखांची मदत**

मुख्यमंत्रीपदाची शपथ घेतल्यानंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या पहिल्याच मंत्रिमंडळ बैठकीपूर्वी मुख्यमंत्र्यांनी पहिली स्वाक्षरी मुख्यमंत्री सहाय्यता निधीच्या फाईलवर केली. पुणे येथील रुग्ण चंद्रकांत शंकर कुऱ्हाडे यांना पाच लाखाची मदत मुख्यमंत्री वैद्यकीय सहायता निधीतून देण्याचे निर्देश त्यांनी फाईलवर दिले आहेत. चंद्रकांत कुऱ्हाडे यांच्या पत्नीने बोन मॅरो ट्रान्सप्लांट उपचारासाठी मुख्यमंत्री सहाय्यता निधीतून अर्थसहाय्य देण्याची विनंती केली होती.

**7 डिसेंबरला विधिमंडळाचे विशेष अधिवेशन**

## ज्या योजना जाहीर केल्या त्या सुरुच राहणार आहेत-फडणवीस

**मुंबई**

मी मंत्रालय आणि विधीमंडळ वार्ताहर संघाचे आभार मानतो की आपण शपथविधीनंतर मला निमंत्रित केलं आणि आपण सर्वांनी माझं स्वागत केलं आणि सत्कार केला याबद्दल मी आभार मानतो. आपला हा संघ राज्याच्या संपूर्ण लोकशाहीचा महत्त्वाचा स्तंभ आहे. विधीमंडळातून राज्याचा कारभार चालतो तो योग्य प्रकारे चालला आहे की नाही हे सांगण्याचं काम तुम्ही सगळे करत असता असं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी म्हटलं आहे. चुका झाल्यास ती निदर्शनास आणून देता, कधी कधी अशाही गोष्टी असतात की ज्या आम्हाला माहीत नसतात त्या जनतेपर्यंत पोहचतात, त्यानंतर आम्हाला या सगळ्यावर उत्तर द्यावं लागतं. एकनाथ शिंदेंच्या नेतृत्वातलं महायुतीचं सरकार हे गतिशील असं सरकार होतं. आज आमची जी जाहिरात होती की महाराष्ट्र आता थांबणार नाही. त्याबाबत मला विचारलं की महाराष्ट्र आता थांबणार नाही म्हणजे काय त्यावर मी सांगितलं की महाराष्ट्राच्या विकासाने मागच्या अडीच वर्षात गती घेतली आहे. ही गती आता तशीच पुढे नेऊ. आता महाराष्ट्र थांबणार नाही. पायाभूत क्षेत्र, सामाजिक क्षेत्र, उद्योग क्षेत्र प्रत्येक क्षेत्रात महाराष्ट्र अग्रणी राहिल असं मी आपल्याला सांगू इच्छितो असं देवेंद्र फडणवीस यांनी म्हटलं आहे.

या शपथविधी सोहळ्यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी, केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांच्यासोबत इतर केंद्रीय मंत्री उपस्थित आहेत. तब्बल 22 राज्याच्या मुख्यमंत्र्यांनी या सोहळ्याला हजेरी लावली. विविध क्षेत्रातील मान्यवरांना या 'महा'शपथविधी सोहळ्यासाठी निमंत्रण देण्यात







आलं होतं. देवेंद्र फडणवीस यांनी तिसऱ्यांदा मुख्यमंत्रिपदाची शपथ घेतली तर एकनाथ शिंदे यांनी उपमुख्यमंत्रिपदाची शपथ घेतली आहे. आता इतर मंत्री कधी शपथ घेणार? कोणाला कोणतं खातं मिळणार याबाबत उत्सुकता शिगेला पोहोचली आहे.

## ज्येष्ठ भाजप नेते मधुकरराव पिचड यांचे निधन

**नाशिक**

भाजप ज्येष्ठ नेते मधुकर पिचड यांचे निधन वयाच्या 84 व्या वर्षी निधन झाले आहे. मागील दीड महिन्यांपासून नाशिक येथील रुग्णालयात पिचड यांच्यावर उपचार सुरू होते. आज पिचड यांची प्रकृती आणखी खालावली. ब्रेनस्ट्रोक आल्याने पिचड यांना नाशिक येथील नाईन पल्स रुग्णालयात उपचारासाठी दाखल केले होते. उपचारादरम्यान पिचड यांचे निधन झाले.

2019 च्या विधानसभा निवडणुकीमध्ये पिचड यांनी राष्ट्रवादीची साथ सोडून भाजपमध्ये प्रवेश केला होता. देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत पिचड यांनी आपल्या मुलासह प्रवेश केला होता.

राष्ट्रवादी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते तथा माजी प्रदेशाध्यक्ष मधुकरराव पिचड यांचे पुत्र माजी आमदार वैभव पिचड यांनी भाजपमध्ये प्रवेश केला होता. मुलाच्या इच्छेखातर आपण भाजपमध्ये जात आहोत, असे सांगून मधुकरराव पिचड



देखील भाजपमध्ये दाखल झाले होते.


मधुकर पिचड राजकीय कारकिर्दीच्या सुरवातीपासून ते राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे सदस्य आहेत. शरद पवार यांनी राष्ट्रवादी स्थापन केली, तेव्हापासून मधुकरराव पिचड त्यांच्याबरोबर होते. त्यांनी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे महाराष्ट्राचे अध्यक्ष म्हणून काम पाहिले होते.. 1999, 2004, 2009, असे सलग तीनदा राष्ट्रवादी काँग्रेसमधून निवडून आले.

यानंतर त्यांनी 2014 मध्ये त्यांचे पुत्र वैभव पिचड यांना अकोले मतदारसंघात राजकीय वारसदार म्हणून उतरवले.

मधुकर पिचड आणि त्यांचा मुलगा वैभव पिचड यांनी 2019 मध्ये भारतीय जनता पक्षात प्रवेश केला. मधुकरराव पिचड यांचे सत्तेतील राजकीय प्रवास प्रदीर्घ, असा राहिलाय. माजी कॅबिनेट मंत्री राहिलेले मधुकरराव पिचड 1980 ते 2009 पर्यंत अकोले विधानसभा मतदारसंघातून महाराष्ट्र विधानसभेचे सदस्य म्हणून काम केले.

मार्च 1995 ते जुलै 1999 या काळात ते महाराष्ट्र विधानसभेचे विरोधी पक्षनेते होते. 1980, 1985, 1990, 1995 या चार पंचवार्षिमध्ये सलग भारतीय राष्ट्रीय काँग्रेसकडून अकोले विधानसभा मतदारसंघातून निवडून गेले. या काळात त्यांना आदिवासी, आदिवासी विकास, दुग्धविकास, प्रवास विकास, पशु संवर्धन आणि मत्स्यव्यवसाय मंत्रालयात काम पाहिले होते.

## शपथविधी सोहळ्यात सिनेसृष्टीतील स्टार्स उपस्थित







**मुंबई**

महाराष्ट्राचे भावी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या शपथविधी सोहळ्याला अनेक ज्येष्ठ राजकीय व्यक्तींनी हजेरी लावली. फडणवीस तिसऱ्यांदा महाराष्ट्राच्या मुख्यमंत्रिपदाची शपथ घेत आहेत. या काळात अनेक राजकीय व्यक्ती या कार्यक्रमात सहभागी झाल्या आहेत. याशिवाय फिल्म इंडस्ट्रीतील स्टार्सही पोहोचले आहेत. या शपथविधी सोहळ्याला अभिनेता शाहरुख खान पोहोचला आहे.

सीएम फडणवीस यांच्या शपथविधी सोहळ्याला बॉलिवूडचा बादशाह शाहरुख खान पोहोचला आहे. त्याच्याशिवाय अभिनेता रणवीर सिंगही या कार्यक्रमाला उपस्थित होता. या कार्यक्रमात शाहरुख खान सचिन तेंडुलकरच्या जवळ बसला होता.

या कार्यक्रमात संजय दत्तही दिसला होता. त्याच्याशिवाय रणबीर कपूरही पोहोचला. इव्हेंटमध्ये रणवीर सिंग रणबीर कपूर आणि त्यानंतर सलमान आणि संजय दत्तला मिठी मारून बोलतांना दिसला. या कार्यक्रमात सलमान खानही दिसला आणि त्याने संजय दत्तची भेट घेतली.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या शपथविधी सोहळ्यात बॉलीवूडचा बादशाह शाहरुख खान आणि रणबीर कपूर मोठ्या घनिष्ठतेने मिठी मारताना दिसले. यावेळी त्याच्यासोबत रणवीर सिंगही उपस्थित होता.

या सोहळ्यात सहभागी होण्यासाठी बॉलिवूडचा दबंग सलमान खानही पोहोचला. यावेळी तो कडेकोट बंदोबस्तात दिसला. सलमान खानच्या वर्कफ्रंटबद्दल बोलायचे झाले तर सध्या तो 'सिकंदर'च्या शूटिंगमध्ये व्यस्त आहे. बॉलिवूडची धक धक गर्ल माधुरी दीक्षितही या कार्यक्रमात दिसली. या अभिनेत्रीने पिवळ्या रंगाच्या साडीत शपथविधी सोहळयाला हजेरी लावली होती. त्याच्याशिवाय अभिनेता सुनील पॉलही दिसला.

**अंबानी कुटुंब सहभागी**

अंबानी कुटुंबीयही शपथविधी सोहळयाला उपस्थित होते. मुकेश अंबानी आणि त्यांचा लहान मुलगा अनंत अंबानी यांच्याशिवाय धाकटी सून राधिका मर्चंटही दिसली. या कार्यक्रमात शाहरुख खान अनंत अंबानीसोबत दिसला.

## राज ठाकरेंकडून फडणवीस यांचे अभिनंदन

**मुंबई**

महाराष्ट्राच्या मुख्यमंत्रिपदाची तिसऱ्यांदा शपथ घेतल्यानंतर महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांनी देवेंद्र फडणवीस यांचे अभिनंदन केले आहे. भविष्यातील फडणवीस यांच्या मंत्रिमंडळातील सर्व सहकाऱ्यांना शुभेच्छा देताना राज ठाकरे यांनी सरकार चुकल्यास त्यांच्या चुकांची जाणीव करून देऊ, असेही त्यांनी म्हटले आहे. त्यासोबतच मिळालेल्या संधीचा योग्य वापर करावा असेही एक्सच्या माध्यमातून आवाहन केले आहे. देवेंद्र फडणवीस यांनी गुरुवारी महाराष्ट्राचे मुख्यमंत्री म्हणून शपथ घेतली. तसेच उपमुख्यमंत्री म्हणून एकनाथ शिंदे आणि अजित पवार हे शपथबद्ध झाले. राज ठाकरे यांनी एक्स या समाज माध्यमातून नवनिर्वाचित मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्र्यांचे अभिनंदन केले आहे. मात्र, त्याचवेळी फडणवीस यांना २०१९ मध्ये संधी मिळायला हवी होती, अशी खंतही ठाकरे यांनी व्यक्त केली आहे.

## राज्यसभेत काँग्रेस खासदाराच्या सीटखाली नोटांचे बंडल; चौकशीचे आदेश

**नवी दिल्ली**

संसदेच्या हिवाळी अधिवेशनाचा आज 10 वा दिवस आहे. मात्र आजचा दिवस काँग्रेस खासदाराच्यासीटखाली नोटांचं बंडल आढळल्यावरुन प्रचंड गाजत आहे. या प्रकरणी राज्यसभेचे सभापती जगदीप धनखड यांनी प्रकरणाच्या चौकशीचे आदेश जारी केले आहेत. मात्र काँग्रेस खासदारांच्या सीटखाली नोटांचं बंडल आढळल्यानं दोन्ही सभागृहात मोठा गदारोळ सुरू झाला. भाजपा नेत्यांनी काँग्रेसवर मोठा हल्लाबोल केला.

आज सकाळी राज्यसभेचे खासदार जगदीप धनखड यांनी सकाळीच राज्यसभेच्या खासदारांना फैलावर घेतलं. जगदीप धनखड म्हणाले, की "मी इथं सगळ्यांना कळवत आहे, की काल सभागृह तहकूब झाल्यानंतर सभागृहाची नियमित तपासणी करण्यात येत होती. मात्र यावेळी सुरक्षा अधिकाऱ्यांना आसन क्रमांक 222 च्या खाली नोटांचं बंडल आढळून आलं आहे. हे सीट काँग्रेस खासदार अभिषेक मनू सिघवी यांचं असून ते तेलंगाणामधून



निवडून आले आहेत. ही बाब सुरक्षा रक्षकांनी माझ्या निदर्शनास आणून दिल्यानंतर मी घटनेची खात्री केली. घडलेली घटना चिंतादायक असून या प्रकरणाच्या चौकशीचे आदेश देण्यात आले आहेत." काँग्रेसचे खासदार अभिषेक मनू सिंघवी यांनी याबाबत प्रतिक्रिया दिली. यावेळी बोलताना ते म्हणाले, की "मला माझ्यासीटखाली नोटांचं बंडल आढळून आल्याचं ऐकूण मोठा धक्का बसला. मी काल दुपारी 12.57 वाजता सभागृहात पोहोचलो. सभागृह दुपारी 1 वाजता उठलो. 1 ते 1.30 पर्यंत दुपारी मी खासदार अयोध्या प्रसाद यांच्यासोबत कॅन्टीनमध्ये बसलो. त्यानंतर 1:30 वाजता मी



संसदेतून बाहेर पडलो. मी केवळ 3 मिनिटं सीटवर बसलो होतो. त्यामुळे माझ्यासीटखाली नोटांचे बंडल आढळून आल्यानं मोठा धक्का बसला आहे. याचा अर्थ असा आहे की प्रत्येक सीटवर कोणीही कसंही येऊ शकते. त्यामुळे आता जागा लॉक करुन चावी खासदारांना घरी घेऊन जावं लागेल. माझ्यावर करण्यात आलेले आरोप दुःखद आहेत. याच्या तळापर्यंत जाण्यासाठी प्रत्येकानं सहकार्य केले पाहिजे. सुरक्षा एजन्सीचं अपयश असेल, तर त्यावर कारवाई केली पाहिजे." दरम्यान आज राज्यसभेत नोटांचं बंडल आढळून आल्यानं मोठा गदारोळ सुरू आहे. तर दुसरीकडं लोकसभेचं कामकाज 9 तारखेपर्यंत तहकूब करण्यात आली आहे.



## मोदी सरकार सर्व शेतमालाची खरेदी एमएसपीवर करेल

**नवी दिल्ली**

मोदी सरकार सर्व शेतमालाची खरेदी किमान आधारभूत किंमतीवर करेल, असे केंद्रीय कृषी आणि शेतकरी कल्याण मंत्री शिवराज सिंह चौहान यांनी म्हटले आहे. चौहान यांनी शुक्रवारी राज्यसभेत प्रश्नोत्तराच्या तासादरम्यान किमान आधारभूत किंमत (एमएसपी) या विषयावरील पुरवणी प्रश्नांना उत्तर देताना शेतकरी बांधवांना हे आश्वासन दिले आहे. महत्वाचे म्हणजे, शेतकरी आपल्या मागण्या घेऊन दिल्लीच्या दिशेने जाण्याचा प्लॅन करत असतानाच, शिवराज सिंह यांनी हे आश्वासन दिले आहे. सभागृहात माहिती देताना चौहान म्हणाले, "मला तुमच्या (अध्यक्ष) मार्फत सभागृहाला आश्वासन द्यायचे आहे की, शेतकऱ्यांच्या सर्व शेतमालाची किमान आधारभूत किंमतीवर खरेदी केली जाईल. हे मोदी सरकार आहे आणि मोदींची गॅरंटी पूर्ण करण्याची गॅरंटी आहे."

चौहान म्हणाले, "दुसऱ्या बाजूला आमचे मित्र जेव्हा सत्तेत होते, तेव्हा त्यांनी रेकॉर्डवर सांगितले होते की, आम्ही एम एस स्वामीनाथन आयोगाच्या शिफारशी स्वीकारू शकत नाहीत. विशेषत: उत्पादनाच्या खर्चापेक्षा 50 टक्के अधिक देण्याचा मुद्दा. माझ्याकडे रेकॉर्ड आहे. यावेळी त्यांनी, आपल्या दाव्याच्या समर्थनार्थ माजी कृषी राज्यमंत्री कांतीलाल भुरिया, कृषिमंत्री शरद पवार आणि केव्ही थॉमस यांचा हवालाही दिला.

चौहान यांच्या या विधानानंतर, वरिष्ठ सभागृहाचे अध्यक्ष जगदीप धनखर यांनी त्यांना त्यांच्या दाव्याच्या पुष्टीसाठी कागदपत्रे सादर करण्यास सांगितले. चौहान यांनीही, हे मान्य केले. एवढेच नाही तर, गत यूपीए सरकारने शेतकऱ्यांचा कधीही सन्मान केला नाही आणि कधीही शेतकऱ्यांच्या लाभदायक किंमतींच्या मागण्यांवर गांभीर्याने विचारही केला नाही, असा दावाही त्यांनी केला.

कृषिमंत्री पुढे म्हणाले, "मी आपल्या माध्यमाने सभागृहाला आश्वास्त करू इच्छितो की, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी 2019 पासून शेतकऱ्यांना उत्पादन खर्चावर 50 टक्के लाभ देऊन किमान आधारभूत किंमत मोजण्याचा निर्णय घेतला आहे." याशिवाय, मोदी सरकार आधीपासूनच शेतकऱ्यांना लाभदायक भाव देत आहे, असा दावाही त्यांनी केला.

## सरकारचा विकास प्लॅन तयार!- मुख्यमंत्री

**मुंबई**

देवेंद्र फडणवीस तिसऱ्यांदा मुख्यमंत्रीपदी विराजमान झाले आहेत. यानंतर त्यांनी शुक्रवारी डीडी सह्याद्रीला दिलेल्या मुलाखतीत महायुती सरकारचा पुढील पाच वर्षांचा विकास प्लॅन सांगितला आहे. तसेच जनतेचे आभारही मानले आहेत. ते म्हणाले, 'कालच्या शपथविधीतील जनसमुदाय पाहिला तर खूप आनंद झाला. जे यश जनतेने दिलं आहे, ते सेलिब्रेशन करण्याकरिता नाही. ते यश जनतेच्या आशा आकांक्षा पूर्ण करण्याकरिता दिलं आहे. मला खूप मोठ्या जबाबदारीची जाणीव झाली.' तसेच 'नव्या कार्यकाळात आम्ही प्रकल्पांना वेगाने पुढे नेणार आहोत. यावेळी माझा भर नदीजोड प्रकल्पावर असणार आहे. तर दुसरं म्हणजे ग्रीन एनर्जीवरही भर असणार आहे,' असे फडणवीसांनी नमूद केले.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी डीडी सह्याद्रीला विशेष मुलाखत दिली. यावेळी त्यांनी युती सरकारच्या प्राधान्यक्रमावर भाष्य केले. फडणवीस म्हणाले, 'महाराष्ट्र आता थांबणार नाही याचा अर्थ अडीच वर्षापूर्वी आमचं सरकार आलं तेव्हा आम्ही राज्याला ट्रॅकवर आणलं. आता सरकारच्या पुढच्या काळात चार नदीजोड प्रकल्पांवर माझा भर असणार आहे. यामुळं महाराष्ट्र कायम दुष्काळमुक्त होईल. तसेच ग्रीन एनर्जीवर देखील माझा भर राहणार आहे. 'आपण ५४ हजार मेगावॅटचे वेगवेगळे प्रकल्प हातात घेतले आहेत. २०३० मध्ये ५२ टक्के वीज ग्रीन एनर्जीसारख्या पारंपारिक स्त्रोतातून असणार आहे,' असेही फडणवीस म्हणाले. 'यामुळे शेती आणि उद्योग क्षेत्राला मोठा फायदा होणार आहे. दोन्ही क्षेत्रांमुळे महाराष्ट्रात रोजगाराची निर्मिती होईल आणि अर्थव्यवस्थेला विशेष चालना मिळेल, वेगवेगळ्या प्रकल्प तर हाती घेऊच पण या दोन गोष्टींवर विशेष भर असेल,' असे फडणवीसांनी अधोरेखित केले.

**आमदार पवार करणार तुळजापूरची पायी वारी**

## फडणवीसांसाठी देवीला घातले होते साकडे

**औसा**

मुख्यमंत्रिपदी पुन्हा देवेंद्र फडणवीस विराजमान व्हावेत, असे साकडे आमदार अभिमन्यू पवार यांनी तीन वर्षांपूर्वी तुळजाभवानी मातेला घातले होते. त्याची पूर्ती झाल्यामुळे ते नव्या सरकारच्या तीनदिवसीय अधिवेशनांनंतर औसा ते तुळजापूर पायी वारी करणार आहेत. पवार आणि फडणवीस यांची जवळीक राज्यात परिचित आहे. स्वीय सहायक म्हणून काम करणाऱ्या अभिमन्यू यांना देवेंद्र फडणवीस यांनी औशाचे आमदार केले. फडणवीस हे पुन्हा मुख्यमंत्री व्हावेत म्हणून त्यांनी साकडे घातले होते. मुख्यमंत्री म्हणून फडणवीस यांनी आज मुंबईत शपथ घेतली. त्यावेळी पवार यांच्या कुटुंबीयांनी आनंद व्यक्त केला.

राज्यात पाच वर्षांपूर्वी राजकीय घडामोडी घडल्या, त्यातच राज्यावर अनेक संकटे आली. राज्याला आणि जनतेला लोकाभिमुख आणि देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखालील सरकार हवे होते. तसे साकडे मी भवानीमातेला घातले होते. इच्छापूर्ती झाल्याने तुळजापूरला चालत जाऊन नवस फेडणार आहे.

मराठी अक्रॉस मुंबई

# गले में जकड़न सी महसूस होती है तो इसके पीछे की वजह और उपाय

सर्दी जुकाम में गले का बैठना, खराश होना और बलगम हो जाना आम बात है लेकिन कभी-कभी कुछ अटका हुआ महसूस होने लगता है. ऐसे में समझ नहीं आता है क्या करें. तो आपको बता दें कि यह कोई बड़ी समस्या नहीं है इसको घरेलू उपाय से ठीक किया जा सकता है. ऐसा तब होता है जब प्रदूषित हवा और दूषित खाना खा लेते हैं. इसके चलते गले में जकड़न महसूस होने लगती है.

गले की जकड़न कैसे करें ठीक

-जब कभी आपको ऐसा महसूस हो तो आप शहद (honey for stuck throat) का सेवन करें. इससे गले के संक्रमण (infection in throat) का खतरा कम



होगा. आपको राहत महसूस होगी.

- इसके अलावा आप नमक पानी से गरारा करें. इससे गले में जमी धूल-मिट्टी या अन्य विषाक्त पदार्थ बाहर निकल आएगा. यह भी तरीका असरदार है.

- तुलसी की पत्तियों में भी एंटी बैक्टीरियल गुण होते हैं, जो गले के किसी भी तरीके के संक्रमण से राहत देगा. इसकी पत्तियों को आप कच्चा या फिर पानी में उबालकर कर सकते हैं सेवन.

- पानी में बेकिंग सोडा (baking soda) और नमक मिलाकर गरारा करें इससे गले में अटका हुआ सा जो महसूस हो रहा है वो कम हो जाएगा.

- इसके अलावा आप नार्मल पानी भी पीकर इससे निजात पा सकती हैं. तो अब से आप इस नुस्खे को अपना लीजिए जब भी गले में कुछ अटका हुआ महसूस हो तो.

# छोटे से करी पत्ते दूर कर सकते हैं बालों की बड़ी दिक्कतें



सुगंधित करी पत्ते एंटीमाइक्रोबियल गुणों से भरपूर होते हैं. ये पत्ते बैक्टीरिया को हटाकर बालों को इंफेक्शंस से दूर रखने में भी मददगार हैं. इसके साथ ही करी पत्ते (Curry Leaves) आयरन, कैल्शियम, मैग्नीश्यम, फॉस्फोरस और विटामिन बी और सी के भी अच्छे स्त्रोत हैं जो बालों की देखरेख में महत्वपूर्ण भूमिका निभाते हैं. एक नहीं बल्कि कई तरीकों से करी पत्तों को बालों को बढ़ाने (Hair Growth) और अन्य दिक्कतों को दूर करने में इस्तेमाल किया जा सकता है. यहां जानिए करी पत्ते के बालों पर फायदे और इन्हें फेस मास्क या किसी और तरह से लगाने का सही और असरदार तरीका जिससे आपके बाल स्वस्थ बनें भी और नजर भी आएं.

बालों की ग्रोथ के लिए करी पत्ता बेहद फायदेमंद साबित होता है. इसे बंद हेयर फॉलिकल्स खुल जाते हैं और स्कैल्प को सांस लेने का मौका मिलता है. हेयर ग्रोथ के लिए करी पत्ते के साथ मेथी और आंवला लें. मुट्ठीभर करी पत्तों में मेथी के पत्ते बराबर मात्रा में मिलाएं और एक आंवला (Amla) डालकर पीस लें. आप चाहें तो आंवला का पाउडर भी इस्तेमाल कर सकते हैं. आप इसे पीसने के लिए आधा चम्मच पानी मिला सकते हैं. इस मिश्रण को बालों में आधा घंटा लगाए रखने के बाद धो लों.

एंटीबैक्टीरियल गुणों के चलते करी पत्ते बालों से डैंड्रफ (Dandruff) को दूर करने में भी असरदार हैं.करी पत्ता दही के साथ मिलाकर लगाया जा सकता है. इसके लिए मुट्ठीभर करी पत्तों को पीसकर उनमें 2 चम्मच दही मिलाएं और सिर पर 15 से 20 मिनट लगाए रखने के बाद धो लें.

अगर आपके बाल बेहद बेजान, रूखे-सूखे और डैमेज्ड नजर आ रहे हों तो करी पत्ते को इस तरह लगाएं. एक कटोरी में नारियल का तेल (Coconut Oil) गर्म करें और कुछ करी पत्ते डालकर पका लें. जब करी पत्ते पककर काले हो जाएं तो गैस बंद करके तेल को ठंडा होने अलग रख दें. नहाने से एक घंटे पहले इस तेल को हल्का गर्म करके सिर की मालिश करे और फिर सिर धोएं.

लगातार झड़ रहे बालों (Hair Fall) की दिक्कत दूर करने के लिए करी पत्तों को नारियल के तेल के साथ पकाएं. इसमें मेथी के दानें भी डालें. इस तेल से हफ्ते में एक बार सिर की मालिश करें और एक से डेढ़ घंटे बाद बालों को धोएं. आप चाहें तो रातभर भी इसे लगाकर सो सकते हैं.

# गरम पानी से करें अपने वजन को कम, फिटेनस सेंटर में जानें की नहीं है जरूरत



वजन घटाने के लिए लोग योगा और जिम का सहारा लेते हैं. घंटों इन जगहों पर पसीना बहाते हैं चर्बी गलाने के लिए. लेकिन उनका क्या जिनके पास ना तो समय और ना ही इतना पैसा की वो इस तरह के किसी फिटनेस सेंटर में जा सके. ऐसे लोगों के लिए हम यहां पर बेहद ही असरदार नुस्खा लेकर आए हैं जिसे रूटीन का हिस्सा बनाकर अपने शरीर में जमी अतिरिक्त चर्बी (Fat burn) को कम कर सकते हैं. यहां बात हो रही है गरम पानी की. यह सबसे सस्ता और अच्छा तरीका है वजन घटाने का. इसमें कोई मेहनत नहीं है बस समय-समय पर पानी पीना है.

- अगर आपका वजन (Weight gain) बहुत बढ़ गया है और आप उसे कम करने के तरीके की तलाश में हैं तो सबसे बेस्ट तरीका है गरम पानी का सेवन करना नियमित.

- गरम पानी पीने से आप जो कुछ भी दिनभर खाते हैं तेल मसाले से भरे खाद्य पदार्थ सब पच जाता है. इससे शरीर में खराब चर्बी जमा नहीं हो पाती है.

- सुबह की शुरुआत तो गरम पानी से जरूर करनी चाहिए. इससे विषाक्त पदार्थ (Toxins) मल मूत्र के सहारे बाहर आ जाते हैं. साथ ही यह चेहरे पर भी चमक लाने का काम करते हैं.

- गरम पानी पीने से पाचन तंत्र (digestive system) और मेटाबॉलिज्म (metabolism) मजबूत होता है. इसे पीने से कमर की चर्बी भी कम होती है और आप ओवरईटिंग भी नहीं करते हैं. ऐसे में आपका वजन धीरे-धीरे कम होने लगता है.

- वहीं, जो लोग सर्दी-खांसी (cold cough) और जुकाम से पीड़ित हैं तो उन्हें गरम पानी जरूर पीना चाहिए. इससे इंफेक्शन का खतरा कम होता है और आपको आराम भी जल्द मिल जाता है.

# अदरक के रस को ऐसे लगाइए फेस पर, झुर्रियां और टैनिंग हो जाएंगी गायब, चेहरे पर आएगा गुलाबी निखार

अदरक एक ऐसा मसाला है जिसके अनगिनत फायदे और इस्तेमाल हैं. इसका सबसे ज्यादा सेवन ठंड के मौसम में सर्दी खांसी से निजात पाने में किया जाता है. इसके पोषक तत्व गले सीने में जमी बलगम को साफ करने का काम बखूबी करते हैं. साथ में प्रतिरोधक क्षमता को भी बूस्ट करते हैं. लेकिन क्या आपको पता है इसका एक और चीज के लिए इस्तेमाल किया जा सकता है जिसके बारे में कम लोगों को पता है. इसको आप त्वचा संबंधी परेशानियों से निजात के लिए भी इस्तेमाल में ला सकती हैं. बस यहां बताई जा रही चीजों को मिलाकर चेहरे पर अप्लाई करना होगा.

अगर आप चेहरे पर गुलाबी निखार चाहती हैं तो अदरक के रस को गुलाबजल (rose water) और शहद (honey) मिलाकर अप्लाई कर लीजिए. इस फेस मास्क को आप 20 मिनट के लिए लगाइए. त्वचा पर नेचुरल निखार आ जाएगा.

आपको बता दें कि अदरक को चेहरे पर इस तरह से लगाने से कम उम्र में आ गई झुर्रियां (wrinkles)



कम होने लगती हैं धीरे-धीरे. इससे टैनिंग भी हटती है चेहरे से.

इसके अलावा यह होम रेमेडी आपकी स्किन को डीप क्वलीन करने का काम करती है. इसको लगाने से चेहरे पर मौजूद खराब बैक्टीरिया खत्म हो जाते हैं. आप अदरक के रस से चेहरे पर तब तक मसाज करें जब तक वो स्किन में अच्छे से सूख ना जाए.

इसके अलावा अगर आप 40 की उम्र पार कर चुकी हैं तो अदरक के पाउडर में शहद, नींबू का रस मिलाकर फेस पर सप्ताह में एक बार जरूर अप्लाई करें, इससे आपके चेहरे पर कसावट बनी रहेगी. आप इसको नियमित अप्लाई करती हैं तो जल्द ही चेहरे पर बदलाव नजर आने लगेगा.

## होंठ मुलायम कैसे करें

अगर आप चाहती हैं कि आपके होंठ सुंदर और मुलायम बनें तो खुद को हाइड्रेट रखें. क्योंकि पानी की कमी (dehydration) की वजह से भी लिप्स सूख जाते हैं.

- वहीं, बहुत डार्क लिपस्टिक लगाने के कारण भी होंठ ड्राई होकर फटने लगते हैं. ऐसे में आप इसका भी ध्यान दें. इसके अलावा खराब क्वालिटी का लिप बाम लगाने के कारण भी होंठ फटने लगते हैं.

- कुछ लोगों की आदत होती है अपने होंठों पर जीभ लगाने की. आपको बता दें कि स्लाइवा में मौजूद एंजाइम लिप्स को ड्राई करने का काम करते हैं.

- वहीं, सन प्रोटेक्शन का इस्तेमाल न करने के कारण भी स्किन ड्राई (Dry skin) होती है. इसलिए लोशन जरूर लगाएं ठंड के मौसम में. इसके अलावा पोषक तत्वों (Lack of nutrients) की कमी भी आपके लिप्स को ड्राई कर देती है.

- जो लोग बहुत ज्यादा सिगरेट पीते हैं उनके भी होंठ ड्राई होते हैं. ऐसे में आपको इस आदत को भी छोड़ देना चाहिए. धूम्रपान के और भी कई नुकसान होते हैं सेहत को.

# नहाने से पहले क्यों करना चाहिए शरीर की मालिश

आपने बड़े बुजुर्गों को अक्सर नसीहत देते देखा होगा नहाने से पहले पूरे शरीर की तेल से मालिश करने का. आखिर इसके पीछे क्या वजह होती होगी कभी आपने सोचा है, दरअसल इसके पीछे वैज्ञानिक कारण है. आज हम लेख में एक स्वस्थ व्यक्ति को पूरे शरीर में कैसे और क्यों तेल लगाना चाहिए उसके बारे में बताएंगे ताकि आपकी सारी कंफ्यूजन सुलझ जाए, तो चलिए जानते हैं इसके बारे में विस्तार से.



आपको बता दें कि नहाने से पहले शरीर की मालिश कम से कम आधे घंटे करनी चाहिए. मसाज की शुरूआत हमेशा सिर से होते हुए पैर तक आना चाहिए और मसाज गरम तेल से करें. एक बात का ध्यान रखें कभी भी मालिश पैर से नहीं शुरू करना चाहिए.

शरीर की मालिश करने के फायदे |

इससे आपके स्किन पोर्स को अच्छा पोषण मिलता है, इससे ब्लॉकेज हटता है और बल्ड सर्कुलेशन में सुधार होता है. ऐसा करने से शरीर में लचीलापन आता है और तो और मेटाबॉलिज्म भी मजबूत होता है.

इस तरीके से अगर आप नहाने से पहले मालिश कर लेते हैं तो आपको एंटी एजिंग की समस्या नहीं होगी. इससे थकावट भी दूर होती है, चेहरे पर भी निखारता है और मांसपेशियां मजबूत होती हैं.

किस तेल से करें मालिश

वहीं, शरीर की मालिश के लिए सरसों के तेल का इस्तेमाल करना चाहिए क्योंकि इसमें मौजूद एंटी ऑक्सीडेंट्स, ओमेगा 3 फैटी एसिड, विटामिन ई भरपूर मात्रा में होता है.

कुछ लोग तेल को बहुत गरम करके लगाते हैं जबकि गुनगुना करके मसाज देना चाहिए. क्योंकि बहुत ज्यादा गरम तेल से स्किन के पोर्स सिकुड़ जाते हैं.

# इन 4 बीमारियों में भूल से भी नहीं खाना चाहिए आंवले को

आंवला ठंड के मौसम में खूब खाया जाता है. हरे रंग का यह फल स्वाद में खट्टा होता है, इसको लोग कई तरीके से खाते हैं, जैसे- मुरब्बा, लड्डू, चटनी, कैंडी के रूप में. यह आंख की रोशनी, स्किन और बाल की सेहत के लिए बहुत अच्छा माना जाता है. इसमें विटामिन सी (vitamin c) भरपूर मात्रा में पाई जाती है. इसके अलावा यह खून को भी साफ करने का काम करता है. लेकिन कुछ बीमारियां है जिसमें आंवले को बिल्कुल नहीं खाना चाहिए नहीं तो सेहत हो जाती है बहुत ज्यादा खराब.

सर्जरी से पहले- अगर आपकी किसी तरह की सर्जरी होने वाली है तो इसका सेवन 2 हफ्ते पहले से बंद कर देना चाहिए. नहीं तो इससे ब्लीडिंग का खतरा बढ़ जाता है.

किडनी की बीमारी- वहीं, जो किडनी रोग से पीड़ित हैं उन्हें तो इसका सेवन बिल्कुल नहीं करना चाहिए. क्योंकि इसको खाने से शरीर में सोडियम की मात्रा बढ़ जाती है. जो किडनी की सेहत के लिए ठीक नहीं है.

लो ब्लड शुगर- अगर आप निम्न रक्त शर्करा से जूझ रहे हैं तो इसका सेवन ना करें क्योंकि इससे आपके शुगर पर बुरा असर पड़ता है. वहीं, जो लोग एंटी बायोटिक दवाओं का सेवन करते हैं उन्हें भी इसको खाने से बचना चाहिए.

सर्दी जुकाम- सर्दी जुकाम में भी इसका सेवन नहीं करना चाहिए. क्योंकि इसकी तासीर ठंडी होती है. जिसके कारण यह बॉडी टेंपरेचर को बिगाड़ देता है. इसका सेवन



त्रिफला के रूप में शहद और गरम पानी के साथ करते हैं.

आंवले के फायदे

1- आंवला का सेवन लोग आंख की रोशनी बूस्ट करने और झड़ते और टूटते बालों को रोकने और चेहरे पर चमक लाने के लिए करते हैं. यह विटामिन सी से भरपूर होता है.

2- यूरिन इंफेक्शन से बचाव के लिए भी आंवले का सेवन किया जाता है यह पेशाब की मात्रा को भी नियंत्रित करता है. वहीं, आंवला अपच की भी समस्या से राहत दिलाता है.

3- खाली पेट आंवला खाने से शरीर अच्छे ढंग से डिटॉक्स हो जाता है. मेटाबॉलिज्म और इम्यून को बूस्ट करता है. यह शरीर से विषैले पदार्थों को निकालने में मदद करता है. आंवले का पानी पीने से वजन भी कंट्रोल होता है.

# खाना खाने के तुरंत बाद क्या आपके भी सीने में होने लगती है जलन तो अपनाएं ये देसी उपाय

कुछ लोगों का पाचन तंत्र बहुत कमजोर होता है. उनको कुछ भी खाने से पहले दस बार सोचना पड़ता है. क्योंकि वो कुछ भी तेल मसाले वाली चीज खा लेते हैं तो गले, सीने में जलन और कच्ची डकार आने लगती है. इस परेशानी को एसिड रिफ्लैक्स कहते हैं जिसमें खाना खाने के बाद पेट का एसिड फूड पाइप में आ जाता है. जिसके चलते ये समस्या होती है. ऐसे में हम आपको यहां पर इससे निजात पाने का रामबाण तरीका बताने जा रहे है, तो चलिए जानते हैं.


- आपको बता दें कि एसिड रिफ्लैक्स (acid reflux) के खांसी (cough), सीने मे दर्द (heartburn) जैसे लक्षण होते हैं. और ये समस्या तब और बढ़ जाती है जब आप लेटते या झुकते हैं.

- हालांकि इससे राहत पाने के लिए बहुत से लोग दवाइयों का भी सेवन करते हैं. हालांकि ये परेशानी गलत पोजीशन में सोने के कारण भी होती है.

- ऐसे में आपको बाईं करवट होकर सोना चाहिए. जब भी आपको सीने में जलन महसूस हो तो पीठ के बल बिल्कुल ना सोएं. इससे एसिड रिफ्लैक्स बढ़ सकती है.

- वहीं, जब भी आपको ऐसा महसूस हो तो आप खाने में ओट्स, ब्राउन राइस, ब्रोकली, शकरकंद, गाजर जैसे खाद्य पदार्थों का सेवन करें इससे आपको काफी हद तक राहत महसूस करेंगे.

- जो कुछ भी खाएं अच्छे से चबाकर. इससे आपको सीने में जलन नहीं होगी. साथ ही आप इससे राहत पाने के लिए एक्सरसाइज (exercise for acid reflux) को भी दिनचर्या का हिस्सा बनाएं.



# Bad Breath हो जाएगी झट से दूर



दांतों की ठीक तरह से सफाई ना करने पर मुंह बैक्टीरिया का घर बन जाता है. इस बैक्टीरिया को पनपने में चीनी और स्टार्च से भरे फूड्स मदद करते हैं. लेकिन, बैक्टीरिया से पनपने वाली मुंह की बदबू (Bad Breath) को दूर करने में कई घरेलू नुस्खे बेहद काम आते हैं, बस आपको इन्हें अपनाकर देखने की जरूरत होती है. हालांकि, एक आम तरीका तो यही है कि आप ज्यादा से ज्यादा पानी पिएं जिससे मुंह में सलाइवा ज्यादा बने और मुंह में गंदगी ना जमी रहे. इसके अलावा कुछ असरदार नुस्खे लेख में दिए जा रहे हैं.

मुंह की सही सफाई

सबसे पहले तो आपको अपने मुंह की सही तरह से सफाई करने की आदत डालनी होगी. दांतों को ब्रश (Brush) करने के बाद जीभ को साफ करना ना भूलें. आप माउथवॉश का इस्तेमाल भी कर सकते हैं. इसके अलावा दिन में 2 बार नमक वाले गर्म पानी से कुल्ला करने पर दांत और मसूड़े सही तरह से साफ हो जाते हैं.

लौंग

दिन में थोड़ी-थोड़ी देर के अंतराल पर लौंग (Clove) चबाएं. लौंग बैक्टीरिया से लड़कर दांतों को साफ भी करती है और दांतों की दिक्कतों को दूर करने में भी असरदार है. लौंग खाते ही मुंह में इसका अरोमा घुल जाता है और बदबू दूर होने लगती है. हालांकि, लौंग के तेल और पाउडर के इस्तेमाल से परहेज करें क्योंकि ये जलन का कारण बनते हैं.

सेब और गाजर

कहते हैं ना लहसुन या प्याज खाने से मुंह से बास आने लगती है, उसी तरह सेब और गाजर खाने पर मुंह की बदबू दूर होती है. आप चाहें तो इन्हें पीसकर दातों पर मलकर कुल्ला कर सकते हैं. इससे दांत साफ होंगे और बदबू भी दूर होगी.

एपल साइडर विनेगर

मुंह की बदबू से तुरंत छुटकारा पाने के लिए एपल साइडर विनेगर यानी सेब के सिरके का इस्तेमाल किया जा सकता है. एक गिलास पानी में 2 चम्मच एपल साइडर विनेगर (Apple Cider Vinegar) मिलाएं और मुंह में थोड़ा-थोड़ा पानी लेकर यहां-वहां घुमाने के बाद थूक दें. ऐसा पूरे गिलास के पानी के साथ करें. आपका मुंह ताजगी से भर जाएगा.

इलायची

लौंग की ही तरह इलायची के दानों को चबाने पर मुंह की बदबू से छुटकारा मिलता है. इसे दिन में 3 से 4 बार चबाएं. आप चाहें तो गर्म पानी में इलायची उबालकर इस पानी को भी पी सकते हैं.

होममेड हर्बल पाउडर

इस होममेड हर्बल पाउडर (Herbal Powder) से दांतों को ब्रश करने पर आपको मुंह की बदबू के साथ-साथ दांतों की और भी कई दिक्कतों से छुटकारा मिल जाएगा. इसे बनाने के लिए दालचीनी, नीम के पत्तों का पाउडर, तुलसी के पत्तों का पाउडर और बेकिंग सोडा (Baking Soda) को मिला लें.

# ब्रिक्स करेंसी के लिए कोई प्रस्ताव नहीं : ट्रम्प की टैरिफ बढ़ाने की चेतावनी के बाद बोले एस जयशंकर



**दोहा**

विदेश मंत्री एस जयशंकर ने कतर में कहा कि अमेरिकी डॉलर से प्रतिस्पर्धा करने के लिए नई मुद्रा शुरू करने का कोई निर्णय नहीं लिया गया है. जयशंकर दोहा फोरम में भाग लेने के लिए कतर गए हैं. जयशंकर की यह टिप्पणी अमेरिका के नवनिर्वाचित राष्ट्रपति डोनाल्ड ट्रंप द्वारा ब्रिक्स सदस्य देशों, जिनमें भारत, रूस और चीन जैसी प्रमुख उभरती अर्थव्यवस्थाएं शामिल हैं, से यह मांग करने के एक सप्ताह बाद आई है कि वे नई मुद्रा नहीं बनाएंगे या डॉलर की जगह लेने वाली किसी अन्य मुद्रा का समर्थन नहीं करेंगे.

ट्रंप ने धमकी दी थी कि अगर ब्रिक्स सदस्य डी-डॉलराइजेशन नीति शुरू करते हैं या अमेरिकी डॉलर से दूर जाते हैं तो वे 100 प्रतिशत टैरिफ लगा देंगे.

ब्रिक्स देशों द्वारा ब्रिक्स मुद्रा पर आगे बढ़ने पर 100 प्रतिशत शुल्क लगाने के बारे में ब्रिक्स देशों को ट्रंप की हालिया चेतावनी का जिक्र करते हुए जयशंकर ने कहा, 'मुझे ठीक से पता नहीं है कि इसके (ट्रंप की टिप्पणी) पीछे क्या कारण था, लेकिन हमने हमेशा कहा है कि भारत कभी भी 'डी-डॉलराइजेशन' (देशों द्वारा अमेरिकी डॉलर पर आरक्षित मुद्रा, विनिमय माध्यम के तौर पर निर्भरता कम करने) के पक्ष में नहीं रहा है. अभी, ब्रिक्स मुद्रा का कोई प्रस्ताव नहीं है."

उन्होंने यह भी बताया कि ब्रिक्स देशों का (ब्रिक्स मुद्रा के मुद्दे पर) रुख एक जैसा नहीं है.

जयशंकर ने कहा, "हमारे पिछले ट्रंप प्रशासन के साथ अच्छे संबंध थे, बहुत ठोस संबंध थे, हां कुछ मुद्दे थे, ज्यादातर व्यापार से संबंधित मुद्दे थे, लेकिन बहुत सारे मुद्दे ऐसे थे जिन पर ट्रंप बहुत अंतरराष्ट्रीय थे. और मैं लोगों को याद दिलाता हूं कि वास्तव में ट्रंप के कार्यकाल में ही क्वाड को फिर से शुरू किया गया था."

उन्होंने प्रधानमंत्री नरेंद्र मोदी और राष्ट्रपति चुने गए ट्रंप के बीच व्यक्तिगत संबंधों का भी उल्लेख किया, जिसने दोनों देशों के बीच मजबूत द्विपक्षीय संबंधों में योगदान दिया है.

उन्होंने कहा, "पीएम मोदी और ट्रंप के बीच निजी संबंध हैं... जहां तक ब्रिक्स की टिप्पणियों का सवाल है, हमने कहा है कि भारत कभी भी डी-डॉलराइजेशन के पक्ष में नहीं रहा है, अभी ब्रिक्स मुद्रा रखने का कोई प्रस्ताव नहीं है. ब्रिक्स वित्तीय लेन-देन पर चर्चा करता है... अमेरिका हमारा सबसे बड़ा व्यापार साझेदार है, हमें डॉलर को कमजोर करने में कोई दिलचस्पी नहीं है."

ब्रिक्स सदस्यों को नई मुद्रा बनाने या अमेरिकी डॉलर की जगह लेने वाली किसी अन्य मुद्रा का समर्थन करने के लिए प्रतिबद्ध नहीं होने की चेतावनी देते हुए ट्रंप ने कहा था कि वे कोई और 'मूर्ख' ढूंढ सकते हैं.

ट्रंप ने अपने सोशल मीडिया प्लेटफॉर्म ट्रुथ सोशल पर लिखा, "हमें इन देशों से यह प्रतिबद्धता चाहिए कि वे न तो नई ब्रिक्स मुद्रा बनाएंगे, न ही शक्तिशाली अमेरिकी डॉलर के स्थान पर किसी अन्य मुद्रा का समर्थन करेंगे, अन्यथा उन्हें 100 प्रतिशत टैरिफ का सामना करना पड़ेगा और उन्हें अद्भुत अमेरिकी अर्थव्यवस्था में अपनी बिक्री को अलविदा कहना पड़ेगा."

अमेरिका के नव-निर्वाचित राष्ट्रपति ने कहा था, "वे कोई दूसरा 'मूर्ख' ढूंढ सकते हैं. इस बात की कोई संभावना नहीं है कि ब्रिक्स अंतरराष्ट्रीय व्यापार में अमेरिकी डॉलर की जगह ले लेगा, और जो भी देश ऐसा करने की कोशिश करेगा, उसे अमेरिका को अलविदा कह देना चाहिए."

# सीरिया में क्यों हो रहा है गृहयुद्ध, विद्रोहियों की क्या है मांग

**नई दिल्ली**

सीरिया (Syria) में सरकार और विद्रोहियों के बीच लड़ाई तेज हो गयी है. विद्रोही बलों ने देश के उत्तर-पश्चिम के एक बड़े हिस्से पर कब्ज़ा कर लिया है. विद्रोही राजधानी दमिश्क के करीब पहुंच गए हैं. हालांकि सरकार ने इस बात से साफ इनकार किया कि शहर के ऊपर से उसका नियंत्रण कमजोर हुआ है. समाचार एजेंसी एएफपी ने विद्रोही कमांडर हसन अब्देल गनी के हवाले से दावा किया है कि हमारी सेना ने राजधानी को घेरने का अंतिम चरण शुरू कर दिया है. इधर रिपोर्ट में यह भी दावा किया गया है कि बशर अल-असद ने देश छोड़ दिया है.

**सीरिया में क्या हो रहा है?**

सीरिया में पिछले कई सालों से गृहयुद्ध के हालत बने हुए हैं. इससे देश की हालत लगातार खराब होती जा रही है. इस युद्ध की शुरुआत 2011 में हुई थी उस दौरान हुई हिंसा में लाखों लोग मारे गए थे. और लाखों लोग बेघर हो गए थे. यह युद्ध बशर अल-असद की सरकार के खिलाफ शुरू हुआ था, लेकिन अब इसमें कई अलग-अलग समूह शामिल हो गए हैं, जिनमें विद्रोही समूह, आतंकवादी संगठन और अन्य देशों की सेनाएं शामिल हैं.

**लगातार बिगड़ रहे हैं हालात**

युद्ध के कारण सीरिया में एक



गंभीर मानवीय संकट पैदा हो गया है. लाखों लोग भोजन, पानी और दवाओं की कमी से जूझ रहे हैं. युद्ध के कारण लाखों सीरियाई शरणार्थी पड़ोसी देशों और यूरोप की तरफ पलायन कर रहे हैं. रूस ने बशर अल-असद सरकार का समर्थन किया है, जबकि अमेरिका और उसके सहयोगी देशों ने विद्रोहियों का समर्थन किया है. हालांकि ताजा बयान में डोनाल्ड ट्रंप ने कहा है कि अमेरिका को सीरियाई संघर्ष में शामिल नहीं होना चाहिए.

**असद ने दमिश्क नहीं छोड़ा है: रक्षा मंत्रालय**

सीरिया के रक्षा मंत्रालय ने कहा कि सेना बल "दमिश्क के ग्रामीण इलाकों के सभी क्षेत्रों में मौजूद हैं". इसमें कहा गया है, "इस खबर में कोई सच्चाई नहीं है कि हमारे सशस्त्र बल दमिश्क के पास के स्थानों से पीछे हट गए हैं." सीरिया के रक्षा मंत्रालय ने उन रिपोर्टों का खंडन किया कि असद ने दमिश्क छोड़ दिया है, उन्होंने कहा कि वह "राजधानी से अपने काम और राष्ट्रीय और संवैधानिक कर्तव्यों का पालन कर रहे थे".

**सीरिया में विद्रोहियों की क्या मांग है?**

सीरिया में विद्रोहियों की मांगें समय के साथ और विभिन्न गुटों के अनुसार बदलती रही हैं. उनकी सबसे बड़ी मांग है बशर अल-असद के शासन का अंत.

बशर अल-असद शासन का अंत: अधिकांश विद्रोही गुटों का मुख्य उद्देश्य बशर अल-असद को सत्ता से हटाना और एक नई सरकार स्थापित करना है. इसके लिए वो लंबे समय से लड़ाई लड़ रहे हैं.लोकतंत्र की स्थापना: विद्रोही लोकतांत्रिक रूप से चुनी हुई सरकार की स्थापना चाहते हैं और सभी नागरिकों के लिए समान अधिकारों की मांग करते हैं. मानवाधिकारों का संरक्षण: विद्रोही सरकार द्वारा मानवाधिकारों के उल्लंघन को रोकना चाहते हैं और सभी नागरिकों को बुनियादी अधिकार प्रदान करना चाहते हैं. देश की एकता और अखंडता: कई विद्रोही गुट देश की एकता और अखंडता को बनाए रखना चाहते हैं और देश को विभाजित होने से बचाना चाहते हैं. धार्मिक गुट: कुछ धार्मिक गुट इस्लामी शासन की स्थापना चाहते हैं और देश को इस्लामी कानून के अनुसार चलाना चाहते हैं.

**कौन-कौन से विद्रोही गुट हैं सक्रिय?**

सीरिया में विद्रोही गुटों की संख्या काफी बड़ी है और समय के साथ इनकी संरचना और गठजोड़ में बदलाव भी होता रहा है. इन गुटों को विभिन्न राजनीतिक विचारधाराओं और बाहरी देशों का भी समर्थन मिलता रहा है. सीरिया में विद्रोही गुटों में भी कई तरह के आपसी फूट हैं. उनकी लड़ाई की वजहें और उद्देश्य भी अलग-अलग हैं. कुछ गुट बशर अल-असद शासन को उखाड़ फेंकना चाहते हैं, तो कुछ धार्मिक कारणों से लड़ रहे हैं.

**कुछ प्रमुख विद्रोही गुट ये हैं**

हयात तहरीर अल-शाम (HTS): यह गुट अल-कायदा से जुड़ा हुआ माना जाता है और सीरिया में सबसे शक्तिशाली विद्रोही गुटों में से एक है. इसने सीरिया के कई इलाकों पर नियंत्रण कर लिया है.सीरियन नेशनल आर्मी (SNA): तुर्की का समर्थन प्राप्त यह गुट सीरियाई विपक्ष का एक मजबूत समूह है. इसे विभिन्न छोटे गुटों का समर्थन प्राप्त है.अह्रार अल-शाम: यह एक इस्लाम विद्रोही गुट है, जो सीरिया में सक्रिय है.अल-नुसरा फ्रंट: यह गुट भी अल-कायदा से जुड़ा हुआ था, लेकिन बाद में इसका नाम बदलकर हयात तहरीर अल-शाम कर दिया गया.

**जॉर्डन ने सीरिया से लगने वाले बॉर्डर को बंद किया**

जॉर्डन के गृह मंत्री माजेन फराया ने दक्षिणी सीरिया में बिगड़ते हालात को देखते हुए जाबेर बॉर्डर को बंद करने की घोषणा की है. शुक्रवार को मंत्रालय द्वारा जारी एक बयान के अनुसार, इस निर्णय के तहत जॉर्डन के नागरिकों और ट्रकों को राज्य में लौटने की अनुमति दी जाएगी, लेकिन सीरियाई क्षेत्रों में जाने वाले पर प्रतिबंध रहेगा. बयान के अनुसार, मंत्रालय ने कहा कि जॉर्डन सीरिया पर बारीकी से नजर बनाए हुए है। वहीं सीमाओं पर सशस्त्र बल तैनात है.

# बांग्लादेश के भागकर भारत आए 10 हिंदू नागरिक त्रिपुरा में गिरफ्तार

**नई दिल्ली**

बांग्लादेश से भागकर आए 10 हिंदुओं को त्रिपुरा में पुलिस ने गरफ्तार कर लिया है और इसकी जानकारी त्रिपुरा पुलिस सूत्रों ने एनडीटीवी को दी है. सूत्रों के मुताबिक 10 बांग्लादेशी हिंदू भारत में अवैध तरीके से घुस आए हैं क्योंकि उनके गांव में तनाव की स्थिति बनी हुई है.

10 बांग्लादेशी नागरिकों में दो महिलाएं, तीन बच्चे और एक बुजुर्ग भी शामिल है, जिन्हें त्रिपुरा में अंबासा रेलवे स्टेशन पर सिलचर की ओर जा रही ट्रेन में चढ़ने से पहले गिरफ्तार किया गया है. सूत्रों ने ये भी बताया कि शुरुआती पूछताछ में उन्होंने दावा किया कि बांग्लादेश में हिंदुओं के खिलाफ स्थिति चिंताजनक बनी हुई है और इस वजह से वो किशोरगंज जिले के धनपुर गांव से भागकर भारत आ गए हैं.

वो त्रिपुरा में घुस आए, जिसकी सीमा बांग्लादेश के साथ 856 किलोमीटर लंबी है और वे असम के सिलचर में किराए के मकान में रहने की कोशिश कर रहे थे.

# प्रधानमंत्री मोदी ने आर्कबिशप जॉर्ज कूवाकड के कार्डिनल बनने को बताया गर्व का क्षण

**नई दिल्ली**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी ने केरल के आर्कबिशप जॉर्ज कूवाकड को कार्डिनल के रूप में पदोन्नत किए जाने को भारत के लिए गर्व का क्षण बताया है. प्रधानमंत्री कार्यालय ने एक्स पर एक पोस्ट में लिखा, "भारत के लिए यह बहुत गर्व की बात है कि आर्कबिशप जॉर्ज कूवाकड को परम पूज्य पोप फ्रांसिस द्वारा कार्डिनल बनाया जाएगा."



आर्कबिशप कूवाकड केरल के कोट्टायम में चांगनाचेरी मूड लूर्डे माथा कैथोलिक चर्च के पादरी हैं. वह केरल के पहले पादरी हैं जो कार्डिनल बन रहे हैं. इससे पहले राज्य से जो पांच कार्डिनल हुए हैं, वे सब बिशप थे.

भारत की तरफ से एक प्रतिनिधिमंडल इस समारोह में शामिल होने के लिए वेटिकन सिटी गया हुआ है. पीएमओ ने पोस्ट में बताया, "भारत सरकार ने इस समारोह में शामिल होने के लिए केंद्रीय मंत्री जॉर्ज कुरियन के नेतृत्व में एक प्रतिनिधिमंडल भेजा है. समारोह से पहले, भारतीय प्रतिनिधिमंडल ने परम पूज्य पोप फ्रांसिस से भी मुलाकात की."

वेटिकन सिटी में शनिवार को होने वाले समारोह में पोप फ्रांसिस आर्कबिशप कूवाकड तथा 20 अन्य को कार्डिनल बनाएंगे. इसके बाद दुनिया भर में कार्डिनलों की संख्या 232 से बढ़कर 253 हो जाएगी. जब अगले पोप के चयन का समय आता है कार्डिनल के सदस्य ही उन्हें चुनते हैं.

पोप से मुलाकात के दौरान जॉर्ज कुरियन ने सरकार की ओर से पोप फ्रांसिस को भारत आने का न्योता दिया. उन्होंने बताया कि पोप फ्रांसिस ने कहा है कि वह 2025 के बाद ही भारत आ पाएंगे.

कुरियन ने कहा, "हमारे प्रधानमंत्री नरेंद्र मोदी ने पोप को भारत आने का आधिकारिक निमंत्रण दिया है. हमें बताया गया है कि पोप जयंती समारोह के कारण 2025 के दौरान व्यस्त रहेंगे और शायद ही कभी बाहर जाएंगे. इसलिए उनकी भारत यात्रा उसके बाद होगी."

भारतीय प्रतिनिधिमंडल में पूर्व राज्य मंत्री राजीव चंद्रशेखर, कांग्रेस सांसद कोडिकुन्निल सुरेश, राज्यसभा सांसद सतम सिंह संधू, भाजपा नेता अनिल एंटनी, अनूप एंटनी और टॉम वडक्कन शामिल हैं.

इससे पहले 1986 में तत्कालीन पोप जॉन पॉल द्वितीय ने सिस्टर अल्फोंसा और सिस्टर कुरियाकोस एलियास चावारा को संत बनाने के लिए दो दिन के लिए केरल का दौरा किया था. यात्रा के दौरान, पॉल द्वितीय कोच्चि में रुके और फिर त्रिशूर, कोट्टायम और तिरुवनंतपुरम की यात्रा की.

केरल से बड़ी संख्या में ईसाई समुदाय के लोग कूवाकड के कार्डिनल की पदोन्नति देखने के लिए वेटिकन सिटी पहुंचे हैं. वर्तमान में वेटिकन में रहने वाले कूवाकड पोप फ्रांसिस के अंतर्राष्ट्रीय यात्रा कार्यक्रम का आयोजन करते हैं.

केरल की राजधानी तिरुवनंतपुरम में 11 अगस्त 1973 को जन्मे कूवाकड 24 जुलाई को पादरी बने और बाद में प्रतिष्ठित पोंटिफिकल एक्लेसियास्टिकल अकादमी में राजनयिक सेवा के लिए प्रशिक्षण प्राप्त किया. साल 2006 में उन्होंने अल्जीरिया में अपोस्टोलिक नन्सिएचर में अपने राजनयिक करियर की शुरुआत की. उन्होंने अल्जीरिया, दक्षिण कोरिया, ईरान, कोस्टा रिका और वेनेजुएला में अपोस्टोलिक नन्सिएचर में सेवा की है.

केरल की 3.2 करोड़ की आबादी में लगभग 18 प्रतिशत ईसाई हैं, जिनमें कैथोलिक प्रमुख समूह हैं, जो राज्य के 50 प्रतिशत ईसाइयों का प्रतिनिधित्व करते हैं. केरल में तीन कैथोलिक संस्कार हैं - सिरो-मालाबार, लैटिन और सिरो मलंकारा चर्च.

# केंद्रीय वित्त मंत्री से किसान नेताओं ने की मुलाकात



**नई दिल्ली**

केंद्रीय वित्त मंत्री निर्मला सीतारमण ने शनिवार को किसान नेताओं से चर्चा की. इस दौरान देश में कृषि क्षेत्र के विकास और किसानों के उत्थान के लिए किसान नेताओं ने अपने सुझाव रखे. बैठक में शामिल भारतीय किसान संघ के अध्यक्ष बद्री नारायण चौधरी ने प्रधानमंत्री किसान सम्मान निधि की राशि बढ़ाने की मांग रखी. उन्होंने कहा कि कृषि इनपुट और मजदूरी में लगातार वृद्धि हो रही है, ऐसे में किसान सम्मान निधि में बढ़ोतरी नहीं की जाती है तो जिस उद्देश्य के लिए यह योजना बनाई गई थी वह अर्थहीन हो जाएगी. चौधरी ने वित्त मंत्री से कृषि यंत्रों पर लगने वाली जीएसटी को भी शून्य करने की मांग रखी.

इसके साथ ही किसान संघ ने कहा कि आईसीएआर जैसी बड़ी संस्था विदेशी व्यापारिक संस्थाओं से शोध के लिए समझौता करने का बहाना न बनाएं बल्कि भारत सरकार कृषि शोध, विकास और विस्तार के लिए पर्याप्त बजट राशि का आवंटन करे.

किसान संघ ने बजट पूर्व सुझाव चर्चा में प्राकृतिक खेती करने वाले किसानों को प्रोत्साहन राशि के साथ खाद कंपनियों को दी जाने वाली सब्सिडी डीबीटी योजना से सीधे किसानों के खाते में देने की मांग रखी, जिससे प्राकृतिक खेती करने वाला किसान उससे अपनी खाद स्वयं तैयार कर सकेगा.

साथ ही उन्होंने कहा कि प्राकृतिक खेती को बढ़ाने के लिए पशु धन के विकास और संवर्धन की योजना के माध्यम से प्राकृतिक उत्पादों के विक्रय और मूल्य संवर्धन के लिए जैविक मंडी और ई मंडी स्थापित कर उनके लिए आवश्यक बजट का प्रावधान किया जाना चाहिए.

**ग्रामीण विकास की योजनाओं में मिले पर्याप्त बजट**

ग्रामीण हाट बाजारों को अधिक सशक्त और प्रभावी बनाने के लिए पिछले साल की तरह ही कार्पस फंड के तौर पर रखी जाने वाली राशि के आवंटन में पूर्व की तुलना में वृद्धि करनी चाहिए. साथ ही कृषि विज्ञान केंद्रों को बीज उत्पादन के लिए पर्याप्त बजट और किसान क्रेडिट कार्ड की लिमिट भी बढ़ाने की बात किसान संघ ने बैठक में मजबूती के साथ रखी. साथ ही गन्ना किसानों और गन्ना मिलों के विकास के सुझाव भी रखे.

# ममता बनर्जी के बयान पर रामगोपाल यादव बोले - राहुल गांधी इंडिया गठबंधन के नेता नहीं

**लखनऊ**

पश्चिम बंगाल की मुख्यमंत्री और तृणमूल कांग्रेस की प्रमुख ममता बनर्जी के विपक्ष के इंडिया गठबंधन का प्रमुख बनाए जाने की इच्छा जताने पर समाजवादी पार्टी के नेता रामगोपाल यादव की प्रतिक्रिया सामने आई है. उन्होंने कहा कि, कांग्रेस किसी भी चुनाव में अच्छा प्रदर्शन नहीं कर पाई है. उन्होंने कहा कि, यह कोई भी कह सकता है कि अभी राहुल गांधी इंडिया गठबंधन के नेता नहीं हैं.

सपा के राष्ट्रीय महासचिव रामगोपाल यादव ने कहा कि, राहुल गांधी तो अभी इंडिया गठबंधन के नेता नहीं हैं, यह कोई भी कह सकता है. राजनीति में कोई साधु संत तो बनकर आता नहीं है, सब पद चाहते हैं. संभवत: उन्होंने (ममता) इसलिए कहा होगा कि चाहे लोकसभा का चुनाव हो या विधानसभा का चुनाव हो कांग्रेस कहीं भी अच्छा परफॉर्म नहीं कर पाई.

उन्होंने कहा कि, लोकसभा के चुनाव में हिमाचल प्रदेश में चार की चार सीट हार गए जबकि वहां इनकी सरकार है. इनकी सरकार कर्नाटक में भी है, वहां भी आधी सीटें हार गए. मध्यप्रदेश ओर छत्तीसगढ़ में एक सीट नहीं जीते. अगर वहां भी ठीक परफॉर्मेंस हो जाता तो आज मोदी प्रधानमंत्री होते ही नहीं.

उन्होंने कहा कि, संभवत: लोगों में चर्चा रहती है कि हो सकता है कि नेतृत्व में परिवर्तन किया जाए लेकिन मैं इन सब पचड़ों में पड़ता नहीं. इंडिया गठबंधन है, ठीक है और रहना चाहिए. बिना गठबंधन के इन तिगड़मी लोगों को हराया नहीं जा सकता.

गौरतलब है कि ममता बनर्जी की विपक्षी दलों के इंडिया गठबंधन के नेतृत्व को लेकर हाल ही में की गई एक टिप्पणी पर गठबंधन के अंदर जबर्दस्त प्रतिक्रिया हुई है. ममता बनर्जी ने शुक्रवार को एक समाचार चैनल से बातचीत करते हुए इंडिया गठबंधन के नेतृत्व और इसमें समन्वय को लेकर निराशा जताई थी.

ममता बनर्जी ने कहा था कि, "मैंने इंडिया गठबंधन गठित किया था, अब इसको मैनेज करने का काम मोर्चे का नेतृत्व करने वालों पर है. अगर वे शो नहीं चला सकते, तो मैं क्या कर सकती हूं? मैं बस इतना ही कहूंगी कि सभी को साथ लेकर चलने की जरूरत है."

जब ममता से पूछा गया कि उन्होंने स्वयं गठबंधन का कार्यभार क्यों नहीं संभाला, तो उन्होंने कहा, "यदि मुझे अवसर दिया गया तो मैं इसका सुचारू संचालन सुनिश्चित करूंगी. मैं पश्चिम बंगाल से बाहर नहीं जाना चाहती, लेकिन मैं इसे यहीं से चला सकती हूं."

# लौंगेवाला युद्ध स्थल पर 108 फीट ऊंचे खंभे पर राष्ट्रीय ध्वज फहराया गया

**नई दिल्ली**

सन 1971 के भारत-पाकिस्तान युद्ध के दौरान भारतीय सैनिकों की असाधारण बहादुरी और पराक्रम को नमन करने के लिए 7 दिसंबर को लौंगेवाला युद्ध स्थल पर 108 फीट ऊंचे खंभे पर राष्ट्रीय ध्वज फहराया गया. इस ध्वज की स्थापना भारतीय सेना और फ्लैग फाउंडेशन ऑफ इंडिया ने संयुक्त रूप से की है.

इस कार्यक्रम में 23-पंजाब के युद्ध के दिग्गज नायक जगदेव सिंह और हवलदार मुख्तियार सिंह शामिल हुए. उन्होंने 53 साल पहले इस युद्ध में हिस्सा लिया था. उनके साथ जैसलमेर जिले के 1971 के युद्ध के आठ अन्य दिग्गज भी



शामिल हुए.

समारोह में भारतीय वायु सेना, सीमा सुरक्षा बल, नागरिक प्रशासन के अधिकारी, प्रमुख हस्तियां और स्थानीय समुदाय के लोग मौजूद थे. इस मौके पर एक सांस्कृतिक कार्यक्रम भी आयोजित किया गया जिसमें स्कूली छात्रों ने देशभक्ति के गीत पेश किए. इन प्रदर्शनों के जरिए वीरों के साहस को सम्मानित किया गया. दिसंबर 1971 में लड़ी गई लौंगेवाला की लड़ाई हमारे सशस्त्र बलों की वीरता और बलिदान का प्रमाण है. लौंगेवाला की पवित्र भूमि हमें 5 से 7 दिसंबर 1971 तक यहां लड़ी गई भीषण लड़ाई की याद दिलाती है, जहां कुछ लोगों के साहस ने कई लोगों की ताकत पर विजय प्राप्त की थी.

लौंगेवाला के वास्तविक युद्ध स्थल पर एक युद्ध स्मारक एक प्रमुख पर्यटन स्थल बन गया है, जो हमारे सैनिकों को श्रद्धांजलि देने के लिए लाखों आगंतुकों को आकर्षित करता है. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी ने 14 नवंबर 2020 को अपनी यात्रा के दौरान राष्ट्रीय गौरव के स्थल के रूप में इसके विकास और इस विरासत को संरक्षित करने के महत्व पर जोर दिया था.

उसके बाद से भारतीय सेना के ठोस प्रयासों से लौंगेवाला युद्ध स्थल में व्यापक परिवर्तन हुआ है. इस परिवर्तन के हिस्से के रूप में अब 108 फीट ऊंचा राष्ट्रीय ध्वज स्थापित किया गया है, जो इस ऐतिहासिक स्थल को स्मरण और गौरव के स्थान के रूप में और मजबूत करता है.

# हरियाणा: '4-T' फॉर्मूला से हारेगा टीबी! जेपी नड्डा ने की राष्ट्रव्यापी अभियान की शुरुआत

**पंचकुला**

केंद्रीय स्वास्थ्य मंत्री जेपी नड्डा ने हरियाणा के पंचकुला में टीबी की घटनाओं और मृत्यु दर को कम करने के लिए 100 दिवसीय राष्ट्रव्यापी अभियान शुरू किया. जेपी नड्डा ने कहा कि देश भर के 347 सबसे अधिक प्रभावित जिलों में टीबी रोगियों का शीघ्र पता लगाने और उनका इलाज करने के प्रयास के साथ यह 100 दिनों का एक केंद्रित अभियान होगा.

केंद्रीय स्वास्थ्य मंत्री जेपी नड्डा ने कहा कि एक समय था जब टीबी को 'धीमी मौत' माना जाता था और यहां तक कि इसके प्रसार को रोकने के लिए टीबी से पीड़ित परिवार के सदस्यों को भी अलग कर दिया जाता था. लेकिन 2018 में माननीय प्रधान मंत्री ने 2030 से बहुत पहले टीबी को समाप्त करने का दृष्टिकोण बनाया. जेपी नड्डा ने कहा कि देश भर में 1.7 लाख से अधिक आयुष्मान आरोग्य मंदिरों के नेटवर्क की बदौलत आज टीबी का जल्द पता चल जाता है. केंद्र सरकार ने एक नए छोटे और अधिक प्रभावी आहार सहित संवेदनशील टीबी की दवाओं के दैनिक आहार की शुरुआत की, जिससे टीबी उपचार की सफलता दर में 87% तक सुधार हुआ है. उन्होंने कहा कि 1.17 करोड़ से अधिक टीबी रोगियों को प्रत्यक्ष लाभ हस्तांतरण के माध्यम से 3,338 करोड़ रुपये की सहायता प्रदान की गई है. भारत में टीबी की गिरावट की दर 2015 में 8.3% से दोगुनी होकर आज 17.7% हो गई है, जो वैश्विक औसत से काफी आगे है. पिछले 10 वर्षों में भारत में टीबी से होने वाली मौतों में भी 21.4% की कमी आई है.

हरियाणा के CM नायब सिंह सैनी ने कहा कि भारत ने जनभागीदारी, निक्षय पोषण योजना, फिट इंडिया और खेलो इंडिया जैसे सफल अभियानों के माध्यम से टीबी के खिलाफ लड़ाई लड़ी है, जिनकी दुनिया भर में प्रशंसा होती है. सरकार टीबी को खत्म करने के लिए '4-T' पर काम कर रही है, जो टेस्ट, ट्रैक, ट्रीट और टेक्नोलॉजी हैं.

# णिपुर में हिंसा भड़काने की कोशिश नाकाम, इंफाल में अपहरण की कोशिश में उग्रवादी गिरफ्तार

**इंफाल**

मणिपुर को फिर से सुलगाने की एक कोशिश को पुलिस ने नाकाम कर दिया है। दरअसल मणिपुर पुलिस ने इंफाल के थंगल बाजार इलाके में अपहरण की कोशिश नाकाम कर दी और दो लोगों को बचा लिया। इस मामले में पुलिस ने प्रतिबंधित संगठन कांगलीपाक कम्युनिस्ट पार्टी (ताइबांगनगांबा) से जुड़े उग्रवादी तेनसुबाम बंगकिम को अपहरण के इस मामले में इंफाल पश्चिम जिले से गिरफ्तार किया गया है। उल्लेखनीय है कि बीते दिनों मणिपुर के एक शरणार्थी कैंप से तीन महिलाओं और बच्चों का अपहरण कर उनकी हत्या कर दी गई थी, जिसके बाद मणिपुर में बड़े पैमाने पर हिंसा भड़क गई थी। अब एक बार फिर उग्रवादियों की मंशा राज्य में हिंसा भड़काने की थी, लेकिन पुलिस की मुस्तैदी से अपहरण की कोशिश को नाकाम कर दिया गया। हालांकि पुलिस ने इस बारे में ज्यादा जानकारी नहीं दी है। गिरफ्तार उग्रवादी के पास से 9 एमएम पिस्तौल, सात कारतूस और एक चार पहिया वाहन भी जब्त किया गया।

# देशाच्या प्रगतीचे श्रेय डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी दिलेल्या संविधानाला - मुख्यमंत्री



■ मुंबई

सध्या भारत जगात पाचवी सर्वात मोठी अर्थव्यवस्था असून लवकरच तिसऱ्या क्रमांकाची अर्थव्यवस्था होणार आहे. आपला देश सध्या विविध क्षेत्रांमध्ये नेत्रदीपक प्रगती करीत आहे. या प्रगतीचे श्रेय भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी देशाला दिलेल्या संविधानाला आहे, असे प्रतिपादन करीत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना महापरिनिर्वाण दिनानिमित्त अभिवादन केले.

तथागत भगवान गौतम बुद्धांनी दिलेला समता, एकता, बंधुतेचा संदेश डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी दिलेल्या संविधानात दिसत असल्याचे सांगत मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, बाबासाहेब द्रष्टे, अभ्यासू व व्यासंगी व्यक्तिमत्व होते. त्यांनी त्यावेळी कायदा, पाटबंधारे, मजूर व वीज मंत्री म्हणून काम केले. त्यांचा कार्यकाळ हा पायाभूत सोयी – सुविधांची मुहूर्तमेढ करणारा ठरला आहे. त्यांच्या कार्यकाळात त्यांनी केलल्या कामातून संविधानाचा अंमल दिसून येतो.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, सध्या देशाच्या प्रमुख नीती, धोरणांमध्ये बाबासाहेबांनी तेव्हा केलेल्या भविष्यातील संकल्पनांचा अंतर्भाव दिसून येतो. यावरून त्यांचे द्रष्टेपण दिसून येते. लंडन स्कूल ऑफ इकॉनॉमिक्समध्ये बाबासाहेबांचे लिखाण एक प्रमाण म्हणून मानल्या जाते. त्यांनी तेव्हा लिहीलेले विचार आजही तंतोतंत लागू पडतात. देशासमोर कुठल्याही प्रकारची समस्या येवू दे, त्या सोडवण्याचा उपाय भारतीय संविधानामध्ये आहे. असे जगात सर्वात सुदर असलेले संविधान डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी देशाला दिले आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त त्यांना अभिवादन करण्यासाठी देशभरातून लाखो भीम अनुयायी दादरच्या चैत्यभूमी येथे आले आहे. बुधवारी रात्रीपासून मोठ्या प्रमाणात या ठिकाणी अभिवादन करण्यासाठी नागरिकांच्या रांगा लागल्या होत्या. या अभिवादन कार्यक्रमासाठी मुंबई पालिकेने चोख व्यवस्था केली होती. तर पोलिसांनी देखील बंदोबस्त ठेवला होता. राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन, नवनियुक्त मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे व अजित पवार यांनी देखील चैत्यभूमी येथे येत डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करत त्यांना आदरांजली वाहिली.

# सरकारवरील विश्वास दर्शक ठराव मंजूर

■ मुंबई

महाराष्ट्र सरकारचा विश्वासदर्शक ठराव आवाजी मताने मंजूर झाला आहे. शिवसेना शिंदे गटाचे नेते उदय सामंत यांच्यासह राष्ट्रवादी काँग्रसचे दिलीप वळसे-पाटील, भाजप आमदार संजय कुटे आणि आमदार रवी राणा यांनी सरकारचा विश्वासदर्शक ठराव मांडला होता. यावेळी आवाजी मताने विश्वास दर्शक ठराव मंजूर करण्यात आला आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मंत्रीमंडळावर ही विधानसभा पूर्ण विश्वास करत आहे, अशा पद्धतीनं हा ठराव मांडण्यात आला होता. आवाजी मताने हा ठरवा मंजुर करण्यात आला आहे. या विधानसभा निवडणुकीत महायुतीला मोठं यश मिळालं आहे. 288 पैकी 232 जागा महायुतीच्या निनवडून आल्या आहेत.



त्यामुलं पुन्हा एकदा राज्यात महायुतीचं सरकार स्थापन झालं आहे. यामध्ये 132 जागा या एकट्या भाजपला मिळाल्या आहे. त्यामुळं देवेंद्र फडणवीस हे राज्याचे मुख्यमंत्री तर एकनाथ शिंदे आणि अजित पवार हे राज्याचे उपमुख्यमंत्री झाले आहेत. दरम्यान, महायुतीकडे मोठ्या प्रमाणात आमदारांची संख्या असल्यामुळं सरकारचा विश्वासदर्शर ठराव आवाजी मताने मंजूर झाला आहे. विधानसभेच्या अधिवेशनाचा आजचा तिसरा दिवस आहे. या तिसऱ्या दिवशी राहिलेल्या 8 आमदारांनी शपथ घेतली. त्यानंतर विधानसभेच्या अध्यक्षपदी पुन्हा एकदा राहुल नार्वेकर यांची निवड झाली आहे. महाविकास आघाडीकडून विधानसभेच्या अध्यक्षपदासाठी एकही उमेदवारी अर्ज दाखल करण्यात आला नाही. त्यामुळे राहुल नार्वेकर यांची आज एकमताने विधानसभेच्या अध्यक्षपदी निवड करण्यात आली आहे. मात्र, विधानसभेत अध्यक्षांची निवड होत असताना शिवसेना ठाकरे गटाचा एकही आमदार सभागृहात उपस्थित राहिला नाही, यामुळे राजकीय वर्तुळात चर्चांना उधाण आले आहे. दरम्यान, विधानसभा अध्यक्षांचा अभिनंदनाचा प्रस्ताव मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मांडला होता. यावर मुख्यमंत्र्यासंह दोन्ही उपमुख्यमंत्र्यांनी राहुल नार्वेकर यांचे अभिनंद केले. त्याचबरोबर जयंत पाटील, नाना पटोले, नितीन राऊत, विश्वजीत कदम रोहित पाटील यांनी देखील विधानसभा अध्यक्षांचे अभिनंदन केले.

# जगदीप धनखड यांच्याविरोधात काँग्रेस अविश्वास प्रस्ताव आणणार

## सपा-टीएमसीचा पाठिंबा



■ नवी दिल्ली

संसदेच्या हिवाळी अधिवेशनात सत्ताधारी आणि विरोधकांमध्ये दररोज खडाजंगी पाहायला मिळत आहे. अशातच, विरोधी इंडिया आघाडीने राज्यसभेचे सभापती जगदीप धनखड यांना हटवण्यासाठी अविश्वास प्रस्ताव आणण्याची तयारी केली आहे. धनखड यांच्या विरोधात इंडिया आघाडी एकत्र आली असून, समाजवादी पक्ष आणि तृणमूल काँग्रेसदेखील अविश्वास प्रस्तावाच्या बाजूने असल्याचे सांगितले जात आहे.

गेल्या काही दिवसांपासून इंडिया आघाडीच्या निदर्शनांपासून दूर राहिलेल्या टीएमसी आणि सपा खासदारांनीही अविश्वास ठरावावर स्वाक्षरी केली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, विरोधी पक्ष मंगळवारी राज्यसभेत सभापतींविरोधात अविश्वास प्रस्ताव आणू शकतात. अविश्वास प्रस्ताव तयार असून त्यावर 70 सदस्यांनी स्वाक्षरी केल्याचे सांगण्यात येत आहे.

सोमवारी राज्यसभेत जॉर्ज सोरोस यांच्या मुद्द्यावरून झालेल्या गदारोळात सभापती जगदीप धनखड यांची भूमिका पाहता काँग्रेस त्यांच्याविरोधात अविश्वास प्रस्ताव आणण्याची तयारी करत असल्याचे सांगण्यात येत आहे. जॉर्ज सोरोस यांच्याशी संबंधित मुद्द्यावरून राज्यसभेत सोमवारी ज्याप्रकारे गदारोळ झाला, त्यावरून काँग्रेस आणि इतर विरोधी पक्षांचे सदस्य धनखड यांच्यावर नाराज आहेत.

सभागृहात गोंधळ सुरू असताना दिग्विजय सिंह ते राजीव शुक्लापर्यंत... काँग्रेसच्या खासदारांनी सभापतींवर पक्षपाताचा आरोप केला. दरम्यान, राज्यसभेच्या सभापतींना हटवण्यासाठी प्रस्तावावर 50 सदस्यांच्या सह्या आवश्यक असतात, पण या प्रस्तावावर 70 सदस्यांनी सह्या केल्या आहेत. संसदेच्या पावसाळी अधिवेशनातदेखील विरोधकांनी सभापतींना हटवण्याचा प्रस्ताव आणण्याची तयारी केली होती, मात्र विरोधकांनी तो स्थगित केल्याचे बोलले जात आहे.

# नार्वेकरांनी 'मी पुन्हा येईन' म्हटले नव्हते, पण पटोलेंमुळे वाट मोकळी झाली - मुख्यमंत्री

■ मुंबई

विधानसभेच्या अध्यक्षपदी पुन्हा एकदा राहुल नार्वेकर यांची निवड झाली आहे. महाविकास आघाडीकडून एकाही उमेदवाराने अर्ज दाखल केला नाही. त्यामुळे राहुल नार्वेकर यांची आज बिनविरोध विधानसभेच्या अध्यक्षपदी निवड झाली आहे. राहुल नार्वेकरांची विधानसभा अध्यक्षपदी निवड होताच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी त्यांचे अभिनंदन केले. तसेच विरोधकांचे देखील देवेंद्र फडणवीसांनी आभार मानले. राहुल नार्वेकर यांची विधानसभा अध्यक्षपदी फेरनिवड झाली मी तमाम विधानसभा सदस्यांच्या वतीने आणि राज्याच्या 12 कोटी जनतेच्या वतीने अभिनंदन करतो. विरोधी पक्षाचे आभार मानतो, काही अपवाद वगळता अध्यक्षांची बिनविरोध निवड करण्याची परंपरा आहे, त्या परंपरेचा मान राखत आपल्या निवडीला विरोधी पक्षाच्या सदस्यांचे आणि गटनेत्यांचे आभार मानतो, असं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले. खरं म्हणजे अध्यक्ष महोदयांनी मी पुन्हा येईन म्हटलं नव्हतं, पण तरीही आपण परत आलात याचा मला मनापासून आनंद आहे, असंही देवेंद्र फडणवीस म्हणाले. देवेंद्र फडणवीसांच्या या विधानानंतर सभागृहात एकच हशा पिकला. राज्यात एक मुख्यमंत्री दोन उपमुख्यमंत्री होते, त्यातला एक वकील होता. तुमच्यासारखा निष्णात वकील अध्यक्षांच्या खुर्चीत बसला, या खुर्चीला तुम्ही न्याय द्याल शंका नाही, असा विश्वास देखील देवेंद्र फडणवीसांनी यावेळी व्यक्त केला. 11 फेब्रुवारी 1977 मुंबईत जन्माला आलेले राहुल नार्वेकरजी हे कदाचित पहिले अध्यक्ष पहिल्याच टर्ममध्ये अध्यक्ष



आणि दुसऱ्यांदा सलग अध्यक्ष झाले. नानाभाऊ (नाना पटोले) तुमचेही आभार...तुम्ही वाट मोकळी केल्यामुळे राहुल नार्वेकर पुन्हा अध्यक्ष होऊ शकले. राहुल नार्वेकरांना विधानपरिषदेत काम करण्याची संधी मिळाली, तिकडे काम करताना चुणूक दाखवली. कायद्यातील बारकावे शोधून काढून, त्यावर बोट ठेवण्याचे काम करायचे. कायदेमंडळाचे ते अध्यक्ष आहे, त्याला कायद्याचे बारकावे माहिती असणे महत्त्वाची गोष्ट आहे. गेली 5 वर्षे महाराष्ट्राच्या राजकारणातील संक्रमण काळ होता, पहिल्यांदा विधानसभा अध्यक्षांकडे मीडियाचं आणि जनतेचं लक्ष होतं. कदाचित महाराष्ट्राच्या इतिहासात सर्वाधिक चर्चेत असणारे अध्यक्ष राहुल नार्वेकर होते, त्यांच्य रुपाने न्यायप्रिय अभ्यासू आणि संयमी व्यक्तिमत्व निवडलं गेलंय ही आनंदाची गोष्ट असल्याचं देखील देवेंद्र फडणवीसांनी सांगितले.

# 'अमृता' हूनी गोड नाम तुझे देवा

## रोहित पाटलांची मुख्यमंत्र्यांना गुगली

■ मुंबई

विधानसभेच्या अध्यक्षपदी आज राहुल नार्वेकर यांची निवड झाली. यावेळी त्यांच्या अभिनंदनाचा प्रस्ताव मांडण्यात आला. त्यावर राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाचे प्रतोद रोहित पाटील यांनी पहिलेच भाषण केले. रोहित पाटील सभागृहातील सर्वात तरुण आमदार आहेत. त्यामुळे रोहित पाटील भाषण करत असताना सभागृहातील सगळे आमदार चिडीचूप शांत बसल्याचे पाहायला मिळाले.



बाबासाहेब आंबेडकर यांनी जो आपल्याला मतदानाचा अधिकार दिला. जसा तुम्ही तरुण अध्यक्ष आहात तसं मी ही तरुण आमदार आहे. एक नंबरच्या वकिल यांच्याकडे जसं लक्ष असत तसं माझ्याकडे ही असूद्या कारण मी ही वकिली पुर्ण करतोय. सर्वसामान्य लोकांच्या हिताचं आवाज याकडे तुम्ही लक्ष द्या..., अशी मागणी रोहित पाटील यांनी विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांच्याकडे केली. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस तुमचंही अभिनंदन...यावेळी रोहित पाटील यांनी एक वाणी बोलावून दाखवली. 'अमृता'हून ही गोड नाव तुझं देवा असं संतांनी म्हटलं आहे. त्यामुळे तुम्ही ही गोड वागणुक तुम्ही आम्हाला द्यावी, अशी देवेंद्र फडणवीस साहेब तुमच्याकडे विनंती करतो, असं रोहित पाटील म्हणाले. रोहित पाटील अमृताहूनही गोड नाव तुझं देवा, असं म्हटल्याने देवेंद्र फडणवीसांनाही हसू आले. कारण देवेंद्र फडणवीसांच्या पत्नीचं नाव अमृता फडणवीस आहे. यानंतर मी मुद्दाहून अमृताहून असं म्हटलं, अशी थेट गुगली रोहित पाटील यांनी टाकली.

# २०८ मताधिक्याने निवडून आल्याबद्दल माझी टिंगल करण्यात आली-पटोले

■ मुंबई

"नवनिर्वाचित विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांना मी मनापासून शुभेच्छा देतो. तसंच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी जो अभिनंदनाचा प्रस्ताव ठेवला त्याला मी पाठिंबा देतो. आपल्या सभागृहाला खूप समृद्ध अशी परंपरा आहे. भारताच्या लोकसभेचे पहिले अध्यक्ष आपल्याच सभागृहातून गेले होते असा मान असलेलं हे सभागृह आहे. आपली मागच्या अडीच वर्षांतली कारकीर्द उत्तम होती. त्याचा उल्लेख आत्ता सगळ्यांनीच केला. सभागृहातील दोन्ही बाजूचे सन्मानीय सदस्य हे आपल्या भागांचे प्रश्न घेऊन सभागृहात येतात. सगळ्यांना आपले प्रश्न, जनतेचे प्रश्न मांडण्याचा अधिकार आहे. आपण कामकाज करताना मागच्या अडीच वर्षांत सगळ्यांना न्याय देण्याचा प्रयत्न केला त्यात तुम्ही ९९ टक्के यशस्वी ठरलात." असे नाना पटोले



म्हणाले. मी जे २०८ मतांनी निवडून आलो त्याबद्दलची एक टिंगल या ठिकाणी करण्यात आली. मी सांगू इच्छितो की तुम्हाला दोन उपमुख्यमंत्र्यांना एक नंबरचा उपमुख्यमंत्री आणि क्रमांक दोनचा उपमुख्यमंत्री असे नंबर द्यावे लागतील. उपमुख्यमंत्री बोला म्हटलं तर दोघेही उभे राहू शकतात त्यामुळे हे करावं लागेल. मी जे २०८ मतांनी निवडून आलो त्यामुळे माझी खिल्ली उडवली गेली. इथे निवडून आलेला माणूसच बसू शकतो. किती मतांनी निवडून आला ते महत्त्वाचं नसतं. मी पण विदर्भात उच्चांकी मताधिक्याने निवडून आलो आहे. मी आणि देवेंद्रजी आम्ही जेव्हा सभागृहात आलो तेव्हा उच्चांकी मताधिक्याने आलो होतो. उच्चांकी मतांनी निवडून आलो म्हणजे बक्षीस मिळतं असं नाही. हा काही चर्चेचा विषय नाही. मात्र टिंगल केली जाते आहे हास्यकल्लोळ करायचा असेल तर हे काही बरोबर नाही असं नाना पटोले म्हणाले.

# बेळगावला केंद्रशासित प्रदेश जाहीर करा- आदित्य ठाकरे

■ मुंबई

बेळगावमध्ये होणाऱ्या मराठी भाषकांच्या महामेळाव्याला कर्नाटक सरकारनं परवानगी नाकारल्याने सीमावासियांमध्ये संतापाची लाट उसळली आहे. कर्नाटक पोलिसांकडून महाराष्ट्रातील नेत्यांना कर्नाटकमध्ये प्रवेशबंदी लागू करण्यात आली आहे. तर दुसरीकडे, बेळगावमध्ये पोलिसांची दडपशाही सुरु असल्याचं पाहायला मिळत आहे. यावरच आता शिवसेनेचे (उद्धव बाळासाहेब ठाकरे) नेते आदित्य ठाकरे यांनी प्रतिक्रिया दिलीय.

बेळगावमधील मराठी माणसावरील अन्याय, अत्याचार आणि अपमान आम्ही सहन करू शकत नाही, असं ठणकावत आदित्य ठाकरे यांनी बेळगावला केंद्रशासित प्रदेश जाहीर करण्याच्या मागणीवर पक्ष ठाम असल्याचं स्पष्ट केलंय. केंद्र सरकारनं बेळगाव परिसरात जास्त निधी देऊन विकास करण्याचं आश्वासन दिलं होतं. बेळगावला केंद्रशासित प्रदेश कधी करणार? याचं उत्तर



सरकारनं द्यावं. तसंच सरकार कुणाचंही असलं तरी अन्याय सहन करणार नाही, असंही आदित्य ठाकरेंनी स्पष्ट केलंय.

पुढं ते म्हणाले, "न्यायालयात बेळगाव प्रकरणाचा निकाल लागेपर्यंत तो परिसर केंद्रशासित करावा ही आमची कायम भूमिका आहे. महाराष्ट्रातील मराठी माणूस लाडका आहे की नाही हे सरकारनं दाखवून द्यावं. मराठी माणसावरील अन्याय दूर करण्याबाबत सरकारनं भूमिका मांडावी." लाडकी बहीण आणि इतर खोटे वादे सरकारनं केल्याचा आरोप त्यांनी केला. तसंच राज्यातील मंत्रिमंडळ भ्रष्ट आहे, त्यामुळं एसीबी बंद होईल, असा दावाही आदित्य ठाकरेंनी केला.

शिवसेनेनं (उबाठा) विधानसभा अध्यक्ष निवड प्रक्रिया आणि मंत्री परिचयावर बहिष्कार घातला आहे. आदित्य ठाकरे म्हणाले, "राज्यात बाहेर कुठेही सत्ता आल्याचा आनंद दिसत नसताना विधानभवनात मात्र सेलिब्रेशन केलं जातंय. या सरकारमधील मंत्र्यांची सर्वांना चांगलीच ओळख आहे. राज्यातील सरकार हे ईव्हीएम सरकार आहे. विधानसभा अध्यक्ष असताना राहुल नार्वेकरांनी निर्णय देताना आमच्यावर अन्याय केला. त्यांनी शिवसेना आणि राष्ट्रवादी फोडण्याचा निर्णय दिला ती जखम अजूनही ताजी आहे. मात्र, यापुढं अन्याय होणार नाही, याची ग्वाही मिळणं गरजेचं आहे. लवाद म्हणून काम करताना त्यांनी संविधानाचा अपमान केला," असा आरोपही आदित्य ठाकरे यांनी केला.

# विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांची भूमिका समन्यायी- उपमुख्यमंत्री शिंदे

■ मुंबई

विधानसभेच्या सभागृहात प्रत्येक घटकाला समान न्याय देतानाच सामजिक समतोल राखत समन्यायी भूमिका घेवून विधानसभा अध्यक्ष ॲड. राहुल नार्वेकर यांची कामकाजाची हातोटी आहे. सलग दुसऱ्यांदा अध्यक्षपदी विराजमान होण्याचा त्यांना मान मिळाला आहे. त्यांचे विधीमंडळाच्या इतिहासात सुवर्णाक्षरांनी लिहीले जाईल, असा विश्वास उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज येथे व्यक्त केला.

विधानसभेच्या अध्यक्षपदी बिनविरोध निवडीबदल उपमुख्यमंत्री श्री. शिंदे अभिनंदनपर प्रस्तावावर बोलत होते. कायद्याची उत्तम जाण असणारे अध्यक्ष सभागृहाला लाभले आहेत. अध्यक्षपदाला या कायदेमंडळात अधिक महत्व आहे. ॲड.नार्वेकर यांचे विधानसभा अध्यक्ष म्हणून कामकाज कौतुकास्पद आहे. गेल्या अडीच वर्षात त्यांनी चांगले काम केले हे त्याचे उत्तम उदाहरण आहे. गेल्या अडीच वर्षात त्यांनी सखोल अभ्यास करून राज्याच्या हितासाठी अनेक चांगले निर्णय



दिले आहेत. त्यांनी अध्यक्षपदाची उंची अधिक वाढवली आहे, असे उपमुख्यमंत्री श्री. शिंदे यांनी सांगितले.

उपमुख्यमंत्री शिंदे म्हणाले, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी दिलेल्या संविधानावर देशाचा, राज्याचा कारभार चालतो. सर्वसामान्य व्यक्ती संविधानामुळे पंतप्रधान, मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री होवू शकतो. राज्यात आता विकासाचे व प्रगतीचे नवे पर्व सुरु झाले आहे. अध्यक्षांच्या कायद्याच्या ज्ञानाचा उपयोग सर्वसामान्यांचे प्रश्न सोडवण्यास होईल. त्यामुळे या सभागृहाचे पावित्र्य राखत राज्याला विकासाच्या महामार्गावर नेण्यास सर्वांनी प्रयत्न करूया असेही उपमुख्यमंत्री श्री. शिंदे यांनी यावेळी सभागृहात सांगितले.

# लाडक्या बहिणीने आम्हाला सगळ्यांना इथे बसवले- अजितदादा

■ मुंबई

महाराष्ट्र विधानसभा निवडणूक निकाल लागल्यानंतर राज्यात सत्तास्थापनेची लगबग सुरू होणं आवश्यक होतं. पण त्यानंतरही जवळपास १० दिवस मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्री ठरण्यासाठी लागले. अखेर देवेंद्र फडणवीसांनी मुख्यमंत्रीपदाची तर एकनाथ शिंदे व अजित पवारांनी उपमुख्यमंत्रीपदाची शपथ घेतली. त्यानंतर विशेष अधिवेशन बोलावून नवनिर्वाचित आमदारांचाही शपथविधी रीतसर पार पडला. आज अधिवेशनाच्या शेवटच्या दिवशी राहुल नार्वेकर यांचीच पुन्हा एकदा अध्यक्षपदी निवड झाली. यावेळी केलेल्या भाषणात उपमुख्यमंत्री अजित पवारांनी विरोधकांना टोले लगावतानाच लाडकी बहीण योजनेचाही उल्लेख केला.



राहुल नार्वेकर यांची आज विधानसभेचे अध्यक्ष म्हणून बिनविरोध निवड करण्यात आली. त्यानंतर सत्ताधारी व विरोधी पक्षातील सदस्यांनी राहुल नार्वेकर यांचं अभिनंदन करणारी भाषणं केली. पण यात अध्यक्षांचं अभिनंदन करतानाच एकमेकांना टक्केटोणपे देण्याची संधी दोन्ही बाजूंनी साधली. यावेळी उपमुख्यमंत्री अजित पवारांनी केलेल्या भाषणात विरोधकांना पराभव मान्य करण्याचं आवाहन केलं.

विधिमंडळाच्या विशेष अधिवेशनाच्या शेवटच्या दिवशी अजित पवारांनी पक्षफुटीचा उल्लेख केला. "महाराष्ट्रात कायदेशीर पेच निर्माण झाला, तेव्हा उभ्या भारताचं लक्ष इकडे लागलं होतं. विरोधकांनी तेव्हा ताळतंत्र सोडून अध्यक्षांवर टीका केली होती. पण तरीही राहुल नार्वेकरांनी ऐतिहासिक असा निकाल तेव्हा दिला होता. तेव्हा एक नव्हे तर दोन राष्ट्रीय पक्षांत फूट पडली. हा मुद्दा संविधानिक, न्यायिक, संवेदनशील होता. पण त्याचा अध्यक्षांनी बारकाईनं अभ्यास केला", असं म्हणत अजित पवारांनी राहुल नार्वेकरांचं कौतुक केलं.

दरम्यान, यावेळी अजित पवारांनी विरोधकांना संविधानाच्या मुद्द्यावरून टोला लगावला. "निवडणुकीच्या काळात अनेकजण स्टेजवर संविधान हातात घ्यायचे. पण संविधान हातात घेतल्यानंतरच संविधानाबद्दल आदर असतो का? जे हातात संविधान घेत नाहीत, त्यांना आदर नसतो का? पण त्यांनी एक तर नुसतंच त्यांनी हातात घेतलं. तरतुदी वाचल्या नाहीत असं माझं मत आहे. किंवा वाचून ते त्या तरतुदींचं उल्लंघन करत आहेत. प्रत्येक निवडून आलेल्या सदस्यानं स्थानावर बसण्यापूर्वी शपथ घेणं आवश्यक आहे. शपथेवर बहिष्कार म्हणजे या तरतुदीचा सरळ सरळ भंग आहे", असा दावा अजित पवारांनी केला. "महाराष्ट्रात महायुतीचे २३७ आमदार निवडून आले. अनेकांच्या लाटा येऊन गेल्या. पण इतकं निर्विवाद बहुमत कुणाला मिळालं नव्हतं. आता विरोधकांनी मान्य करायला हवं. डोळे उघडायला हवेत. लोकही म्हणतील यांचं काय चाललंय. किती दिवस रडीचा डाव खेळणार आहेत. खुल्या मनाने आम्ही लोकसभेला मान्य केलं. मग तिघांनी मिळून ठरवलं की पुन्हा लोकांच्या समोर जायचं आहे. त्यातून लाडकी बहीण आली. लाडक्या बहिणीनं आम्हाला सगळ्यांना इथे बसवलं आहे. जे आहे ते आहे", असं अजित पवारांनी यावेळी नमूद केलं.

# शिकाऊ पायलटच्या कारचा भीषण अपघात, दोन ठार

■ पुणे

भरधाव कारच्या भीषण अपघातात दोन शिकाऊ पायलट ठार झाल्यानं मोठी खळबळ उडाली आहे. ही घटना बारामती भिगवण मार्गावरील लामजेवाडी परिसरात आज पहाटे घडली. या अपघातात शिकाऊ पायलट असलेले दशु शर्मा आणि आदित्य कणसे हे दोघं ठार झाले. तर कृष्णा मंगलसिंग आणि महिला पायलट चेष्टा बिश्नोई हे दोघं गंभीर जखमी झाले आहेत. यातील एकाची प्रकृती चिंताजनक असल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे.

बारामती भिगवण मार्गावर लामजेवाडी गावानजिक आज पहाटे अडीच ते तीन वाजण्याच्या हा अपघात झाला आहे. टाटा हॅरीअर वाहनावरील चालकाचं नियंत्रण सुटल्यानं हा भीषण अपघात झाल्याची माहिती सूत्रांनी दिली. हे चौघंजण बारामतीकडून भिगवणकडं निघाले होते. यामध्ये एक महाराष्ट्रातील पायलट असून बिहार राज्यातील एक तर राजस्थानच्या एका तरुणीचा ही समावेश आहे. यातील गंभीर दोन जणांना तातडीनं रुग्णालयात हलवण्यात आलं आहे. हा अपघात नेमका कसा झाला, याची माहिती अद्याप मिळालेली नाही. भिगवण पोलिसांकडून या अपघाताचा तपास सुरू आहे, अशी माहिती सूत्रांनी दिली आहे.

# नार्वेकरांनी दिलेल्या निकालावर सर्वोच्च न्यायालय अजून विचार करतंय- जयंत पाटील

■ मुंबई

राहुल नार्वेकर यांची आज अध्यक्षपदी निवड झाल्यानंतर सत्ताधारी व विरोधी बाजूंच्या प्रमुख सदस्यांनी भाषणं केली. अजित पवारांनी महाराष्ट्रातील सत्तासंघर्षावेळी राहुल नार्वेकरांनी तटस्थपणे निकाल दिल्याचं नमूद करत त्यांचे आभार मानले. मात्र, यासंदर्भात बोलताना राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) पक्षाचे महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनी मिश्किल टिप्पणी करताच सभागृहात एकच हशा पिकला.

शिवसेना व राष्ट्रवादी काँग्रेस या महाराष्ट्रातील दोन प्रमुख पक्षांमध्ये पडलेल्या फुटीनंतर बंडखोर आमदारांना अपात्र करायचं की नाही? हे ठरवण्याचा निर्णय सर्वोच्च न्यायालयानं विधानसभा अध्यक्षांकडे सोपवला होता. त्यानुसार विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी सविस्तर सुनावणी देऊन निकाल बंडखोर गटाच्या बाजूने दिला होता. या प्रदीर्घ सुनावणीचा उल्लेख यावेळी जयंत पाटील यांनी आपल्या भाषणात केला. "कोर्ट म्हणून अध्यक्षांना जास्त काळ काम करायला लागलं. आम्ही सगळे त्यांच्यासमोर जाऊन आमची बाजू मांडत होतो. विधिमंडळाच्या चौथ्या मजल्यावर बसून त्यांनी न्यायदानाचं काम



करतानाही आम्हाला उत्तम सहकार्य केलं. कधीही त्यांच्या वागणुकीत दुजाभाव आम्हाला दिसला नाही. उलट आम्ही साक्ष देताना जे बोललो, त्यात दुरुस्त्या करण्यासाठीही ते मदत करायचे. त्यांनी संयमी असं काम केलं", असं जयंत पाटील म्हणाले. दरम्यान, राहुल नार्वेकरांनी तेव्हा दिलेल्या निकालावर सर्वोच्च न्यायालय अजून विचार करत असल्याचं जयंत पाटील म्हणाले. "त्यांनी निकाल असा दिला, की अजून सर्वोच्च न्यायालयाला त्यावर निर्णय देता आलेला नाही. नार्वेकरांनी दिलेल्या निर्णयावर सर्वोच्च न्यायालय अजून विचार करतंय. सर्वोच्च न्यायालयाचे एक सरन्यायाधीश घरी गेले (धनंजय चंद्रचूड यांची निवृत्ती). त्यांनी त्या निर्णयाला हात लावला नाही. त्यावर भाष्यही केलं नाही", असं जयंत पाटील यांनी नमूद केलं. "अध्यक्षांनी कुणाला अपात्र केलं नाही. आमदार अपात्र ठरले असते तर त्या सगळ्यांना वेगळी लढाई लढत बसावं लागलं असतं. त्यामुळे उशीरा का होईना, मी तुमचे आभार मानेन. आता सर्वोच्च न्यायालयाने निकालच दिला नाही. त्यामुळे अध्यक्षांचाच निर्णय मान्य करून आता नवा डाव सुरू झाला आहे", असंही जयंत पाटील म्हणाले.

# महाराष्ट्र - कर्नाटक सीमावाद तापला; महाराष्ट्र एकीकरण समितीचे सदस्य कर्नाटक पोलिसांच्या नजरकैदेत

■ कोल्हापूर

बेळगावात आजपासून कर्नाटक सरकारचं हिवाळी अधिवेशन सुरू होत आहे. मराठी भाषिकांवर अन्याय करण्यासाठीच कर्नाटक सरकार जाणून-बुजून बेळगावात अधिवेशन घेत आहे, असा आरोप मराठी एकीकरण समितीच्या वतीनं करण्यात येत आहे. याला विरोध करण्यासाठी महाराष्ट्र एकीकरण समितीकडून बेळगावमधील छत्रपती संभाजी महाराज चौकात महामेळाव्याचं आयोजन करण्यात आलं. मात्र कर्नाटक पोलिसांनी या मेळाव्याला परवानगी नाकारली. कोल्हापुरातून बेळगावकडं येणाऱ्या वाहनांची कागल जवळील दुधगंगा नदीपुलावर कसून तपासणी सुरू असून मोठा पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे. कर्नाटक पोलिसांनी मराठी एकीकरण समितीच्या 30 सदस्यांना नजरकैदेत ठेवलं आहे.

महाराष्ट्र एकीकरण समितीकडून बेळगावातील छत्रपती संभाजी महाराज चौकात आयोजित केलेल्या महामेळाव्याला पोलिसांनी परवानगी नाकारली. तर एकीकरण समितीचे सदस्य माजी आमदार मनोहर किणेकर, नेताजी जाधव, मालोजी अष्टेकर, प्रकाश मरगळे यांच्यासह समितीच्या सदस्यांना कर्नाटक पोलिसांनी नजर कैदेत ठेवलं आहे. "मराठी भाषिकांच्या या मेळाव्याला विरोध करण्यासाठीच कर्नाटक सरकार मुद्दामहून प्रयत्न करत आहे," असं माजी आमदार मनोहर किणेकर म्हणाले.

गेल्या 56 वर्षांपासून महाराष्ट्र-कर्नाटक सीमावाद सर्वोच्च न्यायालयात प्रलंबित आहे. केंद्रातील अनेक सरकार बदलली, मात्र महाराष्ट्र-कर्नाटक सीमावादावर कोणताच निर्णय झालेला नाही. दरवर्षी 1 नोव्हेंबर हा कर्नाटक सरकारचा स्थापना दिवस बेळगावसह सीमा भागात काळा दिन म्हणून पाळला जातो. तर बेळगाव शहराला कर्नाटक सरकारनं उपराजधानीचा दर्जा देऊन याच ठिकाणी हिवाळी अधिवेशन पार पडते. यामुळे कर्नाटक शासनाकडून मराठी भाषिकांवर जाणून-बुजून अन्याय केला जात असल्याची भावना गेली अनेक वर्ष बेळगावसह सीमाभागात मराठी भाषिकांचे नेतृत्व करणाऱ्या महाराष्ट्र एकीकरण समितीची आहे.

# संसदेच्या आवारात राहुल गांधींनी घेतली 'मोदी-अदानी' ची मुलाखत ?

■ नवी दिल्ली

काँग्रेस खासदार व लोकसभेचे विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी संसदेच्या आवारात केलेल्या एका अनोख्या आंदोलनाची बरीच चर्चा होत आहे. राहुल गांधी यांनी संसदेच्या आवारात पंतप्रधान नरेंद्र मोदी व उद्योगपती गौतम अदाणी यांच्याविरोधात आंदोलन केलं, त्यांचे पोस्टर हातात घेऊन निषेध नोंदवला. दोघांमधील कथित हितसंबंधांमुळे देशाचं नुकसान होत असल्याचा दावा केला. त्यानंतर राहुल गांधी दोन खासदारांबरोबर प्रसारमाध्यमांसमोर आले, ज्यांनी चेहऱ्यावर पंतप्रधान नरेंद्र मोदी व उद्योगपती गौतम अदाणींचे मुखवटे लावले होते.



या खासदारांना बरोबर घेत राहुल गांधी यांनी मोदी व अदाणींमधील कथित हितसंबंधांविरोधात अनोखं आंदोलन केलं. तसेच राहुल यांनी या दोघांची मुलाखतही घेतली.

यावेळी राहुल गांधी यांनी मोदी-अदाणींचे मुखवटे घातलेल्या खासदारांना काही प्रश्न विचारले. राहुल गांधी म्हणाले, "तुमच्या हितसंबंधांबद्दल बोला". त्यावर ते म्हणाले, "आम्ही दोघे मिळूनच सगळं करतो. २० वर्षांपासून आमची मैत्री आहे". त्यावर राहुल गांधींनी विचारलं की "तुम्ही संसदेचं अधिवेशन का चालू देत नाही". त्यावर ते दोघे म्हणाले, "आज अमित (केंद्रीय गृहमंत्री अमित शाह) आलेला नाही. तो आल्यावर सांगतो".

अदाणींचा मुखवटा परिधान केलेला खासदार म्हणाला, "मी जे काही सांगतो ते हा (मोदी) सगळं करतो. मला वाटेल ते सगळं मी याला सांगतो आणि मग तो ते काम करतो. मला बंदरं हवी असतील तर ती देतो, विमानतळं देतो". राहुल गांधींनी त्या दोघांना विचारलं की "आता काय बळकावणार आहात?" त्यावर ते म्हणाले, "आमची संध्याकाळी बैठक आहे. त्या बैठकीत अमितभाईसुद्धा आहे. तिथे सगळं ठरेल". मोदींच्या मुखवट्याकडे बोट करत राहुल गांधी म्हणाले, "हा इतका चिंतेत का आहे?" त्यावर त्याचा दुसरा साथीदार (अदाणी) म्हणाला, "तो थोडा गंभीर आहे, त्याला कमी बोलायची सवय आहे".

अक्रॉस मुंबई यह साप्ताहिक स्वामी संजय तेजसिंग खिमेसरा के लिए मुद्रक, प्रकाशक- संजय मंगेश भैरे द्वारा सोमानी प्रिंटिंग प्रेस, गाला नं. ४, अमिन इंडस्ट्रीयल इस्टेट, सोनावाला क्रॉस रोड-२, नियर जवाहर नगर, फाटक ब्रीज, गोरेगांव (पूर्व), मुंबई- ४०० ०६३ से मुद्रित और राजेंद्र पार्क, बिल्डिंग नं. २/२०, चौथा माला, स्टेशन रोड, गोरेगांव (प.) मुंबई -४००१०४ यहां प्रकाशित किया। संपादक - संजय मंगेश भैरे फोन : ०२२-४९७१९९३२ ईमेल: sanjay.bhaire@gmail.com RNI NO: MA HBIL/2016/68485